सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

## वार्षिक अहवाल
## २०२२-२३

आपली सेवा - आमचे कर्तव्य


राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय

नवीन प्रशासकीय भवन, सातवा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०००३२

# महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

## वार्षिक अहवाल
## २०२२-२३

**आपली सेवा - आमचे कर्तव्य**


**राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय**

नवीन प्रशासन भवन, सातवा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०००३२

**वेब साईट :- https//:aaplesarkar.mahaonline.gov.in**

**ई-मेल :- ccrts@maharashtra.gov.in**

**संपर्क क्रमांक :- ०२२-२२८३२३४६**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १-४ |
| | प्रकरणे | |
| प्रकरण १ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ | ५-१४ |
| | १.१ प्रारंभ | ५ |
| | १.२ अधिनियमाची ठळक वैशिष्ट्ये | ५ |
| | १.३ महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग | ५ |
| | १.३.१ आयोगाचे अधिकार व कर्तव्ये | ६ |
| | १.३.२ आयोगाची संघटनात्मक संरचना | ६-८ |
| | १.४ सेवा देण्याची पध्दती | ९ |
| | १.५ प्रशिक्षण | ९ |
| | १.६ महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियमाच्या वाटचालीवर एक दृष्टिक्षेप | ११ |
| | १.७ आयोगाने घेतलेल्या बैठका | १२-१३ |
| प्रकरण २ | आयोगाचे उपक्रम | १५-७८ |
| | २.१ मुख्य आयुक्तांचे दौरे व बैठका<br>२.२ व्हिडीओ कॉन्फरन्सेस<br>२.३ बैठकांचे फलीत | १५-४४<br>३३<br>३४ |
| | २.४ राज्य सेवा हक्क आयुक्तांच्या बैठका व दौरे<br>२.४.१ कोकण विभाग<br>२.४.२ पुणे विभाग<br>२.४.३ नाशिक विभाग<br>२.४.४ छत्रपती संभाजीनगर विभाग<br>२.४.५ अमरावती विभाग<br>२.४.६ नागपूर विभाग | ४४-७७<br>४४-४७<br>४८-५५<br>५६-५९<br>६०-६९<br>६९-७५<br>७५-७७ |
| प्रकरण ३ | आपले सरकार सेवा पोर्टल व मोबाईल ॲप | ७९-९१ |
| प्रकरण ४ | लोकसेवा हक्काचा नागरिकांकडून वापर | ९३-१११ |
| | ४.१ विभागवार अधिसूचित लोकसेवा | ९३ |
| | ४.२ विभागवार प्राप्त व कार्यवाही केलेल्या अर्जांची स्थिती | ९५ |
| | ४.३ राज्यामध्ये विविध माध्यमांद्वारे प्राप्त झालेल्या व निकाली काढलेल्या अर्जांची संख्या | १०२ |
| | ४.४ अर्जांची महसूल विभागवार स्थिती | १०३ |
| | ४.५ अर्जांची जिल्हावार स्थिती | १०४-१०५ |
| | ४.६ अपिलांची स्थिती | १०६ |
| | ४.७ विभागांचे वर्गीकरण | १०७-१११ |
| प्रकरण ५ | प्रशिक्षण व क्षमता बांधणी | |
| | ५.१/५.२ प्रशिक्षण व क्षमता बांधणी / यशदातर्फे प्रशिक्षण | ११३-११६ |

| | | |
|---|---|---|
| | ५.३ महाआयटीद्वारे तांत्रिक प्रशिक्षण | ११५ |
| प्रकरण ६ | नाविन्यपूर्ण उपक्रम | ११७-१२४ |
| | ६.१ सिडको | ११८ |
| | ६.२ जमाबंदी आयुक्त, भूमी अभिलेख | १२० |
| | ६.३ नोंदणी व मुद्रांक विभाग | १२१ |
| | ६.४ अमरावती विभाग | १२२ |
| | ६.५ नाशिक विभाग | १२३ |
| | ६.६ नागपूर विभाग | १२३ |
| प्रकरण ७ | सूचना, शिफारशी व पुढील वाटचाल | १२५-१३४ |
| | ७.१ सर्वसाधारण सूचना, शिफारशी व सद्यस्थिती (२०२१-२२) | १२५ |
| | ७.२ सर्वसाधारण शिफारशी (२०२२-२३) | १२८ |
| | ७.३ विभागनिहाय शिफारशी | १३० |
| | ७.४ व्यापक प्रशिक्षणाची आवश्यकता | १३३ |
| | ७.५ प्रचार व प्रसिद्धीची आवश्यकता | १३३ |
| प्रकरण ८ | ऋण निर्देश | १३५-१३७ |
| | परिशिष्टे | |
| परिशिष्ट अ | शुभेच्छा संदेश — १) मा. मुख्यमंत्री<br>२) मा. उपमुख्यमंत्री<br>३) मा. पालकमंत्री (पुणे)<br>प्रशंसा पत्रे - १) संचालक, लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी, मसूरी<br>२) नॅशनल सेंटर फॉर गुड गव्हर्नन्स, भारत सरकार<br>३) यशदा | १३९-१५१ |
| परिशिष्ट ब | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ | १५३-१६५ |
| परिशिष्ट क | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत नियम | १६७-१७८ |
| परिशिष्ट ड | अधिसूचित लोकसेवांची सूची | १७९-२०४ |
| परिशिष्ट इ | विभागामार्फत अधिसूचित केलेल्या तथापी आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध नसलेल्या सेवांची यादी. | २०५-२१४ |

# प्रस्तावना

आपल्या राज्यातील नागरिकांना राज्य शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबद्ध पद्धतीने देण्याकरिता महाराष्ट्र सेवा हक्क अधिनियम, २०१५ पारित करण्यात आला. नागरिकांना अधिकार देणारा व प्रशासनाला जबाबदार व उत्तरदायी करणारा हा क्रांतिकारी कायदा आहे. शासनाच्या सेवा काही वेळा सामान्य माणसापर्यंत पोहचत नाहीत किंवा त्या सेवा प्राप्त करण्यासाठी नागरिकांना अनेकवेळा प्रयत्न करावे लागतात. याचा विचार करता या परिस्थितीमध्ये आमूलाग्र बदल करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम पारित करण्यात आला. या अधिनियमाचे उद्दिष्ट नागरिकांना तत्परतेने, सहज व सुलभपणे सेवा देण्यात यावी, असे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा दिनांक २८ एप्रिल, २०१५ पासून अंमलात आला. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली नियमावली दिनांक १६ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. दिनांक १ मार्च, २०१७ रोजी राज्याचे माजी मुख्य सचिव, श्री. स्वाधीन क्षत्रिय यांची पहिले राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. यानंतर दि. २५.०१.२०२२ पासून ०३.०५.२०२३ पर्यंत श्री. दिलीप शिंदे यांनी राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळला.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चे कलम १९ (१) मध्ये अशी तरतूद आहे की, "आयोग प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर, मागील वर्षामधील आपल्या कार्याचा तसेच सार्वजनिक प्राधिकरणांच्या लोकसेवा देण्याच्या कामगिरीच्या मूल्यमापनाबाबतचा अहवाल तयार करील आणि तो राज्य शासनाला सादर करील". त्याचप्रमाणे कलम १९ (२) प्रमाणे "राज्य शासन, आयोगाने सादर केलेला वार्षिक अहवाल राज्य विधी  मंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवील". त्याप्रमाणे वर्ष २०२२-२३ चा अहवाल सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचा हा सहावा वार्षिक अहवाल आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात उत्तरोत्तर प्रगती होत आहे. ऑनलाईन दिल्या जाणाऱ्या सेवांच्या संख्येमध्येही महाराष्ट्र राज्य प्रगती करीत आहे. दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या एकूण ५२९ सेवांपैकी ३८७ सेवा ऑनलाईन स्वरुपात देण्यात येत असून आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲपद्वारे ऑनलाईन सेवा देण्यात येतात. त्याशिवाय ३७,८९५ 'आपले सरकार' सेवा केंद्रांच्या माध्यमातून सुद्धा नागरिकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. सदर अधिनियम लागू

झाल्यापासून दि.३१.०३.२०२३ पर्यंत ऑनलाईन सुविधांचा लाभ घेण्याकामी १३,६८,४२,९७६ अर्ज प्राप्त झाले व निपटाऱ्याचे प्रमाण ९५% आहे. सन २०२२-२३ मध्ये एकूण २,०७,६४,३०९ सेवा अर्ज प्राप्त झाले असून निपटाऱ्याचे प्रमाण सुमारे ९२% आहे. अनेक अर्ज ऑफलाईन स्वरुपात सुद्धा प्राप्त झाले. मात्र आयोगाने अनेक प्रयत्न करून सुद्धा, ऑफलाईन स्वरुपात प्राप्त झालेल्या व निपटारा केलेल्या अर्जांची आकडेवारी आयोगाने विहित केलेल्या “अ”, “ब” व “क” या नमुन्यांमध्ये संबंधित विभागाकडून उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे सदर अहवाल हा महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महा.आय.टी.महामंडळ) यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या फक्त ऑनलाईन अर्जांच्या आकडेवारीवर आधारित आहे.

प्राप्त माहितीनुसार, भारतातील ३० राज्यांनी/केंद्रशासित प्रदेशांनी नागरिकांना कालबद्ध, पारदर्शक व कार्यक्षम पद्धतीने लोकसेवा पुरविण्यासाठी कायदा पारित केला आहे. तर सात राज्यांनी सेवा हक्क कायद्याची अधिक प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याकरीता स्वतंत्र आयोग स्थापित केले आहेत. ज्या राज्यांनी माहिती व तंत्रज्ञानाचा वापर केला तेथे सेवा वितरीत करण्यामध्ये लक्षणीय सुधार झाला आहे.

महाराष्ट्र राज्याने सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी करतांना भरीव प्रगती केली असून ३१ मार्च २०२३ पर्यंत ५२९ सेवा अधिसूचित केल्या आहेत. तथापि काही अन्य राज्यांनी या पेक्षा ही अधिक सेवा अधिसूचित केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. उदा. कर्नाटक राज्याने १,०३३ सेवा, हरियाणा राज्याने ६५५ सेवा तर पंजाब राज्याने ५६८ सेवा अधिसूचित केल्या आहेत. राज्य शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सर्व सेवांची एकत्रित संपूर्ण सूची तयार करण्याची व उक्त अधिनियमाच्या अंतर्गत सर्वच सेवा अधिसूचित करण्यासाठी निश्चित वेळापत्रक तयार करण्याची शिफारस आयोगाने या आधीच शासनाला केली आहे. आयोगाने अशीही शिफारस केली आहे की, महाराष्ट्र शासनाद्वारे पुरवल्या जाणाऱ्या सर्व सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित केल्या जाव्यात. आयोगाच्या या शिफारशींची सर्वोच्च प्राधान्याने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

आयोगाकडून करण्यात आलेल्या काही सूचना व शिफारशींवर राज्य शासनाने कार्यवाही केली आहे. त्यामध्ये शासन परिपत्रक दिनांक १२.०३.२०१८ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्याचा व ‘आपले सरकार’ सेवा केंद्रांच्या माध्यमातून सर्व अधिसूचित सेवा उपलब्ध करून देण्याचा निर्णय समाविष्ट आहे. अशा निर्णयांमुळे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची परिणामकारक अंमलबजावणी होण्यास गती मिळाली आहे. तथापि, सर्वसामान्य जनतेत सदर अधिनियमाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अधिक परिश्रम घेणे

आवश्यक आहे. सदर अधिनियम अधिक लोकप्रिय करण्यासाठी आयोगाने बोधचिन्ह व घोषवाक्य निश्चित केले आहे. सर्व विभागांनी सदर बोधचिन्ह व घोषवाक्य यांचा वापर करावा अशी विनंती आयोगाने शासनाला केली. त्यानुसार शासन परिपत्रक दिनांक १५.०२.२०२० अन्वये अधिसूचित सेवा देतांना सर्व विभागांनी आयोगाचे घोषवाक्य व बोधचिन्ह वापरावे, अशी सूचना केली आहे. ऑनलाईन दिल्या जाणाऱ्या दाखल्यांवर आता आयोगाचे बोधचिन्ह व घोषवाक्य चिन्हांकित करण्यात येत आहे.

विभागीय स्तरावर सहापैकी पाच राज्य सेवा हक्क आयुक्तांची नियुक्ती करण्याचा अतिशय महत्त्वाचा आणि प्रभावी निर्णय दि. २३.११.२०२१ रोजी झाला. आयोगाच्या निदर्शनास असेही आले की, काही विभाग अधिसूचित केलेल्या काही सेवा परस्पर निरस्त करतात. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी कोणतीही अधिसूचित सेवा निरस्त करावयाची झाल्यास आयोगाची पूर्वसंमती बंधनकारक करणारा शासन निर्णय क्र. आरटीएस-२०२२/प्र.क्र.१४३/लो.दि.कक्ष, दि. ८ सप्टेंबर, २०२२ रोजी काढण्यात आला. त्यामुळे अशा प्रकारांना आळा बसला आहे.

अधिसूचित सेवांची संख्या वाढत नसल्याबाबत तसेच आपले सरकार संकेतस्थळाशी काही सेवांचे संलग्नीकरण न झाल्याबाबत आयोगाने वेळोवेळी चिंता व्यक्त केली आहे. तसेच एकल व्यासपीठ (Single Platform) धोरणाचे पालन न करणे, अनेक सेवांना मिळणारा अल्प प्रतिसाद, अधिसूचित सेवांपैकी १४२ सेवा अद्यापही आपले सरकार संकेतस्थळावर उपलब्ध नसणे, ऑफलाईन प्राप्त व निकाली काढलेल्या अर्जांची माहिती प्राप्त न होणे, तसेच मोठ्या प्रमाणावर प्रथम व द्वितीय अपिल प्रलंबित असल्याबाबत सुद्धा आयोगाने नाराजी व चिंता व्यक्त केली आहे. सदर बाबींचे निराकरण संबंधित विभागांनी करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

या वार्षिक अहवालामध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या आरंभापासून झालेली प्रगती, अंमलबजावणीमध्ये वेगवेगळया विभागांनी केलेली कामगिरी, जिल्हानिहाय व महसूल विभागनिहाय झालेल्या कामकाजाचे तुलनात्मक मूल्यमापन करण्यात आले आहे. तसेच आयोगाने राज्य शासनाला केलेल्या महत्वपूर्ण सूचना व शिफारशी व त्यांची सद्य:स्थिती याबाबतची ही माहिती देण्यात आली आहे. या सर्व माहिती व अनुभवाच्या आधारे पुढील वाटचालीबाबत देखील काही सूचना करण्यात आल्या आहेत, जेणेकरून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची अधिक प्रभावी अंमलबजावणी होऊ शकेल. वर्धा जिल्ह्याने राबविलेला 'सेवादूत' या घरपोच सेवा उपक्रमाची दखल आयोगाने घेतली असून या नाविन्यपूर्ण उपक्रमाची पुनरुक्ती राज्यात इतरत्र करण्याची शिफारस आयोग करीत आहे. जमाबंदी आयुक्त

आणि नोंदणी महानिरीक्षक (महसूल विभाग) यांनी पारदर्शक, गतिमान व कालबध्द पध्दतीने सेवा देण्याकरिता केलेल्या नाविन्यपूर्ण उपायांचेही आयोग कौतुक करीत आहे. वाशिम जिल्हयातील ATDM (All Time Document Machine) द्वारा दिली जाणारी सेवा ही एक उल्लेखनीय बाब आहे.

२०२२-२३ मध्ये आयोगाने वर नमूद केलेली प्रगती तत्कालीन मुख्य आयुक्त (अ.का.) श्री. दिलीप शिंदे तसेच राज्य आयुक्त सर्वश्री अभय यावलकर (नागपूर व कोकण), डॉ. किरण जाधव (छत्रपती संभाजी नगर), रामबाबू नारुकुल्ला (अमरावती) व श्रीमती चित्रा कुलकर्णी (नाशिक) यांचे परिश्रमामुळे शक्य झाली आहे. या अहवाल वर्षात कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती व नागपूर येथे विभागीय कार्यालये पूर्ण कार्यक्षमतेने सुरु करण्यात आली. तसेच सदर कार्यालयांमध्ये आवश्यक कर्मचारी, अधिकारी, साधनसामग्री इत्यादीची ही व्यवस्था करण्यात आली, ही मोठी जमेची बाजू आहे, याचे आयोगास समाधान वाटते.

"आपली सेवा हेच आमचे कर्तव्य" या आमच्या घोषवाक्यात उद्धृत केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील नागरिकांना खऱ्या अर्थाने तत्पर, कार्यक्षम, पारदर्शक आणि कालबध्द सेवा देण्यात येईल हे सुनिश्चित करण्यासाठी आयोग कटिबध्द आहे, याची मी ग्वाही देतो.

**राज्य मुख्य आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग**

**मुंबई,**
**दिनांक:- २० फेब्रुवारी, २०२३**

## प्रकरण १ :

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५

### १.१ प्रारंभ

केंद्र शासनाने नेमलेल्या दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने सन, २००५ च्या अहवालामध्ये नागरिकांना लोकसेवा सहज, सुलभ व कालबद्ध पद्धतीने उपलब्ध करून देण्याची शिफारस केली. त्यानुसार केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागांनी नागरिकांची सनद तयार केली. परंतु नागरिकांच्या सनदेमध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेचे पालन न झाल्यास सबंधित कर्मचारी/ अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची स्पष्ट तरतूद करण्यात आली नव्हती. ही उणीव दूर करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम पारित करण्यात आला. सुशासनाबाबत महाराष्ट्र राज्य नेहमीच आघाडीवर राहिले आहे व राज्यातील सामान्य नागरिक हा विकासाचा केंद्रबिंदू मानला आहे. यापूर्वी 'महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५' आणि नागरिकांना लोकाभिमुख प्रशासन देण्याकरिता सादर झालेले अशासकीय विधेयक (२००९) यांच्या पार्श्वभूमीवर सन २०१५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम पारित करण्यात आला. हा अधिनियम दिनांक २८ एप्रिल, २०१५ पासून राज्यात अंमलात आला.

### १.२ अधिनियमाची ठळक वैशिष्ट्ये

देशातील अन्य राज्यांमधील अधिनियमांपेक्षा अनेक बाबीत वेगळेपण दर्शविणारा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा एक क्रांतिकारक अधिनियम आहे. डिजिटल मंचाचा उपयोग करून सार्वजनिक वितरण प्रणालीच्या गुणवत्तेत सुधारणा करणाऱ्या कार्यसंस्कृतीवर सदर अधिनियमात भर देण्यात आला आहे. पात्र व्यक्तींना सेवांचे वितरण हे पारदर्शक व कालबद्ध पद्धतीने, उत्तरदायित्वाचे भान ठेऊन झाले पाहिजे, यावर सदर अधिनियमाचा भर आहे. जनतेच्या गाऱ्हाण्यांचे प्रभावी निराकरण करणे, सेवा वितरण प्रणालीची कार्यक्षमता वाढविणे यावर अधिनियमात विशेष भर दिला आहे. नागरिकांना सेवा मिळण्याचा हक्क दिल्यामुळे व कार्यक्षम व पारदर्शक पद्धतीने विहित कालावधीत सेवा देण्याचे वैधानिक उत्तरदायित्व प्रशासनावर निश्चित केल्यामुळे हा अधिनियम म्हणजे पूर्वीच्या कामकाजाच्या पद्धतीत केलेला आमूलाग्र बदलच आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या कलम-३ नुसार लोकसेवांची यादी, पदनिर्देशित अधिकारी तथा प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकाऱ्यांची माहिती, कालमर्यादा हा तपशील अधिनियम अंमलात आल्यानंतर तीन महिन्यांमध्ये व त्यानंतर वेळोवेळी अधिसूचित करणे प्रत्येक विभागावर बंधनकारक आहे. त्यानुसार दि. ३१.०३.२०२३ पर्यंत एकूण ३१ विभागांपैकी २८ विभागांनी ५२९ सेवा अधिसूचित केल्या आहेत.

### १.३ महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

विविध सेवांचे वितरण करण्याबाबत व राज्य शासनाच्या विविध विभागांवर निगराणी, संनियंत्रण व नियमन करण्यासाठी अधिनियमाच्या कलम १३ (१) नुसार राज्य शासनाने सेवा हक्क आयोगाची स्थापना करून दि. ०१ मार्च, २०१७ रोजी राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्तांची नियुक्ती केली. पुणे, छत्रपती संभाजी नगर, नाशिक,

अमरावती व नागपूर येथील पाच महसुली विभागांसाठी राज्य सेवा हक्क आयुक्तांची नियुक्ती दि. ०१ डिसेंबर, २०२१ रोजी करण्यात आली. कोकण राज्य सेवा हक्क आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर हे पहात होते.

### १.३.१ आयोगाचे अधिकार व कर्तव्ये

अधिनियमानुसार आयोगाला विविध कर्तव्ये व जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या असून अधिनियमाची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यासोबतच आयोगाला एक वेगळी ओळख देण्यात आली आहे. अधिनियमाच्या कलम १६ नुसार, अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची व लोक सेवांचे प्रभावी वितरण होण्याची खबरदारी घेण्यासाठी सूचना करण्याची जबाबदारी आयोगावर सोपविण्यात आली आहे. तसेच सेवा देण्यात अपयशी ठरल्यास स्वतः होऊन दखल घेण्याचे, विभागीय चौकशीची शिफारस करण्याचे, कार्यालयांची तपासणी करण्याचे, सार्वजनिक प्राधिकरणांनी वितरीत केलेल्या सेवांवर संनियंत्रण ठेवण्याचे व तृतीय अपिलांवर निर्णय घेण्याचे हक्क आयोगाला बहाल करण्यात आले आहेत.

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ नुसार दिवाणी न्यायालयाचे अधिकार आयोगाला बहाल करण्यात आले आहेत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम १७ नुसार "राज्य शासन, कलम १६ मधील पोट-कलम (१) च्या खंड (ग), (घ) आणि (ङ) अन्वये, आयोगाने केलेल्या शिफारशींवर विचार करील आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती, तीस दिवसांच्या आत किंवा आयोगाशी विचारविनिमय करुन ठरविण्यात येईल अशा त्यानंतरच्या कालावधीत, आयोगाकडे पाठवील." अशी स्पष्ट तरतूद आहे.

### १.३.२ आयोगाची संघटनात्मक संरचना

आयोगाचे मुख्य कार्यालय ७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई येथे स्थित आहे. आयोगाच्या मुख्य कार्यालयात ३४ मंजूर पदे आहेत. त्यापैकी २४ पदांवर मंत्रालयीन अधिकारी/कर्मचाऱ्यांसह कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. राज्याचे मुख्य सेवा हक्क आयुक्त यांची नेमणूक दि. १ मार्च, २०१७ पासून झाली आहे. श्री. दिलीप शिंदे (भा.प्र.से.) (से.नि.) यांच्याकडे राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त पदाचा (दि. २५.०१.२०२२ ते दि. ०४.०५.२०२३ या कालावधीत) अतिरिक्त कार्यभार होता. राज्यात राज्य सेवा हक्क आयुक्तांची सहा विभागीय कार्यालये सुरु झाली असून सदर कार्यालयात पुढील प्रमाणे राज्य सेवा हक्क आयुक्तांची नेमणूक करण्यात आलेली असून दि. ०१.१२.२०२१ पासून ते कार्यरत आहेत.

१. श्री. दिलीप शिंदे, राज्य सेवा हक्क आयुक्त , पुणे विभाग
२. श्री. अभय यावलकर, राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर विभाग
३. श्री. अभय यावलकर, राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण विभाग (अ.का.)
४. डॉ. किरण जाधव, राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग
५. श्री. रामबाबू नरकुल्ला, राज्य सेवा हक्क आयुक्त, अमरावती विभाग
६. श्रीमती चित्रा कुलकर्णी, राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक विभाग



श्री. दिलीप शिंदे, भा. प्र. से. (से.नि.), (पुणे विभाग)
तथा मुख्य आयुक्त (अ.का.)



श्री. अभय यावलकर,
भा. प्र. से. (से.नि.), (नागपूर विभाग) व कोकण विभाग (अ.का.)



डॉ. किरण जाधव.
भा. पो. से. (से.नि.), (छत्रपती संभाजीनगर विभाग)



डॉ. नरुकुल्ला रामबाबू,
भा. व. से. (से.नि.), (अमरावती विभाग)



श्रीमती चित्रा कुलकर्णी,
(से.नि. अपर राज्यकर आयुक्त), (नाशिक विभाग)

## विभागीय राज्य सेवा हक्क आयुक्त

## आकृती १.१ : आयोगाची संरचना






## १.४ सेवा उपलब्ध करुन देण्याची पद्धती : 'आपले सरकार' सेवा पोर्टल व मोबाईल ॲप

पात्र व्यक्तींना अधिसूचित सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एकल व्यासपीठ (single platform ) उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचे काम आयोगाने प्राधान्याने हाती घेतले. तसेच सुरुवातीच्या काळात शासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे महत्वाचे कामही आयोगाच्या पाठपुराव्यामुळे शासनाने "यशदा" मार्फत हाती घेतले. त्यामुळे राज्यात अधिनियमाची कार्यक्षम व प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य झाले. सर्व अधिसूचित सेवा एकाच व्यासपीठावर वितरीत करण्यावर आयोगाने भर दिला आहे.

### १.४.१ 'आपले सरकार' सेवा पोर्टल

जनतेला ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'आपले सरकार' सेवा पोर्टल सुरु करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर पोर्टलमार्फत ऑनलाईन पद्धतीने ३८७ सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सदर व्यासपीठाचा सेवांचा लाभ घेण्यासाठी उपयोग होतोच, पण त्याचबरोबर कोणते विभाग कोणत्या सेवा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देतात, त्यांच्याकडे किती अर्ज प्राप्त होतात, त्यावर कशा प्रकारे कार्यवाही केली जाते, प्रलंबित अर्जांची संख्या किती आहे, ही माहिती देखील रियल टाईम आधारावर प्राप्त होते. आयोगाच्या स्थापनेपासून दिनांक ३१.३.२०२३ पर्यंत १३,६८,४२,९७६ अर्ज ऑनलाईन प्राप्त झाले असून १२,९८,८१,५४६ अर्ज संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्यांनी निकाली काढले. अर्जांच्या निपटाऱ्याचे हे प्रमाण ९५% एवढे आहे.

### १.४.२ मोबाईल ॲप

ऑनलाईन सेवांना मिळत असलेला मोठा प्रतिसाद पाहता सेवा हक्कांशी संबंधित विशेष मोबाईल ॲप जनतेला उपलब्ध करून देण्यात आले आहे. विभागवार उपलब्ध सेवा शोधण्यासाठी, त्या मिळविण्यासाठी आणि आपल्या अर्जाचा मागोवा घेण्यासाठी त्याचा उपयोग होतो. सदर मोबाईल ॲप हे https://itunes.apple.com/in/app/rts-maharashtra/ या संकेतस्थळावरून ॲपल-फोन वापरकर्ते आणि "RTS Maharashtra" या संकेतस्थळावरून Android वापरकर्ते डाऊनलोड करु शकतात. संबधित मोबाईल ॲप विनामूल्य आहे. सदर मोबाईल ॲपचा उपयोग करून नागरिक ऑनलाईन अर्ज करू शकतात, त्याची स्थिती तपासू शकतात.

## १.५ प्रशिक्षण

अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि सेवा देण्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामाच्या दर्जामध्ये व कार्यसंस्कृतीमध्ये सुधारणा होण्यासाठी सदर अधिनियमात प्रशिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. प्रशिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन पदनिर्देशित अधिकारी, अपिलीय प्राधिकारी व अन्य शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये या अधिनियमाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांना यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनीच्या (यशदा), पुणे माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येते.

### १.५.१. यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी (यशदा) पुणे यांचेकडून प्रशिक्षण

यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी (यशदा) पुणे ही महाराष्ट्र शासनाची शिखर प्रशिक्षण संस्था असून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये त्याबाबत जागरुकता निर्माण होण्यासाठी राज्य प्रशिक्षण धोरणाच्या अंतर्गत "दिशानिर्देशन प्रशिक्षण" देण्याची कामगिरी सदर संस्थेकडे सोपविण्यात आली आहे. अधिनियम, त्याची उद्दिष्टे व त्याच्या कलमांमधील विविध तरतुदींबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्हा व तालूका स्तरावरील सर्व संवर्गांना वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येते.

यशदामार्फत आयोजित संवर्ग "अ" च्या पायाभूत, उजळणी व पदोन्नती नंतरचे प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम' हा विषय समाविष्ट करण्यात आला आहे.

**तक्ता १.१ यशदा यांचेतर्फे दिशानिर्देशन प्रशिक्षण कार्यक्रम**
**(२०१५-१६ ते २०२२-२३)**

| अ.क्र. | वर्ष | प्रशिक्षणार्थींची संख्या |
|---|---|---|
| १ | २०१५ – १६ | ८४,९३० |
| २ | २०१६ – १७ | १,२२,२८५ |
| ३ | २०१७ – १८ | १५,१७० |
| ४ | २०१८ – १९ | ९, १९४ |
| ५ | २०१९ – २० | ५,७६४ |
| ६ | २०२० – २१ | ३८९ |
| ७ | २०२१ – २२ | २,०२२ |
| ८ | २०२२ – २३ | १३,७३५ |
| | **एकूण** | **२,५३,४८९** |

### १.५.२ तांत्रिक प्रशिक्षण

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत ज्या विभागांच्या सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत, त्या विभागांसाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महा.आय.टी.महामंडळ) तर्फे जिल्हानिहाय प्रशिक्षण सत्रे घेण्यात आली आहेत. आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲप यांच्या वापराबाबत विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते.

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महा.आय.टी.महामंडळ) हे महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे महामंडळ आहे. त्यांचे जिल्हा समन्वयक संकेतस्थळाची माहिती राज्यातील संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना देतात व त्यामध्ये नागरिकांकडून विभागाला प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही कशी करावयची, सेवा कशी उपलब्ध करून द्यायची किंवा योग्य कारण नमूद करून सेवा देण्यास नकार कसा द्यायचा, अपिलांची ऑनलाईन

कार्यवाही कशी करावयाची, मागोवा कसा घ्यायचा, त्याची पडताळणी कशी करायची, याची कार्यपद्धती विशद करतात.

**तक्ता १.२ महा.आय.टी.महामंडळद्वारा तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम**

| अनुक्रमांक | वर्ष | प्रशिक्षणार्थींची संख्या |
|---|---|---|
| १ | २०१५ – १८ | १०,२७५ |
| २ | २०१८ – १९ | ७,९०० |
| ३ | २०१९ – २० | ५,००४ |
| ४ | २०२० – २१ | ८६६ |
| ५ | २०२१ – २२ | ४८४ |
| ६ | २०२२ – २३ | ६२८ |
| | **एकूण** | **२५,१५७** |

## १.६. महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियमाच्या वाटचालीवर एक दृष्टिक्षेप

### १.६.१ अधिनियम व अधिसूचना

महाराष्ट्र राज्याच्या माननीय राज्यपालांकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या दि. २१ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या राजपत्रामध्ये अधिनियम प्रसिद्ध करण्यात आला. तो दि.२८ एप्रिल, २०१५ पासून अंमलात आला व याबाबतचे नियम दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजी प्रकाशित करण्यात आले. अधिनियमाच्या अंतर्गत पात्र व्यक्तींसाठी  कोणत्या लोकसेवा उपलब्ध आहेत, हे तीन महिन्यांमध्ये व नंतर वेळोवेळी अधिसूचित करणे सर्व शासकीय विभागांना बंधनकारक करण्यात आले. त्यानुसार विविध विभागांनी अधिसूचित सेवांची यादी  पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी व प्रत्येक सेवा उपलब्ध करून देण्यासाठीची कालमर्यादा यांची यादी प्रसिद्ध केली आहे.

### १.६.२  ऑनलाईन सेवा

"आपले सरकार" पोर्टल व मोबाईल ॲप यांच्याद्वारे ऑनलाईन अधिसूचित सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महाऑनलाईन यांनी आज्ञावली विकसित केली असून विविध विभागांना त्यांची संकेतस्थळे आपले सरकार सेवा पोर्टलशी जोडून घेण्यास ( Integration)  सूचित करण्यात आले होते. सन २०१५ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत १३,६८,४२,९७६ अर्ज ऑनलाईन प्राप्त झाले आहेत. ५२९ अधिसूचित सेवांपैकी ३८७ सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत. उर्वरित १४२ सेवांसाठीची आज्ञावली विकसित करण्याचे व एकत्रीकरण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

## १.७ आयोगाने घेतलेल्या बैठका

अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयोगाने सन्माननीय लोकप्रतिनिधी तसेच विविध विभागांबरोबर अनेक बैठका घेतल्या, आढावा घेतला आणि चालना दिली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सन्माननीय लोकप्रतिनिधी, राज्याचे मुख्य सचिव व विभागांचे सचिव, क्षेत्रिय पातळीवरील विभागीय आयुक्त (महसूल), जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, विभागीय व जिल्हास्तरीय विविध विभागांचे प्रमुख, महाआयटी महामंडळ, केंद्र शासनाचे अधिकारी इ. चा समावेश आहे. याबाबतचा सविस्तर तपशील प्रकरण क्र. २ मध्ये दिला आहे.

### १.७.१ शासनाच्या सचिवांसोबत बैठका

आयोगाच्या विविध उपक्रमांची माहिती देण्याच्या अनुषंगाने व उक्त अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी चर्चा करण्यासाठी आयोगाने महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांचे सचिव यांचेसोबत वेळोवेळी बैठका घेऊन चर्चा केली. त्यामध्ये खालील मुद्यांचा आढावा घेण्यात आला.

- सर्व विभागांकडून देण्यात येणाऱ्या सर्व लोकसेवांची एक बृहद् यादी तयार करणे.
- विभागांच्या सर्व सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत अधिसूचित करणे.
- जनतेकडून कमी प्रतिसाद मिळणाऱ्या अधिसूचित सेवांचा आढावा घेणे.
- निरस्त करण्यात आलेल्या सेवांबाबत कारणमीमांसेची तपासणी करणे.
- ‘आपले सरकार’ संकेतस्थळावर सर्व ऑनलाईन सेवांचे एकत्रीकरण (Integration) करणे.
- नमुना “अ” “ ब” आणि “ क” मध्ये ऑफलाईन अर्जांची माहिती संकलित करणे.
- पदनिर्देशित अधिकाऱ्यांना उत्कृष्ट कामासाठी प्रोत्साहन योजना तयार करणे.
- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाबाबत जागरुकता कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे.
- पदनिर्देशित अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- आयोगाच्या बोधचिन्ह व घोषवाक्याचा वापर अधिसूचित सेवा प्रमाणपत्र देताना करणे.
- सेवा देण्यास विलंब झालेल्या प्रकरणांमध्ये व अत्यल्प प्रतिसाद प्राप्त होणाऱ्या सेवांबाबत विश्लेषण आणि कारणमीमांसा करणे.
- आपले सरकार सेवा केंद्रांच्या संख्येत वाढ करणे.



शासनाच्या विभागांसमवेत बैठक



'जय महाराष्ट्र' च्या व्यासपीठावर राज्य मुख्य आयुक्त (अ.का.) श्री. दिलीप शिंदे

# प्रकरण २ :

## आयोगाचे उपक्रम

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयोगाने शासकीय विभाग, विभागीय व जिल्हा स्तरावरील संबंधित अधिकारी, विद्यार्थी व नागरिकांशी संवाद साधून सर्वंकष आढावा घेतला आहे. आयोगाच्या उपक्रमावर खालील तक्त्यांमध्ये दृष्टिक्षेप टाकला आहे.

### २.१ मुख्य आयुक्तांनी केलेले दौरे

राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांनी विविध ठिकाणी दौरे करून प्रत्यक्ष भेटी दिल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने मदत झाली. अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम प्रत्यक्ष पहावयास मिळाले. विभागीय आयुक्त कार्यालये (कोकण, छत्रपती संभाजी नगर, नाशिक, पुणे), जिल्हाधिकारी कार्यालये, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, कोल्हापूर, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अहमदनगर येथे संबंधित राज्य सेवा हक्क आयुक्त, विभागीय आयुक्त (महसूल), जिल्हाधिकारी व विभाग प्रमुखांसोबत आढावा बैठका घेतल्या. तसेच विविध 'आपले सरकार' सेवा केंद्रांना भेटी दिल्या. 'आपले सरकार' सेवा केंद्राच्या भेटी दरम्यान राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांनी नागरिकांशी संवाद साधला आणि सेवांच्या वितरणाबाबत त्यांचे अनुभव आणि अभिप्राय जाणून घेतले. आयोगाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम आणि त्याचे अंमलबजावणी बाबत विविध कार्यशाळा, प्रशिक्षण सत्रे देखील घेतली.

प्रत्यक्ष क्षेत्रभेटी व आढावा बैठकांमुळे, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीत सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रेरित करण्यास मोठी मदतच झाली आहे. नागरिक, पदनिर्देशित अधिकारी, अपिलीय प्राधिकारी व पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांना जाणवणाऱ्या विविध समस्यांचा/अडचणींचासुद्धा आयोगाला प्रत्यक्ष पडताळा घेता आला. सदर समस्यांचे निराकरण करण्यासाठी आयोगाकडून संबंधित विभागांशी संपर्क केला जातो आणि उपाय योजण्यात येतात.

**तक्ता क्र. २.१ श्री. दिलीप शिंदे, मुख्य आयुक्त (अ.का.) यांनी घेतलेल्या बैठका व केलेले दौरे**

| अ.क्र. | बैठक दिनांक व स्थळ | बैठकीचा विषय | उपस्थित अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | ०६.०४.२०२२ मुंबई | महाराष्ट्र विधानमंडळ-लक्षवेधी सुचनांबाबत | माननीय आमदार श्री. प्रकाश आबिटकर, विधानसभा सदस्य (कोल्हापूर), आयोगाचे अधिकारी |
| २. | १२.०४.२०२२ मुंबई | महाआयटी महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक | १. राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक<br>२. मुख्य संचलन अधिकारी, महाआयटी महामंडळ<br>३. व्यवसाय विश्लेषक, महाआयटी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | महामंडळ<br>४. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ३. | २२.०४.२०२२<br>कोल्हापूर | १. ‘राज्यातील नागरिकांना शासकीय सेवा विहित वेळेत उपलब्ध होत नसल्याने राज्यात लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची निर्मिती’ या विधानमंडळातील लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने बैठक,<br>२. ‘आपले सरकार’ केंद्रांना भेटी | १. मा. श्री प्रकाश आबिटकर, विधानसभा सदस्य (राधानगरी, जि. कोल्हापूर)<br>२. श्री. राहुल रेखावार, जिल्हाधिकारी, कोल्हापूर<br>३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर<br>४. इतर विभागांचे जिल्ह्यातील प्रमुख अधिकारी व महानगरपालिकेचे अधिकारी<br>५. जिल्हा समन्वय अधिकारी, महाआयटी महामंडळ |
| ४. | २६.०४.२०२२<br>मुंबई उपनगर | मुंबई उपनगर जिल्ह्यातील प्रमुख कार्यालय प्रमुखांची आढावा बैठक | १. अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>२. उप जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी इ.<br>३. तहसीलदार, अंधेरी/ बोरीवली/ कुर्ला<br>४. इतर विभागांचे प्रमुख अधिकारी |
| ५. | २७.०४.२०२२<br>मुंबई | “आपले सरकार” पोर्टलविषयक त्रुटी संदर्भात | १. प्रकल्प अधिकारी, महाआयटी महांडळ<br>२. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ६. | २८.०४.२०२२<br>मुंबई | नॅशनल गुड गव्हर्नन्स वेबिनार मालिका “सार्वजनिक सेवा वितरण सुधारणा – “सकला” व ई-सेवा (व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे) | १. सचिव, प्रशासकीय सुधारणा व तक्रार निवारण विभाग (केंद्र सरकार)<br>२. वरिष्ठ अधिकारी प्रशासकीय सुधारणा व तक्रार निवारण विभाग (केंद्र सरकार)<br>३. संचालक, (कर्नाटक राज्य) |
| ७. | ०६.०५.२०२२<br>मुंबई शहर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर जिल्हा येथे आढावा बैठक | १. श्री. राजीव निवतकर, जिल्हाधिकारी, मुंबई शहर<br>२. विभागांचे प्रमुख अधिकारी<br>३. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ८. | ०९.०५.२०२२<br>मुंबई | महाआयटी महामंडळाच्या संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांसोबत बैठक | १. संबंधित प्रकल्प अधिकारी, महाआयटी महामंडळ<br>२. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ९. | ११.०५.२०२२ | जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयास भेट व | १. श्री. राजेश नार्वेकर, जिल्हाधिकारी, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | ठाणे | बैठक | २. विभागांचे प्रमुख जिल्हास्तरीय अधिकारी |
| १०. | २०.०५.२०२२<br>विभागीय आयुक्त (कोकण भवन) | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजना याबाबत आढावा बैठक | १. राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण विभाग, (अ.का.)<br>२. उपायुक्त (सा.प्र.वि.)<br>३. सह सचिव, राज्य सेवा हक्क आयोग, कोकण<br>४. सर्व जिल्हाधिकारी, (कोकण विभाग)<br>५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, (कोकण विभाग)<br>६. कोकण महसूल विभागातील विभाग प्रमुख<br>७. संबंधित महाआयटी महामंडळाचे प्रकल्प व्यवस्थापक, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक, जिल्हा समन्वयक अधिकारी<br>८. राज्य सेवा हक्क आयोगातील व विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी |
| ११. | २३.०५.२०२२<br>मुंबई | माहिती व तंत्रज्ञान विभागासोबत आढावा बैठक | १. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान<br>२. महासंचालक, माहिती व तंत्रज्ञान |
| १२. | २७.०५.२०२२<br>मुंबई | महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची ऑनलाईन व ऑफलाईन सेवा, प्रथम व द्वितीय अपील, आयुक्त कार्यालयासाठी जागा, कर्मचारी वृंद इत्यादींबाबत आयोगाची आढावा बैठक | १. राज्य सेवा हक्क आयुक्त- पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नागपूर<br>२. सह सचिव, राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण<br>३. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी<br>४. महाआयटी महामंडळाकडील आयटी टीम |
| १३. | ३०.०५.२०२२<br>मुंबई | 'आपले सरकार' पोर्टलसंदर्भात तांत्रिक अडचणींबाबत बैठक | १. राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर<br>२. महाआयटी महामंडळाचे अधिकारी<br>३. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| १४. | ३१.०५.२०२२<br>मुंबई | 'आपले सरकार' पोर्टलसंदर्भात तांत्रिक अडचणींबाबत बैठक | १. राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर<br>२. महाआयटी महामंडळाचे अधिकारी<br>३. राज्य सेवा हक्क आयोगातील |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अधिकारी |
| १५. | ०३.०६.२०२२<br>मुंबई | ‘आपले सरकार’ पोर्टलसंदर्भात तांत्रिक अडचणींबाबत बैठक | १. प्रकल्प अधिकारी, महाआयटी महामंडळ<br>२. राज्य सेवा हक्क आयोगातील संबंधित अधिकारी |
| १६. | ०६.०६.२०२२<br>मुंबई | ‘आपले सरकार’ पोर्टलसंदर्भात तांत्रिक अडचणी तसेच अधिसूचित सर्व सेवा ऑनलाईन करण्याबाबत बैठक | १. राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर<br>२. सल्लागार, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>३. प्रकल्प अधिकारी, महाआयटी महामंडळ<br>४. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| १७. | १४.०६.२०२२<br>मंत्रालय<br>मुंबई | ‘आपले सरकार’ पोर्टल सुधारणा | अपर मुख्य सचिव (प्र.सु.र.व का.) यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक<br>१. उप सचिव, सा.प्र.वि.<br>२. महाआयटी महामंडळाचे अधिकारी |
| १८. | २०.०६.२०२२<br>मुंबई | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आढावा बैठक. | १. राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर<br>२. सल्लागार, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>३. प्रकल्प अधिकारी, महाआयटी महामंडळ<br>४. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| १९. | २१.०६.२०२२<br>मुंबई | सर्व विभागाच्या सेवा ऑनलाईन करण्याच्या अनुषंगाने बैठक | १. माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अधिकारी<br>२. प्रकल्प अधिकारी, महाआयटी महामंडळ<br>३. सल्लागार, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>४. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| २०. | २७.०६.२०२२<br>मुंबई | सर्व राज्य सेवा हक्क आयुक्तांसमवेत महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची आढावा बैठक (व्हिडिओ | १. राज्य सेवा हक्क आयुक्त- पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नागपूर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कॉन्फरन्सिंगव्दारे) | २. सह सचिव, राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, कोकण<br>३. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| २१. | २७.०६.२०२२<br>मुंबई | महसूल व वन विभाग, गृह विभाग आणि अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक | १. अतिरिक्त नियंत्रक, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग<br>२. सह सचिव, महसूल व वन विभाग<br>३. उप सचिव अन्न व नागरी पुरवठा<br>४. उप सचिव, गृह विभाग<br>५. प्रकल्प अधिकारी, महाआयटी महामंडळ<br>६. सल्लागार, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>७. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| २२. | ०४.०७.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | १. अधिसूचित होऊनही ऑनलाईन उपलब्ध होवू न शकलेल्या सेवांबाबत, अधिसूचित सेवांबाबत, प्रथम व द्वितीय अपिलांचा निपटारा, 'आपले सरकार' पोर्टलबरोबर एकत्रीकरण करणेबाबत, ऑफलाईन पुरविल्या जाणाऱ्या सेवांची विहित नमुन्यात माहिती इत्यादीबाबत आढावा बैठक<br>२. सांस्कृतिक विभाग, पर्यटन विभाग, साप्रवि विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग | १. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली:-<br>सर्व विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव व इतर अधिकारी, या विभागांचे अधिकारी व आयटी टीम<br>२. विभागांचे अधिकारी |
| २३. | ०७.०७.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | महसूल विभागातील सेवांबाबत आढावा बैठक (कर्नाटक, इतर राज्ये-तुलना) | १. अपर मुख्य सचिव, महसूल विभाग<br>२. उप सचिव महसूल विभाग |
| २४. | ०८.०७.२०२२<br>मंत्रालय मुंबई | महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे सामान्य प्रशासन विभागातील प्रलंबित विषय | १. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (प्र. सु. र. व का.)<br>२. उपसचिव सामान्य प्रशासन विभाग |
| २५. | ११.०७.२०२२<br>मुंबई | नगरविकास विभाग, गृह विभाग (परिवहन व बंदरे) आणि कृषी व पदुम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत अधिनियमाच्या | १. आयुक्त, परिवहन<br>२. महाव्यवस्थापक, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रभावी अंमलबजावणीसाठी आढावा बैठक | ३. सहा. आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग<br>४. विभागांचे सह सचिव<br>५. विभागांचे प्रमुख अधिकारी<br>६. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| २६. | १३.०७.२०२२<br>मुंबई | महाआयटी महामंडळाविषयक 'आपले सरकार' पोर्टलबाबत येणाऱ्या अडचणींबाबत बैठक | १. व्यवस्थापकीय संचालक, महाआयटी महामंडळ<br>२. प्रकल्प अधिकारी, महाआयटी महामंडळ |
| २७. | १४.०७.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगातील रिक्त पदाबाबत चर्चा | १. अपर मुख्य सचिव (प्र. सु. र. व का.), सामान्य प्रशासन विभाग यांचे अध्यक्षतेखाली<br>२. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| २८. | १८.०७.२०२२<br>मुंबई | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बैठक | १. सह सचिव, महिला व बाल कल्याण विकास<br>२. उप सचिव, क्रीडा, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग<br>३. उप सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग<br>४. सल्लागार, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>५. प्रशासकीय अधिकारी, सीईटी सेल<br>६. उप आयुक्त, WCD, पुणे<br>७. सहा. आयुक्त, ICDS<br>८. उप सचिव, (तां), उच्च व तंत्रशिक्षण विभाग<br>९. व्यवसाय विश्लेषक, महाआयटी महामंडळ<br>१०. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| २९. | २०.०७.२०२२<br>मुंबई | राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सेवांविषयक बैठक | १. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क<br>२. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ३०. | २१.०७.२०२२<br>मुंबई | आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्यांक विभाग,कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत अधिनियमाच्या प्रभावी | १. उप सचिव, आदिवासी विकास विभाग<br>२. उप सचिव, रस्ते, सार्वजनिक बांधकाम विभाग<br>३. उप सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अंमलबजावणीसाठी बैठक | ४. उप सचिव, कौशल्य विकास विभाग<br>५. सल्लागार, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>६. विभाग प्रमुख, महाआयटी महामंडळ<br>७. व्यवसाय विश्लेषक/ प्रकल्प व्यवस्थापक, महाआयटी महामंडळ<br>८. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ३१. | २१.०७.२०२२<br>मुंबई | एन.आय.सी. व महाआयटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत ऑनलाईन सेवांबाबत बैठक | १. अधिकारी एन.आय.सी.<br>२. सल्लागार, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>३. व्यवसाय विश्लेषक, महाआयटी महामंडळ<br>४. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ३२. | २६.०७.२०२२<br>पुणे | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे भेट व आढावा बैठक | १. जिल्हाधिकारी, पुणे, श्री. राजेश देशमुख<br>२. जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी<br>३. सर्व विभागांचे कार्यालय प्रमुख |
| ३३. | २९.०७.२०२२<br>मुंबई | सुशासन संबंधी (व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे) बैठक | १. केंद्र शासनाचे अधिकारी<br>२. विभागाचे विभाग प्रमुख |
| ३४. | ०२.०८.२०२२<br>मुंबई | ग्रामविकास विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, विधी व न्याय विभाग, गृहनिर्माण विभाग आणि मृद व जलसंधारण विभागाच्या सेवांबाबत बैठक | १. सह सचिव, विधि व न्याय विभाग<br>२. सह सचिव, मृद व जलसंधारण विभाग<br>३. निबंधक, भागीदारी संस्था, विधी व न्याय विभाग<br>४. उप सचिव, कामगार<br>५. उप सचिव, ग्रामविकास विभाग<br>६. उप सचिव, उर्जा<br>७. उप सचिव, राज्य विधी सेवा प्राधिकरण<br>८. उप सचिव, गृह निर्माण विभाग<br>९. विशेष कार्यकारी अधिकारी, उर्जा, उद्योग उर्जा व कामगार विभाग<br>१०. सक्षम प्राधिकारी, गृह निर्माण विभाग<br>११. सल्लागार, माहिती व तंत्रज्ञान |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | विभाग<br>१२. उद्योग अधिकारी, उद्योग संचालनालय<br>१३. सहा. धर्मादाय आयुक्त, मुंबई<br>१४.उप विभागीय, जलसंधारण अधिकारी<br>१५.व्यवसाय विश्लेषक/प्रकल्प व्यवस्थापक, महाआयटी महामंडळ<br>१६. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ३५. | ०३.०८.२०२२<br>मुंबई | १. परिवहन सेवा संलग्नीकरण संबंधी कार्यवाही<br>२. वित्त विभाग, जलसंपदा विभाग, सहकार , पणन व वस्त्रोद्योग विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग या विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत सेवांबाबत आढावा बैठक | १. NIC, परिवहन विभाग, दिल्ली, बंगलोर, हैद्राबाद येथील NIC अधिकाऱ्यांसमवेत व्हिडिओ कॉन्फरन्स MahaIT तंत्रज्ञान विभाग<br>२. सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग<br>३. उप सचिव, जलसंपदा विभाग<br>४. उप सचिव, सहकार व पणन विभाग<br>५. उप सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग<br>६. वरीष्ठ अभियंता, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा<br>७. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण<br>८. सल्लागार, माहिती व तंत्रज्ञान विभाग |
| ३६. | ०४.०८.२०२२ | सामान्य प्रशासन विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, पर्यावरण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक | १. कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका सांस्कृतिक विभाग<br>२. व्यवस्थापक, पर्यटन व सांस्कृतिक विभाग<br>३. सचिव, रंगभूमी मंडळ, सांस्कृतिक विभाग<br>४. उप सचिव, औषधी द्रव्ये विभाग<br>५. उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग<br>६. उप सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग<br>७. उप सचिव, पर्यटन व सांस्कृतिक विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ८. उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग<br>९. उप सचिव, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे<br>१०. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग<br>११. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ३७. | २२.०८.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवा ऑनलाईन स्वरूपात देणेबाबत बैठक | १. अपर मुख्य सचिव (प्र.सु., र. व का.) यांचे अध्यक्षतेखाली<br>२. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग<br>३. व्यवस्थापकीय संचालक, महाआयटी महामंडळ<br>४. सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग<br>५. सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग<br>६. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग |
| ३८. | २४.०८.२०२२<br>पुणे | नोंदणी महानिरीक्षक यांच्या कार्यालयात बैठक | १. माजी राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>२. श्री श्रावण हर्डीकर, नोंदणी महानिरीक्षक<br>३. नोंदणी व मुद्रांक विभागातील अधिकारी |
| ३९. | २९.०८.२०२२<br>मंत्रालय मुंबई | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी, व्यवसाय करण्याची सुविधा २०२२ Ease of Doing Business (BRAP) 2022 च्या अनुषंगाने बैठक | १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली<br>२. अपर मुख्य सचिव (प्र.सु., र. व का.), सामान्य प्रशासन विभाग<br>३. अपर मख्य सचिव, नगर विकास विभाग<br>४. प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क, गृह विभाग<br>५. प्रधान सचिव, (माहिती व तंत्रज्ञान) सामान्य प्रशासन विभाग<br>६. प्रधान सचिव, (कामगार) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग<br>७. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| ४०. | ३०.०८.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | ‘आपले सरकार’ पोर्टलमध्ये सुधारणा करण्यासाठी बैठक | १. अपर मुख्य सचिव (प्र.सु.र. व का.) यांचे अध्यक्षतेखाली<br>२. संबंधित प्रकल्प अधिकारी, महाआयटी महामंडळ |
| ४१. | ०१.०९.२०२२<br>मुंबई | उत्पादन शुल्क विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत अधिसूचित सेवांबाबत कार्यवाही करण्याबाबत बैठक | १. सह आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क<br>२. सल्लागार, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>३. ए.टी.डी.पी., नगर विकास विभाग-१, मंत्रालय, मुंबई<br>४. संबंधित प्रकल्प अधिकारी, महाआयटी महामंडळ |
| ४२. | ०५.०९.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | विभागांचा आढावा | १. अपर मुख्य सचिव (प्र.सु.र. व का.) यांचे अध्यक्षतेखाली प्रमुख अधिकारी<br>२. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>३. वैद्यकीय शिक्षण विभागाचे अधिकारी<br>४. सिडको,<br>५. नगरविकास विभाग<br>६. पशुसंवर्धन विभाग<br>७. राज्य उत्पादन शुल्क विभाग |
| ४३. | ०६.०९.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | व्यवसाय सुधारणा कृती योजना (BRAP) २०२२ अंतर्गत माहिती तंत्रज्ञान संबंधी विशिष्ट सुधारणाबाबत बैठक<br>(IT specific reforms under Business Reform Action Plan (BRAP) 2022) | १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली<br>२. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग<br>३. अपर मुख्य सचिव, महसूल<br>४. प्रधान सचिव, उद्योग विभाग<br>५. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान<br>६. प्रधान सचिव, कौशल्य व उद्योजकता विभाग<br>७. सचिव, अन्न व नागरी पुरवठा<br>८. आयुक्त, कामगार विभाग<br>९. उप सचिव, राज्य उत्पादन शुल्क<br>१०. उप सचिव, उर्जा<br>११. उप सचिव, नगर विकास<br>१२. उप सचिव, ग्रामविकास<br>१३. उप सचिव, सहकार<br>१४.व्यवस्थापक, एम.आय.डी.सी.<br>१५. इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४४. | १२.०९.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | विभागाच्या सेवां संदर्भात आढावा बैठक | अपर मुख्य सचिव (प्र.सु.र. व का.) यांचे अध्यक्षतेखाली<br>खालील विभागातील वरिष्ठ अधिकारी<br>१. गृह विभाग (परिवहन),<br>२. गृहनिर्माण विभाग- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,<br>३. मत्स्यव्यवसाय विभाग,<br>४. आदिवासी विकास विभाग |
| ४५. | १३.०९.२०२२<br>मुंबई | राजभवन | सचिव, मा. राज्यपाल कार्यालय |
| ४६. | १४.०९.२०२२<br>मुंबई | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत सर्व अधिसूचित सेवा ऑनलाईन स्वरूपात देणे या विषयाबाबत बैठक | १. अपर मुख्य सचिव, (प्र.सु. र. व का.) यांचे अध्यक्षतेखाली<br>२. माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>३. महाआयटी महामंडळ<br>४. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) |
| ४७. | १६.०९.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | १. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवा ऑनलाईन स्वरूपात देणे या विषयाबाबत बैठक<br>२. जमाबंदी आयुक्त यांच्यासोबत बैठक | १. अपर मुख्य सचिव, (प्र.सु. र. व का.) यांचे अध्यक्षतेखाली<br>२. वरिष्ठ तांत्रिक संचालक,माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>३. विभाग प्रमुख, महाआयटी महामंडळ<br>४. सल्लागार माहिती व तंत्रज्ञान विभाग |
| ४८. | १६.०९.२०२२<br>मुंबई | महासंचालक भूमी अभिलेख, जमाबंदी आयुक्त यांच्या सेवा 'आपले सरकार' पोर्टलबरोबर एकत्रीकरण करण्याबाबत बैठक | १. महासंचालक, भूमि अभिलेख<br>२. महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी<br>३. महाआयटी तंत्रज्ञ |
| ४९. | १९.०९.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची परिणामकारक अंमलबजावणीबाबत बैठक | अपर मुख्य सचिव, प्र.सु.र. व का., यांचे अध्यक्षतेखाली<br>१. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग<br>२. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग<br>३. प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग<br>४. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग<br>५. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ६. महाव्यवस्थापक, महाआयटी महामंडळ<br>७. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग |
| ५०. | २१.०९.२०२२<br>मंत्रालय, मुंबई<br>(व्हिडिओ कॉन्फरन्स) | १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी<br>२) सेवा पंधरवडा<br>३) दि. २८.०९.२०२२ रोजी माहिती अधिकार दिन साजरा करणे | १. अपर मुख्य सचिव, (प्र.सु. र. व का.) यांचे अध्यक्षतेखाली<br>२. सर्व राज्य सेवा हक्क आयुक्त, (व्हिडिओ कॉन्फरन्स)<br>३. सर्व महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, (व्हिडिओ कॉन्फरन्स)<br>४. सल्लागार, माहिती व तंत्रज्ञान विभाग |
| ५१. | २२.०९.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | प्रशासकीय सुधारणा उच्चाधिकार समिती सोबत बैठक | उच्चाधिकार समिती –<br>१. श्री. सुरेश कुमार<br>२. श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>३. श्री. ए.के. जैन<br>४. श्री. के. बी. बक्शी |
| ५२. | २६.०९.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत बैठक | १. अपर मुख्य सचिव (प्र.सु.र. व का.) यांचे अध्यक्षतेखाली<br>२. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>३. महासंचालक, बार्टी<br>४. उप सचिव, कामगार विभाग<br>५. उपायुक्त, बार्टी, पुणे<br>६. अवर सचिव, वित्त विभाग |
| ५३. | २८.०९.२०२२<br>नाशिक | १) नाशिक विभागात नागरिकांना दिल्या जाणाऱ्या ऑनलाईन व ऑफलाईन सेवांबाबत आढावा बैठक<br>२) कार्यालय जागेबाबत बैठक – | १. विभागीय आयुक्त (महसूल), नाशिक, श्री. राधाकृष्ण गमे<br>२. राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक<br>३. नाशिक विभागातील विभाग प्रमुख<br>१. विभागीय आयुक्त,<br>२.अधीक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम), दूरसंचार विभागाचे अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| ५४. | ३०.०९.२०२२<br>मुंबई | “सार्वजनिक सेवा वितरण” या अंतर्गत मा. पंतप्रधानांच्या पुरस्कार विजेत्या उपक्रमांवर ६ वी वेबिनार बैठक<br>(व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे) | १. सचिव, प्रशासकीय सुधारण व तक्रार निवारण विभाग (केंद्र सरकार)<br>२. सचिव, सार्वजनिक सेवा विभाग, (सिंगापूर सरकार)<br>३. मुख्य सचिव, अरुणाचल प्रदेश<br>४. सचिव, (कर्नाटक राज्य)<br>५. वरिष्ठ अधिकारी प्रशासकीय सुधारणा व तक्रार निवारण विभाग (केंद्र सरकार) |
| ५५. | ०४.१०.२०२२<br>मुंबई | अधिसूचित सेवांबाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने बैठक | १. उप सचिव, कौशल्य विकास विभाग<br>२. उपसचिव गृहनिर्माण<br>३. राज्य मुख्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ५६. | ०६.१०.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | व्यवसाय करण्याची सुलभता २०२२ च्या प्रलंबित सुधारणांच्या अनुषंगाने बैठक | १. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली<br>२. अपर मुख्य सचिव, (र. व का.)<br>३. अपर मुख्य सचिव, महसूल<br>४. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग<br>५. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>६. प्रधान सचिव, उद्योग विभाग<br>७. प्रधान सचिव, ऊर्जा विभाग<br>८. प्रधान सचिव, नगर विकास विभाग-२<br>९. प्रधान सचिव, कौशल्य व उद्योजकता विभाग<br>१०. प्रधान सचिव, आरोग्य विभाग<br>११. इतर विभागांचे संबंधित अधिकारी |
| ५७. | ११.१०.२०२२<br>पुणे | मा. राज्यपाल महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते नूतन राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयाचे उद्घाटन | मा. आमदार श्रीमती उमा खापरे व इतर सन्माननिय लोकप्रतिनिधी<br>मा. स्वाधीन क्षत्रिय, माजी राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त<br>राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक<br>श्री. सौरभ राव (विभागीय आयुक्त महसूल), पुणे<br>श्री. अमिताभ गुप्ता (पोलिस आयुक्त), |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पुणे<br>श्री. राजेश देशमुख (जिल्हाधिकारी), पुणे<br>श्री. विक्रम कुमार (मनपा आयुक्त), पुणे व इतर वरिष्ठ अधिकारी |
| ५८. | १३.१०.२०२२<br>मुंबई | अधिसूचित सेवांबाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने बैठक | १. उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग<br>२. सहा. आयुक्त, औषधी प्रशासन<br>३. राज्य मुख्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ५९. | १७.१०.२०२२<br>मुंबई | अधिसूचित सेवांबाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने बैठक | १. सह सचिव, कृषि व पशुसंवर्धन विभाग, नियोजन<br>२. अवर सचिव, कृषि व पशुसंवर्धन विभाग<br>३. राज्य मुख्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ६०. | २८.१०.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयासाठी गठीत प्रकल्प अंमलबजावणी समितीची सल्लागार (व्यवसाय सल्लागार) उपलब्ध करून देणेबाबत बैठक | १. अपर मुख्य सचिव, (प्र.सु. र. व का.) यांचे अध्यक्षतेखाली<br>२. प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान),<br>३. सल्लागार, (माहिती तंत्रज्ञान)<br>४. NIC चे अधिकारी/ सदस्य<br>५. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी<br>६. उप सचिव, नियोजन विभाग<br>७. उप सचिव, वित्त विभाग |
| ६१. | २८.१०.२०२२<br>मुंबई | अधिसूचित सेवांबाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने बैठक | १. सह सचिव, नगर विकास विभाग<br>२. संचालक, नगरपालिका प्रशासन<br>३. क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ<br>४. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ६२. | २८.१०.२०२२<br>मुंबई | अधिसूचित सेवांबाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने बैठक | १. सह आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग<br>२. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ६३. | ३१.१०.२०२२ | अधिसूचित सेवांबाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने सिडको, | १. सह सचिव, नगर विकास विभाग<br>२. व्यवस्थापक, सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| | मुंबई | एम.एम.आर.डी.ए. आणि नगरविकास विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक | ३. कक्ष अधिकारी, एम.एम.आर.डी.ए.<br>४. प्रकल्प अधिकारी, महाआयटी महामंडळ |
| ६४. | ०७.११.२०२२<br>मुंबई | राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयांसाठी जागा, कर्मचारीवृंद, अर्थसंकल्पीय अनुदान, मासिक अहवाल इत्यादीबाबत सर्व राज्य सेवा हक्क आयुक्त यांच्या समवेत आयोजित आयोगाची व्हिडिओ कॉन्फरन्स बैठक | १. राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर<br>२. राज्य सेवा हक्क आयुक्त, अमरावती<br>३. राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक<br>४. सह सचिव, राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, कोकण<br>५. उप सचिव, राज्य सेवा हक्क आयुक्त, पुणे<br>६. उप सचिव, राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर |
| ६५. | १६.११.२०२२<br>मंत्रालय, मुंबई | Pending Reforms under Ease of Doing Business (BRAP) – 2022 च्या अनुषंगाने बैठक | १. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली<br>२. अपर मुख्य सचिव, (प्र.सु.र. व का.)<br>३. इतर विभागाचे संबंधित अधिकारी |
| ६६. | १७.११.२०२२<br>पुणे | प्रशिक्षण कार्यक्रम नियोजन | यशदा अधिकाऱ्यांच्यासमवेत बैठक |
| ६७. | २४.११.२०२२<br>पुणे | प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत बैठक | महा संचालक, यशदा, सह संचालक, संबंधित अधिकारी |
| ६८. | ०२.१२.२०२२<br>मुंबई | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणीबाबत राज्य सेवा हक्क आयोगाची आढावा बैठक | १. राज्य सेवा हक्क आयुक्त, अमरावती<br>२. राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर<br>३. राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक<br>४. सह सचिव, राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, कोकण<br>५. उप सचिव, राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, मुंबई<br>६. उप सचिव, राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, पुणे<br>७. उप सचिव, राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर |

| | | | |
|---|---|---|---|
| ६९. | ०८.१२.२०२२<br>अहमदनगर | अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयास भेट व आढावा | निवासी उप जिल्हाधिकारी व वरिष्ठ महसूल अधिकारी |
| ७०. | ०९.१२.२०२२<br>छत्रपती संभाजी नगर | १. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीबाबत छत्रपती संभाजी नगर येथे आढावा बैठक<br>२. राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयास भेट व आढावा | ३. राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर<br>४. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजी नगर<br>५. मुख्य कार्यकारी अधिकारी, छत्रपती संभाजी नगर<br>६. पोलिस आयुक्त, जिल्हा पोलिस प्रमुख, छत्रपती संभाजी नगर<br>७. संबंधित विभागांचे विभाग प्रमुख, छत्रपती संभाजी नगर |
| ७१. | १४.१२.२०२२<br>मुंबई | महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आढावा बैठक | १. गृह विभागाचे वरिष्ठ अधिकारी<br>२. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे वरिष्ठ अधिकारी<br>३. पशुसंवर्धन विभागाचे वरिष्ठ अधिकारी<br>४. परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी<br>५. महाआयटी महामंडळाच्या संबंधित अधिकारी |
| ७२. | २९.१२.२०२२<br>मुंबई | सुशासन नियमपुस्तिका (Good Governance Mannual) बाबत आयोजित आयोगाची पुर्वतयारी बैठक (व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे) | १. राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर<br>२. राज्य सेवा हक्क आयुक्त, अमरावती<br>३. राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक<br>४. राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर<br>५. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी<br>६. मुख्य संचलन अधिकारी, महाआयटी महामंडळ |
| ७३. | ०४.०१.२०२३<br>नांदेड | डॉ. शंकरराव चव्हाण जिल्हा नियोजन भवन मध्ये आयोजित सर्व विभागांची बैठक आणि "आपले सरकार" केंद्रास भेटी | १. जिल्हाधिकारी, श्री. अभिजीत राऊत<br>२. जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ महसूल अधिकारी<br>३. जिल्हयातील विभागप्रमुख |

| | | | |
|---|---|---|---|
| ७४. | ०६.०१.२०२३<br>मुंबई | माजी मुख्य आयुक्त यांची “सुशासन नियमपुस्तिकेमध्ये समाविष्ट करावयाच्या बाबी” या विषयासंदर्भात सर्व राज्य सेवा हक्क आयुक्त यांच्या समवेत बैठक (व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे ) | १. माजी मुख्य आयुक्त, सेवा हक्क आयोग श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>२. राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर<br>३. राज्य सेवा हक्क आयुक्त, अमरावती<br>४. राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक<br>५. राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर<br>६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे<br>७. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी<br>८. मुख्य संचलन अधिकारी, महाआयटी महामंडळ |
| ७५. | १७.०१.२०२३<br>छत्रपती संभाजी नगर | १. मा. संदीपान भुमरे पालकमंत्री महोदय यांची सेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीबाबत भेट<br>२. राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर कार्यालयास भेट. | राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर<br><br>छत्रपती संभाजी नगर, राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी |
| ७६. | २३.०१.२०२३<br>व<br>२४.०१.२०२३<br>मुंबई | प्रशासकीय सुधारणा तथा तक्रार निवारण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन यांचे सहकार्याने रॉयल हॉल, नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया, लाला लजपतराय मार्ग, लोटस कॉलनी, वरळी, मुंबई ४०० ०१८ येथे आयोजित प्रादेशिक परिषद | मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे प्रमुख मार्गदर्शन<br>१. भारत सरकार नवी दिल्ली येथील वरिष्ट अधिकारी<br>२. अतिरिक्त मुख्य सचिव (र. व का.)<br>३. राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी<br>४. विविध राज्यांचे प्रतिनिधी |
| ७७. | ०१.०२.२०२३<br>मुंबई | “आपले सरकार” पोर्टलवर उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या (MSBTE सह) सेवा अधिसूचित करण्याबाबत महाआयटीकडून प्राप्त प्रस्तावाबाबत बैठक | १. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई<br>२. उप सचिव, तांत्रिक शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण विभाग<br>३. उप सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग<br>४. उप सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ५. प्रकल्प अधिकारी, महाआयटी महामंडळ |
| ७८. | ०२.०२.२०२३<br>यशदा, पुणे | यशदा येथे प्रशिक्षण | उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी |
| ७९. | ०८.०२.२०२३<br>छत्रपती संभाजी नगर | १. प्रशिक्षण कार्यक्रम, छत्रपती संभाजी नगर महसूल प्रबोधिनी<br>२. जिल्हयातील प्रमुख अधिकाऱ्यासमवेत बैठक | महसूल अधिकारी यांना प्रशिक्षण<br>१. श्री.आस्तिक पांडे, जिल्हाधिकारी<br>२. पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजी नगर<br>३. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, छत्रपती संभाजी नगर<br>४. जिल्हा पोलीस अधिक्षक, छत्रपती संभाजी नगर<br>५. महसूल अधिकारी व सर्व विभाग प्रमुख, छत्रपती संभाजी नगर |
| ८०. | २३.०२.२०२३<br>मुंबई | भारतीय प्रशासन सेवा (अधिसंख्य अधिकारी) यांना प्रशिक्षण | भारतीय प्रशासन सेवा (अधिसंख्य अधिकारी) |
| ८१. | २४.०२.२०२३<br>छत्रपती संभाजी नगर | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी छत्रपती संभाजी नगर येथे आढावा बैठक (विभागीय आयुक्त कार्यालय) | १. विभागीय आयुक्त (महसूल), श्री. सुनील केंद्रेकर<br>२. आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, छत्रपती संभाजी नगर<br>३. छत्रपती संभाजी नगर विभागातील सर्व विभागांचे विभागप्रमुख |
| ८२. | २७.०२.२०२३<br>छत्रपती संभाजी नगर | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी व 'आपले सरकार' पोर्टलच्या अडचणींबाबात महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची आढावा बैठक | १. आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, छत्रपती संभाजी नगर<br>२. आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, नागपूर<br>३. आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती |
| ८३. | ०६.०३.२०२३<br>मुंबई | महाआयटी महामंडळासोबत अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आढावा बैठक | १. महाआयटी महामंडळ अधिकारी<br>२. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ८४. | १०.०३.२०२३ | राज्य आयुक्त सेवा हक्क आयुक्त, | १. अपर मुख्य सचिव, (प्र.सु. र. व |

| | | | |
|---|---|---|---|
| | मंत्रालय, मुंबई | नाशिक विभागाची आढावा बैठक | का.) यांचे अध्यक्षतेखाली<br>२. राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक (व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे )<br>३. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग<br>४. संबंधित अधिकारी, महाआयटी महामंडळ |
| ८५. | २०.०३.२०२३<br>मंत्रालय, मुंबई | राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर, नाशिक व कोक़ण विभागाची आढावा बैठक | १. अपर मुख्य सचिव (प्र.सु. र. व का.) यांचे अध्यक्षतेखाली<br>२. आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, नागपूर/ अ.का. कोकण विभाग<br>३. राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक (व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे )<br>४. सह सचिव, राज्य सेवा हक्क आयोग, कोकण<br>५. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |
| ८६. | २८.०३.२०२३<br>मुंबई | महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची आढावा बैठक | १. आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, छत्रपती संभाजी नगर<br>२. आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती<br>३. आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, नागपूर<br>४. आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, नाशिक<br>५. सह सचिव, राज्य सेवा हक्क आयोग, कोकण<br>६. राज्य सेवा हक्क आयोगातील अधिकारी |

## २.२ व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेतलेल्या बैठका

दिनांक १२ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सेवा हक्क कामकाजाच्या अंमलबजावणीसाठी “नियंत्रक अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले. आयोगाने सर्व राज्य लोकसेवा हक्क आयुक्त व मुख्य आयुक्त कार्यालयातील सर्व अधिकारी यांच्या समवेत राज्य लोकसेवा हक्क आयोगाची नवीन कार्यालये सुरू करताना येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करण्यासाठी दि. २७.०६.२०२२ रोजी तसेच वेळोवेळी व्हिडिओ कॉन्फरन्सींगद्वारे आढावा बैठका घेतल्या. तसेच वेळोवेळी संबंधित जिल्हाधिकारी, इतर वरिष्ठ अधिकारी यांचेसमवेतही व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठका घेण्यात आल्या. सदर बैठकीत अधिनियमाच्या परिणामकारक अंमलबजावणीवर

भर देण्यात आला. अधिसूचित सेवा विहित कालावधीत पुरविण्याचे निर्देश दिले. प्रथम व द्वितीय अपिलांचा निपटारा वेळेवर करण्यावर आयोगाने अधिक भर दिला.

## २.३ बैठकांचे फलीत

सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या तसेच विभाग प्रमुखांच्या मासिक आढावा बैठकीत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम व त्याच्या अंमलबजावणीचा विषय समाविष्ट करण्यात यावा, अशी सूचना महसूल विभागीय आयुक्तांना व इतर अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

सर्व विभागांच्या सचिवांशी होणाऱ्या आढावा बैठकीत आयोगाच्या विविध शिफारशींच्या अंमलबजावणीच्या स्थितीचा आढावा घेण्यात आला. ज्या सेवांना अल्प प्रतिसाद लाभतो व ज्या सेवा अद्यापही ऑनलाईन उपलब्ध नाहीत, अशा मोठ्या प्रमाणावरील सेवांकडे सर्व सचिवांचे वारंवार लक्ष वेधण्यात आले. त्याचप्रमाणे सर्व सेवा ऑनलाईन व एकाच मंचावर उपलब्ध करण्याचे शासनाचे धोरण असण्यावर सदर आढावा बैठकीत सातत्याने भर देण्यात आला.

ऑफलाईन प्राप्त होणाऱ्या व कार्यवाही झालेल्या अर्जांची माहिती आयोगाला उपलब्ध व्हावी यासाठी अनेकदा बैठका घेण्यात आल्या. सदर माहिती संकलित करण्यासाठी आयोगाने नमुना ‘ “अ”, “ब” व “क” विहित केला आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून सदर माहिती संकलित होण्यासाठी महा.आय.टी. महामंडळाने आज्ञावली विकसित करण्याबाबत शासनाला वारंवार विनंती केली आहे. तथापि, सदरील आज्ञावली अद्याप विकसित झालेली नाही. सदर आज्ञावली विकसित करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे अशी आयोगाची अपेक्षा आहे.



पुणे विभागीय कार्यालयाचे उद्घाटन दि. ११ ऑक्टोबर २०२२ रोजी मा. राज्यपाल श्री भगतसिंहजी कोश्यारी यांचे हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी मुख्य आयुक्त (अ.का.) श्री. दिलीप शिंदे, माजी मुख्य आयुक्त श्री. स्वाधीन क्षत्रिय, विभागीय आयुक्त पुणे, श्री. सौरभ राव, मनपा आयुक्त श्री. विक्रम कुमार, जिल्हाधिकारी, पुणे, श्री. राजेश देशमुख इत्यादी.




पुणे विभागीय कार्यालयाच्या कोनशिलेचे अनावरण




पुणे विभागीय कार्यालय:उद्घाटन कार्यक्रम-क्षणचित्रे




पुणे विभागीय कार्यालयाचे उद्घाटन दि. ११ ऑक्टोबर २०२२ रोजी मा. राज्यपाल श्री भगतसिंहजी कोश्यारी यांचे हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी मुख्य आयुक्त (अ.का.) श्री. दिलीप शिंदे, माजी मुख्य आयुक्त श्री. स्वाधीन क्षत्रिय, विभागीय आयुक्त पुणे श्री. सौरभ राव, मनपा आयुक्त श्री. विक्रम कुमार, पोलीस आयुक्त, श्री. अमिताभ गुप्ता, जिल्हाधिकारी, पुणे, श्री. राजेश देशमुख, नाशिक राज्य आयुक्त श्रीमती चित्रा कुलकर्णी, इ.



पुणे विभागीय कार्यालयाचे उद्घाटन: दीप प्रज्वलन




पुणे विभागीय कार्यालयाचे उद्‌घाटन: स्वागत




पुणे विभागीय कार्यालयाचे उद्‌घाटन: स्वागत




पुणे विभागीय कार्यालयाचे उद्घाटन: कर्मचाऱ्यांसमवेत क्षणचित्रे




पुणे विभागीय कार्यालयाचे उद्घाटन: क्षणचित्रे

# सामान्यांची दप्तरदिरंगाईतून सुटका!

## १ जानेवारीपासून सर्व सेवा ऑनलाइन देण्याची शासकीय विभागांना सक्ती

सिद्धेश्वर डुकरे, लोकसत्ता

मुंबई : नागरिकांना पारदर्शक, वेळेत आणि कार्यक्षम पद्धतीने सेवा उपलब्ध करून देण्यासाठी १ जानेवारीपासून सर्व सेवा ऑनलाइन स्वरूपात देण्याची शासकीय विभागांना सक्ती करण्यात आली आहे. सर्व विभागांना मुख्य सचिवांनी तसे आदेश दिले आहेत. यानुसार महसूल विभागानेही आपल्या सर्व कार्यालय प्रमुखांना आदेश दिले आहेत. तर उर्वरित विभागांना या आदेशाची अंमलबजावणी करावीच लागणार आहे. या निर्णयाने राज्यातील नागरिकांची सरकारी दप्तरदिरंगाईतून सुटका होण्याचा



मार्ग मोकळा झाला आहे. सध्या ऑनलाइन तसेच ऑफलाइन स्वरूपात प्रशासनाकडून सेवा दिली जाते.

**“ सेवाहमी कायद्याची शंभर टक्के अंमलबजावणी करण्याचा हा प्रयत्न आहे. नजीकच्या काळात सुमारे एक हजाराच्या आसपास सेवा ऑनलाइन व कालमर्यादेत देण्याचा प्रयत्न आहे.**
**- दिलीप शिंदे,** प्रभारी मुख्य आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी या कायद्याखाली अधिसूचित केलेल्या सर्व सेवा १ जानेवारी २०२३ पासून शंभर टक्के ऑनलाइन स्वरूपात केल्या जाणार आहेत. कोणतेही कारण सांगून कोणतीही सेवा शासकीय कर्मचाऱ्यांना यापुढे ऑफलाइन देता येणार नाही. ज्या सेवा ऑनलाइन स्वरूपात देता येणार नाहीत त्याची स्पष्टीकरणासह उत्तरे ३१ डिसेंबरपर्यंत द्यावी लागणार आहेत. ऑनलाइन सेवा देण्यास टाळाटाळ केली तर कर्मचारी, कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरले जाणार आहे. सेवाहमी कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई केली जाणार आहे. वरील सबबी सांगून नागरिकांची कामे प्रलंबित ठेवण्याचे तसेच ऑफलाइन स्वरूपात सेवा देण्याचे प्रकार वाढल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

**कोणत्या सेवा उपलब्ध?**

जन्म-मृत्यूचा दाखला, नळ, वीजजोडणी, जात प्रमाणपत्र, विविध प्रकारच्या परवानग्या, मंजुरी आदींसह विविध प्रकारच्या ५०६ सेवा कालबद्ध पद्धतीने नागरिकांना देणे प्रशासनास बंधनकारक आहे. विविध विभागांच्या अधिसूचित ५०६ सेवांपैकी ४०० सेवा ऑनलाइन स्वरूपात सध्या देण्यात येतात. उरलेल्या १०६ सेवा ऑफलाइन पद्धतीने देण्यात येतात. या सेवा 'आपले सरकार पोर्टल', सेवा अधिकारांसाठी तयार करण्यात आलेले मोबाइल ॲप याद्वारे उपलब्ध आहेत. त्याचबरोबर 'आपले सरकार सेवा केंद्रां'च्या ३५ हजार केंद्रांतून या सेवा राज्यभर ऑनलाइन पद्धतीने दिल्या जातात.

लोकसत्ता Mon, 12 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71114844

माध्यम व वृत्तांत



ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालयास भेट. सोबत जिल्हाधिकारी श्री. राजेश नार्वेकर व इतर



मुंबई उपनगर जिल्हा, आढावा बैठक



मुंबई शहर जिल्हा बैठक, सोबत जिल्हाधिकारी श्री. राजीव निवतकर व इतर



प्रशासकीय विभागांच्या बैठका (१)



प्रशासकीय विभागांच्या बैठका (२)




विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे बैठक. विभागीय आयुक्त श्री. राधाकृष्ण गमे, राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक श्रीमती चित्रा कुलकर्णी व इतर अधिकारी




विभागीय कार्यालयांची वर्षपूर्ती : मुख्य सेवा हक्क आयुक्त श्री. दिलीप शिंदे (अ.का.), राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ किरण जाधव (छत्रपती संभाजी नगर), श्री. रामबाबु नरुकुल्ला (अमरावती), श्रीमती चित्रा कुलकर्णी (नाशिक), श्री. माणिक दिवे, सहसचिव (कोकण), श्री. वैशाली राज चव्हाण, उप सचिव (मुख्यालय) आणि अनुराधा खानविलकर, उप सचिव (पुणे)





यशदा, पुणे येथे मुख्य आयुक्तांद्वारा अधिकाऱ्यांना प्रशिक्षण






महसूल प्रबोधिनी, छत्रपती संभाजी नगर येथे मुख्य आयुक्तांद्वारा प्रशिक्षण



अधिसंख्य भा. प्र. से. अधिकाऱ्यांना मुख्य आयुक्त, श्री. दिलीप शिंदे यांचेद्वारा प्रशिक्षण : सर्वश्री आदीत्य जिवने, श्री. विनायक महापुरी, श्री. सत्यम गांधी, श्री. सुहास गाडे, श्रीमती करीष्मा नायर, श्रीमती मेघना कवळी व श्रीमती मिन्नू पी. एम.

## २.४ राज्य सेवा हक्क आयुक्तांच्या भेटी, बैठका व दौरे

राज्य सेवा हक्क आयोगाची राज्यात सहा विभागीय कार्यालये आहेत. सहा पैकी पाच राज्य आयुक्तांची पुढीलप्रमाणे नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. दिलीप मोहनराव शिंदे, (पुणे), श्री. अभय यावलकर (नागपूर), डॉ. किरण दत्तात्रेय जाधव (छत्रपती संभाजी नगर), श्री. रामबाबू नरुकुल्ला (अमरावती), श्रीमती चित्रा कुलकर्णी (नाशिक) या पाच राज्य सेवा हक्क आयुक्तांनी दि. ०१.१२.२०२१ पासून पदभार स्वीकारला. कोकण विभागीय राज्य सेवा हक्क आयुक्त हे पद ३१.०३.२०२३ पर्यंत भरण्यात आलेले नसल्याने राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण या पदाचा अतिरिक्त कार्यभार राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर श्री. अभय यावलकर यांना देण्यात आला.

**राज्य सेवा हक्क आयुक्तांचा संक्षिप्त अहवाल खालीलप्रमाणे:-**

### २.४.१ राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण विभाग : श्री. अभय यावलकर (अ.का.) यांच्या भेटी व बैठका

| अ. क्र. | बैठकीचा दिनांक व स्थळ | बैठकीचा विषय | उपस्थित अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | ११.०५.२०२२ ठाणे | मा. राज्य मुख्य राज्य सेवा हक्क आयुक्त, यांची | जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयास भेट | |
| २ | २२.०५.२०२२ कोकण भवन | कोकण विभागातील जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, (जिल्हा परिषद) यांची आढावा बैठक | कोकण विभागातील जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | १९.०९.२०२२ पालघर | जिल्हाधिकारी कार्यालय, पालघरची वार्षिक आढावा बैठक | जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, जिल्हा व्यवस्थापक, तालुका व्यवस्थापक, पालघर |
| | | तहसीलदार कार्यालय, पालघर येथे भेट | तहसीलदार व नायब तहसीलदार |
| | | पालघर तालूक्यातील ग्रामसेवकांची सभा | मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), गटविकास अधिकारी पंचायत समिती, पालघर व पालघर तालुक्यातील सर्व ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी |
| ४ | २०.०९.२०२३ ठाणे | जिल्हाधिकारी कार्यालय , ठाणे येथे अधिकाऱ्यांसमवेत वार्षिक आढावा बैठक | जिल्हाधिकारी, अपर जिल्हधिकारी, उप जिल्हाधिकारी (सा.प्र.), जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, महा.आय.टी. महामंडळातील जिल्हा व तालुका व्यवस्थापक |
| | | तहसीलदार कार्यालय, अंबरनाथ येथे भेट | तहसीलदार व नायब तहसीलदार |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पंचायत समिती, अंबरनाथ, ग्रामसेवक सभा | मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), गटविकास अधिकारी पंचायत समिती, अंबरनाथ व तालुक्यातील सर्व ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी |
| ५ | २४.०९.२०२२ नवी मुंबई | नवी मुंबई महानगरपालिका येथे भेट | आयुक्त, (म. न. पा.), अतिरिक्त आयुक्त, उप आयुक्त व विभागाचे विभाग प्रमुख व मनपाचे अधिकारी. |
| ६ | ०४.१०.२०२२ सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे भेट व आढावा बैठक | जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी (सा.प्र.),जिल्ह्यालील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, मुख्य कार्यकारी अधिकार, जिल्हा परिषद, जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, महा.आय.टी महामंडळातील जिल्हा व्यवस्थापक, तालुका व्यवस्थापक |
| | | ‘आपले सरकार’ सेवा केंद्र, पणदूर, ता. कुडाळ येथे भेट | तहसीलदार व केंद्र चालक |
| | | उपविभागीय अधिकारी कार्यालय, कुडाळ येथे भेट | उपविभागीय अधिकारी व तहसीलदार |
| | | तहसीलदार, कुडाळ, येथील सेतू कार्यालयास भेट | तहसीलदार व केंद्रातील कर्मचारी, |
| ७ | ०६.१०.२०२२ कुडाळ | कुडाळ येथील ग्रामसेवकांची सभा | गट विकास अधिकारी व तालुक्यातील सर्व ग्रामविकास अधिकारी /ग्रामसेवक |
| ८ | ०९.०२.२०२३ सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे भेट व आढावा बैठक | उप जिल्हाधिकारी (सा.प्र.), व जिल्हाधिकारी कार्यालयातील विभागाचे विभाग प्रमुख, जिल्हा समन्वयक महा.आय.टी. महामंडळ |
| | | ‘आपले सरकार’ सेवा केंद्र, ओरोस, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथे भेट | तहसीलदार, केंद्र चालक, जिल्हा समन्वयक महा.आय.टी. महामंडळ |
| | | तहसीलदार कार्यालय, कुडाळ येथे भेट | तहसीलदार |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | १०.०२.२०२३ सिंधुदुर्ग | 'आपले सरकार' सेवा केंद्र, काळसे, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथे भेट | नायब तहसीलदार व केंद्र चालक |
| **१०** | ११.०२.२०२३ सिंधुदुर्ग | 'आपले सरकार' सेवा केंद्र परुळे, ता.वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग येथे भेट | मंडळ अधिकारी व केंद्र चालक |




कोकण विभागातील जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची आढावा बैठक- श्री. दिलीप शिंदे, मुख्य आयुक्त (अ.का.) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सोबत श्री. अभय यावलकर राज्य आयुक्त, कोकण विभाग (अ.का.), जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व विभाग प्रमुख




जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे भेट व आढावा बैठक. राज्य आयुक्त श्री. अभय यावलकर (अ.का.) व इतर अधिकारी

**२.४.२ राज्य सेवा हक्क आयुक्त, पुणे विभाग : श्री. दिलीप शिंदे यांच्या भेटी व बैठका**

दिनांक ०१ डिसेंबर, २०२१ पासून औंध येथील पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात पुणे विभागाचे कार्यालय सुरु करण्यात आले.

**नूतन कार्यालयाचे उद्घाटन**

सदर कार्यालय पुणे महानगरपालिकेच्या शिवाजीनगर, घोले रोड प्रभाग कार्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावरील जागेत स्थलांतरीत करण्यात आले. नूतन कार्यालयाचे उद्घाटन मा.राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारीजी यांच्या शुभ हस्ते दि.११/१०/२०२२ रोजी संपन्न झाले.



आयोगाच्या पुणे येथील नुतन कार्यालयाचे उद्‌घाटन मा. राज्यपाल श्री. भगतसिंहजी कोश्यारी यांचे शुभहस्ते संपन्न झाले.

उद्‌घाटन कार्यक्रमास मुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री मा.श्री. चंद्रकांत (दादा) पाटील यांचे शुभेच्छा संदेश प्राप्त झाले. उद्‌घाटन प्रसंगी मा.सौ उमा खापरे, विधानपरिषद सदस्या, श्री.स्वाधीन क्षत्रिय, माजी मुख्य आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, श्रीमती चित्रा कुलकर्णी, राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक, श्री.सौरभ राव, विभागीय आयुक्त, पुणे विभाग, श्री.विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, श्री. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी पुणे, श्री.अमिताभ गुप्ता, पोलीस आयुक्त, पुणे शहर आणि इतर वरिष्ठ अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री.दिलीप शिंदे, मुख्य आयुक्त (अ.का.), तथा राज्य आयुक्त, सेवा हक्क आयोग, पुणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

माजी मुख्य आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग श्री.स्वाधीन क्षत्रिय यांनी उद्‌घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त केले.

**मा.राज्यपाल महोदयांनी केलेल्या मार्गदर्शनातील ठळक मुद्दे –**

"लोकप्रतिनिधी, प्रशासनातील उच्चपदस्थापासून शेवटच्या स्तरातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपण जनतेच्या सेवेसाठीच आहोत, नागरिकांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा आहे या भूमिकेतून काम करावे. जनतेच्या कल्याणासाठी शासन, प्रशासन व्यवस्थेमध्ये वेळोवेळी सुधारणा व संशोधन करावे लागेल. डिजीटायझेशनमध्ये देश अग्रेसर असून त्याचा आणखी वापर केला जावा. देश स्वतंत्र झाला

तेव्हा मर्यादित सेवा दिल्या जात होत्या. जनतेच्या कल्याणासाठी आणि सुविधेसाठी वेळोवेळी त्यात भर पडत गेली. लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेले उमेदवार सनदी सेवेत येतात. जनतेची सेवा हेच शासनाचे मुख्य काम आहे हे सर्वांनी लक्षात ठेवावे.

नागरिकांना कशा प्रकारे तत्परतेने व सुलभतेने सेवा देता येईल हे पाहणे आपले काम आहे. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी अनेक आयोग निर्माण करण्यात आले असून या आयोगांनी योग्य निर्णय घेण्याचे काम केल्यास जनतेचे कल्याण साधले जाईल. लोकसेवा हक्क अधिनियमातंर्गत राज्यात तसेच पुणे विभागात आलेल्या अर्जांपैकी ९५ टक्के अर्जांचा निपटारा झाला ही बाब प्रशंसनीय आहे. अशा प्रकारे सेवा दिल्यास नागरिकांच्या विविध समस्यांचे समाधान होऊ शकते. आलेल्या प्रत्येक अर्जावर योग्य प्रकारे निर्णय घेऊन तत्परतेने सेवा दिल्यास अपिलांची संख्याही आपोआप कमी होईल. सामान्य नागरिक हा केंद्रबिंदू ठेऊन प्रशासनाने काम करावे."

## उद्‌घाटन कार्यक्रमाचे वृत्तांकन.

सुविधा • राज्यपाल कोश्यारी यांचे आवाहन; पुणे महसुली विभागाच्या नवीन कार्यालयाचे उद्‌घाटन

### नागरिकांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ मानून काम

पुणे, (वा.) लोकप्रतिनिधी, प्रशासनातील उच्चपदस्थापासून शेवटच्या स्तरातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपण जनतेच्या सेवेसाठीच आहोत; नागरिकांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा आहे या भूमिकेतून काम करावे, असे आवाहन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी केले.

पुणे महानगरपालिकेच्या ढोले रोड क्षेत्रीय कार्यालय इमारतीमध्ये सुरू करण्यात आलेल्या राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या पुणे महसुली विभाग नवीन कार्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार उमा खापरे, विभागीय आयुक्त सौरभ राव, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग मुख्य आयुक्त दिलीप शिंदे, राज्य सेवा हक्क आयुक्त नाशिक चित्रा कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग माजी मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रिय, मनपा आयुक्त विक्रम कुमार, पुणे शहर पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख आदी उपस्थित होते.

कोश्यारी म्हणाले, देश स्वतंत्र झाला तेव्हा खूप मर्यादित सेवा दिल्या जात होत्या. पुढे जनतेचे कल्याण आणि समस्या सोडवण्यासाठी वेळोवेळी त्यात भर पडत गेली. सनदी सेवांमध्ये उत्तीर्ण झालेले तरुण उमेदवार 'पब्लिक सर्व्हिस' कमिशनमधून आले आहे, अर्थात सेवा हेच शासनाचे मुख्य काम आहे हे लक्षात घ्यायला हवे. अधिसूचित करण्यात आलेल्या ५०६ सेवांपैकी आतापर्यंत ३९२ सेवा ऑनलाईन करण्यात आल्या असून भविष्यात सर्वच सेवा ऑनलाईन करणे, आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या वाढवणे, शासनाच्या सर्व सेवांचे आपले सरकार या एकल संकेतपीठावर एकत्रिकरण करणे आदींसाठी आयोग प्रयत्नशील आहे. महत्त्वाकांक्षी उपक्रम म्हणून वयोवृद्ध तसेच आजारी नागरिकांना घरपोच सेवा उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

यावेळी अत्यंत कमी वेळेत तसेच उत्कृष्ट अंतर्गत सजावट केलेले कार्यालय उपलब्ध करुन दिल्याबद्दल मनपा आयुक्त विक्रम कुमार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास राज्य लोकसेवा हक्क आयोग, महसूल विभागाचे तसेच पुणे महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



#### सेवा हक्क कायदा आणि प्रशासनाची कामगिरी

राज्यात हा कायदा अंमलात आल्यापासून प्राप्त १२ कोटी ६६ लाख ७६ हजार प्राप्त अर्जांपैकी ११ कोटी ९७ लाख सेवा मंजूर करुन पुरवण्यात आल्या आहेत. यावर्षी १ एप्रिलपासून राज्यात सर्वाधिक २५ लाख २४ हजार सेवांचे अर्ज पुणे विभागात दाखल झाले असून सर्वाधिक २३ लाख २२ हजार सेवा मंजूर करण्यात आल्या तर २१ लाख ७२ हजार सेवांचे वेळेवर वितरण करण्यात आले आहे.

#### चांगले निर्णय घेतल्यास जनतेचे कल्याण

राज्यपाल म्हणाले, जनतेला कशा प्रकारे दिलासा देता येईल हे पाहणे आपले काम आहे. जनतेच्या समस्यांसाठी अनेक आयोग निर्माण करण्यात आले असून या आयोगांनी चांगल्या प्रकारे निर्णय घेण्याचे काम केल्यास जनतेचे कल्याण साधले जाईल. जनतेच्या कल्याणासाठी शासन, प्रशासनामध्ये सुधारणा व संशोधन करावे लागेल. डिजिटायझेशनमध्ये देश अग्रेसर असून ते पुढे न्यायचे आहे. असे त्यांनी नमूद केले.

#### पुणे विभागाची कामगिरी

पुणे विभागात 'आपले सरकार' पोर्टलवर ३७ विभागांच्या ३९२ सेवांबाबत ऑक्टोबर २०१५ पासून सप्टेंबर २०२२ पर्यंत प्राप्त २ कोटी ४३ लाख ९८ हजार अर्जांपैकी २ कोटी ३१ लाख २ हजार अर्ज (९५ टक्के) निकाली काढण्यात आले आहेत. यावर्षी पुणे विभागात पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ८ लाख ९६ हजारपैकी ८ लाख १८ हजार अर्जांचा निपटारा करण्यात आला. विभागात एकूण ९३ टक्के अर्जासंदर्भातील सेवा वेळेवर देण्यात आल्या आहेत.

#### आलेल्या अर्जांपैकी ९५ टक्के अर्जांचा निपटारा

लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत राज्यात तसेच पुणे विभागात आलेल्या अर्जांपैकी ९५ टक्के अर्जांचा निपटारा झाला ही चांगली बाब आहे. अशा प्रकारे सेवा दिल्यास जनतेच्या विविध समस्यांचे समाधान होऊ शकते. आलेल्या अर्जांवर योग्य प्रकारे निर्णय घेऊन सेवा दिल्या गेल्यास अपीलांची संख्या आपोआप कमी होईल, असेही राज्यपालांनी सांगितले.

# नागरिकांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा या भूमिकेतून काम करावे : राज्यपाल

## लोकसेवा हक्क आयोग पुणे महसुली विभाग कार्यालयाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'लोकप्रतिनिधी, प्रशासनातील उच्चपदस्थांपासून शेवटच्या स्तरातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपण जनतेच्या सेवेसाठीच आहोत. नागरिकांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा आहे या भूमिकेतून काम करावे,' असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

महापालिकेच्या ढोले रोड क्षेत्रीय कार्यालय इमारतीमध्ये सुरू करण्यात आलेल्या राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या पुणे महसुली विभाग नवीन कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. आमदार उमा खापरे, विभागीय आयुक्त सौरभ राव, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग मुख्य आयुक्त दिलीप शिंदे, चित्रा कुलकर्णी, स्वाधीन क्षत्रिय, महापालिका आयुक्त विक्रम कुमार, पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख उपस्थित होते.



सेवा हेच शासनाचे मुख्य काम आहे हे लक्षात घ्यायला हवे. जनतेला कशा प्रकारे दिलासा देता येईल हे पाहणे आपले काम आहे. जनतेच्या समस्यांसाठी अनेक आयोग निर्माण करण्यात आले असून, या आयोगांनी चांगल्या प्रकारे निर्णय घेण्याचे काम केल्यास जनतेचे कल्याण साधले जाईल. जनतेच्या कल्याणासाठी शासन, प्रशासनामध्ये सुधारणा व संशोधन करावे लागेल. डिजिटायझेशनमध्ये देश अग्रेसर असून, ते पुढे न्यायचे आहे.

**- राज्यपाल भगतसिंह कोश्यारी**

प्रास्ताविकात शिंदे यांनी सेवा हक्क अधिनियमांतर्गत राज्यात, विभागनिहाय तसेच पुणे विभागात नागरिकांना पुरवण्यात आलेल्या सेवांचा संगणकीय सादरीकरणाने आढावा सादर केला.

देशमुख म्हणाले, 'हे कार्यालय पुणे येथे योग्य व मध्यवर्ती ठिकाणी उपलब्ध करून दिले असून, कार्यालयाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम प्रशासनाइतकाच पुणे विभागातील जनतेसाठी महत्त्वाचा आहे. या कार्यालयामुळे प्रशासनाच्या कामावर चांगले नियंत्रण राहील.'

# जनतेच्या कल्याणासाठी सुधारणा आवश्यक : कोश्यारी

**पुणे, ता. ११ :** "जनतेच्या समस्यांसाठी अनेक आयोग निर्माण करण्यात आले असून या आयोगांनी चांगल्या प्रकारे काम केल्यास जनतेचे कल्याण साधले जाईल. जनतेच्या कल्याणासाठी शासन, प्रशासनामध्ये सुधारणा व संशोधन करावे लागेल," असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी येथे केले.

महापालिकेच्या घोले रोड क्षेत्रीय कार्यालय इमारतीमध्ये सुरू करण्यात आलेल्या राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या पुणे महसुली विभाग नवीन कार्यालयाच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी आमदार उमा खापरे, विभागीय आयुक्त सौरभ राव, राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त दिलीप शिंदे, नाशिकच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी, आयोग माजी मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रिय, मनपा आयुक्त विक्रम कुमार, पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख आदी उपस्थित होते.

कोश्यारी म्हणाले, "देश स्वतंत्र झाला तेव्हा खूप मर्यादित सेवा दिल्या जात होत्या. पुढे जनतेचे कल्याण आणि समस्या सोडवण्यासाठी वेळोवेळी त्यात भर पडत गेली. सनदी सेवांमध्ये उत्तीर्ण झालेले तरुण उमेदवार 'पब्लिक सर्व्हिस' कमिशनमधून आले आहे, अर्थात सेवा हेच शासनाचे मुख्य काम आहे हे लक्षात घ्यायला हवे."

क्षत्रिय म्हणाले, "सेवा हक्क कायदा नागरिकांना अधिकार, हक्क देणारा आहे. लोकांच्या दैनंदिन जीवनात लागणारे दाखले, प्रमाणपत्रे, जमीन, पाणी, वीज आदीसंबंधी सेवा सुलभतेने, वेळेत मिळाव्यात यासाठी हा कायदा उपयुक्त ठरला आहे. आयोगाने ऑनलाइन सेवांवर भर दिल्यामुळे जास्तीत जास्त सेवा गतीने देणे शक्य झाले आहे." प्रास्ताविकात शिंदे यांनी सेवा हक्क अधिनियमांतर्गत राज्यात, विभागनिहाय तसेच पुणे विभागात नागरिकांना पुरवण्यात आलेल्या सेवांचे सादरीकरण केले. डॉ. देशमुख यांनी आभार मानले.



**शिवाजीनगर : राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते मंगळवारी झाले.**

### विभागात ९३ टक्के अर्जाबाबतच्या सेवा वेळेत

पुणे विभागात 'आपले सरकार' पोर्टलवर २०१५ पासून सप्टेंबर २०२२ पर्यंत प्राप्त २ कोटी ४३ लाख ९८ हजार अर्जांपैकी २ कोटी ३१ लाख २ हजार अर्ज (९५ टक्के) निकाली काढण्यात आले. पुणे जिल्ह्यात ८ लाख ९६ हजारपैकी ८ लाख १८ हजार अर्जांचा निपटारा करण्यात आला. विभागात ९३ टक्के अर्जासंदर्भातील सेवा वेळेवर देण्यात आल्या, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

### सर्वाधिक अर्ज पुणे विभागात

राज्यात हा कायदा अमलात आल्यापासून १२ कोटी ६६ लाख ७६ हजार अर्ज आले असून त्यापैकी ११ कोटी ९७ लाख सेवा मंजूर करून पुरवण्यात आल्या आहेत. यावर्षी १ एप्रिलपासून राज्यात सर्वाधिक २५ लाख २४ हजार सेवांचे अर्ज पुणे विभागात दाखल झाले असून सर्वाधिक २३ लाख २२ हजार सेवा मंजूर करण्यात आल्या तर २१ लाख ७२ हजार सेवांचे वितरण करण्यात आले आहे.

# जनसेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा या भूमिकेतून काम करावे

- राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे आवाहन
- राज्य लोकसेवा हक्क आयोग पुणे महसुली विभाग कार्यालयाचे उद्घाटन



। पुणे : प्रतिनिधी

लोकप्रतिनिधी, प्रशासनातील उच्चपदस्थापासून शेवटच्या स्तरातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपण जनतेच्या सेवेसाठीच आहोत; नागरिकांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा आहे या भूमिकेतून काम करावे, असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

पुणे महानगरपालिकेच्या घोले रोड क्षेत्रीय कार्यालय इमारतीमध्ये सुरू केलेल्या राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या पुणे महसुली विभाग नवीन कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार उमा खापरे, विभागीय आयुक्त सौरभ राव, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग मुख्य आयुक्त दिलीप शिंदे, राज्य सेवा हक्क आयुक्त नाशिक चित्रा कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग माजी मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रिय, मनपा आयुक्त विक्रम कुमार, पुणे शहर पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख आदी उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले, देश स्वतंत्र झाला तेव्हा खूप मर्यादित सेवा दिल्या जात होत्या. पुढे जनतेचे कल्याण आणि समस्या सोडवण्यासाठी वेळोवेळी त्यात भर पडत गेली. सनदी सेवांमध्ये उत्तीर्ण झालेले तरुण उमेदवार पब्लिक सर्व्हिस कमिशनमधून आले आहेत, अर्थात सेवा हेच शासनाचे मुख्य काम आहे हे लक्षात घ्यायला हवे. जनतेच्या समस्यांसाठी अनेक आयोग निर्माण करण्यात आले असून या आयोगांनी चांगल्या प्रकारे निर्णय घेण्याचे काम केल्यास जनतेचे कल्याण साधले जाईल. जनतेच्या कल्याणासाठी शासन, प्रशासनामध्ये सुधारणा व संशोधन करावे लागेल.

क्षत्रिय म्हणाले, सेवा हक्क कायदा नागरिकांना अधिकार, हक्क देणारा आहे. लोकांच्या दैनंदिन जीवनात लागणारे दाखले, प्रमाणपत्रे, जमीन, पाणी, वीज आदीसंबंधी सेवा सुलभतेने, वेळेत मिळाव्यात यासाठी हा कायदा उपयुक्त ठरला आहे. आयोगाने ऑनलाइन सेवांवर भर दिल्यामुळे जास्तीत जास्त सेवा गतीने देणे शक्य झाले आहे. आपले सरकार सेवा केंद्रांच्या संख्येत वाढ झाल्यास नागरिकांना अजून गतीने सेवा मिळतील. नागरिकांच्या सोईसाठी सेवा केंद्रांची यादी, पत्ते प्रशासनाने जाहीर करावेत.

# राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे पुणे कार्यालय सुरू

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ११** - लोकप्रतिनिधी, प्रशासनातील उच्चपदस्थापासून शेवटच्या स्तरातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपण जनतेच्या सेवेसाठीच आहोत; नागरिकांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा आहे या भूमिकेतून काम करावे, असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

ढोले रोड क्षेत्रीय कार्यालय इमारतीमध्ये सुरू करण्यात आलेल्या राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या पुणे महसुली विभाग नवीन कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार उमा खापरे, विभागीय आयुक्त सौरभ राव, राज्य लोकसेवा हक्क आयोग मुख्य आयुक्त दिलीप शिंदे, राज्य सेवा हक्क आयुक्त नाशिक चित्रा कुलकर्णी, माजी मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रिय, मनपा आयुक्त विक्रम कुमार, पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख उपस्थित होते. जनतेच्या कल्याणासाठी शासन, प्रशासनामध्ये सुधारणा व संशोधन करावे लागेल. डिजिटायझेशनमध्ये देश अग्रेसर असून ते पुढे न्यायचे आहे, असेही कोश्यारी यावेळी म्हणाले.

अधिसूचित केलेल्या ५०६ पैकी आतापर्यंत ३९२ सेवा ऑनलाइन करण्यात आल्या असून भविष्यात सर्वच सेवा ऑनलाइन करणे, आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या वाढवणे, शासनाच्या सर्व सेवांचे आपले सरकार या एकल संकेतपीठावर एकत्रिकरण करणे आदींसाठी आयोग प्रयत्नशील आहे. महत्त्वाकांक्षी उपक्रम म्हणून वयोवृद्ध तसेच आजारी नागरिकांना घरपोच सेवा उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आल्याचे मुख्य आयुक्त शिंदे यांनी सांगितले.



सुविधा • राज्यपाल कोश्यारी यांचे आवाहन; पुणे महसुली विभागाच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन

# नागरिकांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ मानून काम

पुणे, (वा.) लोकप्रतिनिधी, प्रशासनातील उच्चपदस्थापासून शेवटच्या स्तरातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपण जनतेच्या सेवेसाठीच आहोत; नागरिकांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा आहे या भूमिकेतून काम करावे, असे आवाहन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी केले.

पुणे महानगरपालिकेच्या ढोले रोड क्षेत्रीय कार्यालय इमारतीमध्ये सुरू करण्यात आलेल्या राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या पुणे महसुली विभाग नवीन कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार उमा खापरे, विभागीय आयुक्त सौरभ राव, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग मुख्य आयुक्त दिलीप शिंदे, राज्य सेवा हक्क आयुक्त नाशिक चित्रा कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग माजी मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रिय, मनपा आयुक्त विक्रम कुमार, पुणे शहर पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख आदी उपस्थित होते.

कोश्यारी म्हणाले, देश स्वतंत्र झाला तेव्हा खूप मर्यादित सेवा दिल्या जात होत्या. पुढे जनतेचे कल्याण आणि समस्या सोडवण्यासाठी वेळोवेळी त्यात भर पडत गेली. सनदी सेवांमध्ये उत्तीर्ण झालेले तरुण उमेदवार 'पब्लिक सर्व्हिस' कमिशनमधून आले आहे, अर्थात सेवा हेच शासनाचे मुख्य काम आहे हे लक्षात घ्यायला हवे. अधिसूचित करण्यात आलेल्या ५०६ सेवांपैकी आतापर्यंत ३९२ सेवा ऑनलाईन करण्यात आल्या असून भविष्यात सर्वच सेवा ऑनलाईन करणे, आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या वाढवणे, शासनाच्या सर्व सेवांचे आपले सरकार या एकल संकेतपीठावर एकत्रिकरण करणे आदींसाठी आयोग प्रयत्नशील आहे. महत्त्वाकांक्षी उपक्रम म्हणून वयोवृद्ध तसेच आजारी नागरिकांना घरपोच सेवा उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

यावेळी अत्यंत कमी वेळेत तसेच उत्कृष्ट अंतर्गत सजावट केलेले कार्यालय उपलब्ध करुन दिल्याबद्दल मनपा आयुक्त विक्रम कुमार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास राज्य लोकसेवा हक्क आयोग, महसूल विभागाचे तसेच पुणे महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## सेवा हक्क कायदा आणि प्रशासनाची कामगिरी

राज्यात हा कायदा अंमलात आल्यापासून प्राप्त १२ कोटी ६६ लाख ७६ हजार प्राप्त अर्जांपैकी ११ कोटी ९७ लाख सेवा मंजूर करून पुरवण्यात आल्या आहेत. यावर्षी १ एप्रिलपासून राज्यात सर्वाधिक २५ लाख २४ हजार सेवांचे अर्ज पुणे विभागात दाखल झाले असून सर्वाधिक २३ लाख २२ हजार सेवा मंजूर करण्यात आल्या तर २१ लाख ७२ हजार सेवांचे वेळेवर वितरण करण्यात आले आहे.

## चांगले निर्णय घेतल्यास जनतेचे कल्याण

राज्यपाल म्हणाले, जनतेला कशा प्रकारे दिलासा देता येईल हे पाहणे आपले काम आहे. जनतेच्या समस्यांसाठी अनेक आयोग निर्माण करण्यात आले असून या आयोगांनी चांगल्या प्रकारे निर्णय घेण्याचे काम केल्यास जनतेचे कल्याण साधले जाईल. जनतेच्या कल्याणासाठी शासन, प्रशासनामध्ये सुधारणा व संशोधन करावे लागेल. डिजिटायझेशनमध्ये देश अग्रेसर असून ते पुढे न्यायचे आहे. असे त्यांनी नमूद केले.

## पुणे विभागाची कामगिरी

पुणे विभागात 'आपले सरकार' पोर्टलवर ३७ विभागांच्या ३९२ सेवांबाबत ऑक्टोबर २०१५ पासून सप्टेंबर २०२२ पर्यंत प्राप्त २ कोटी ४३ लाख ९८ हजार अर्जांपैकी २ कोटी ३१ लाख २ हजार अर्ज (९५ टक्के) निकाली काढण्यात आले आहेत. यावर्षी पुणे विभागात पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ८ लाख ९६ हजारपैकी ८ लाख १८ हजार अर्जांचा निपटारा करण्यात आला. विभागात एकूण ९३ टक्के अर्जासंदर्भातील सेवा वेळेवर देण्यात आल्या आहेत.

## आलेल्या अर्जांपैकी ९५ टक्के अर्जांचा निपटारा

लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत राज्यात तसेच पुणे विभागात आलेल्या अर्जांपैकी ९५ टक्के अर्जांचा निपटारा झाला ही चांगली बाब आहे. अशा प्रकारे सेवा दिल्यास जनतेच्या विविध समस्यांचे समाधान होऊ शकते. आलेल्या अर्जांवर योग्य प्रकारे निर्णय घेऊन सेवा दिल्या गेल्यास अपीलांची संख्या आपोआप कमी होईल, असेही राज्यपालांनी सांगितले.




कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक : सोबत आमदार श्री. प्रकाश आबिटकर, जिल्हाधिकारी श्री. राहुल रेखावार व इतर अधिकारी

**श्री. दिलीप शिंदे, मुख्य आयुक्त (अ.का.), महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई तथा राज्य आयुक्त, पुणे विभाग यांनी पुणे विभागामध्ये घेतलेल्या भेटी व बैठकांचा तपशील.**

| अ. क्र. | बैठकीचा दिनांक | बैठकीचा विषय | उपस्थित अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | दि.२२.४.२०२२ कोल्हापूर | मा. श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी, जि. कोल्हापूर, विधानसभा सदस्य ) यांनी " राज्यातील नागरिकांना शासकीय सेवा विहित वेळेत उपलब्ध होत नसल्याने राज्यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २००५ ची निर्मिती करण्यात येणे" या विषयावरील महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत शासनाने कळविल्याप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांबाबत आढावा घेण्यासाठी कोल्हापूर येथे बैठक. | मा. . श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी, जि. कोल्हापूर, विधानसभा सदस्य ) जिल्हाधिकारी श्री. राहुल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व विभागांचे विभागप्रमुख |
| २. | दि.२६.०७.२०२२ पुणे | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीबाबत आढावा बैठक. | जिल्हाधिकारी, पुणे श्री. राजेश देशमुख व सर्व विभागाचे खातेप्रमुख, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार. |

- **श्री. दिलीप शिंदे यांच्याकडे राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, मुंबई या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. (सविस्तर तपशील प्रकरण २ मधील तक्ता (२.१) समाविष्ट)**

'आपले सरकार' पोर्टलवरुन प्राप्त ऑनलाईन व ऑफलाईन तृतीय अपीले विहीत मुदतीमध्ये निकाली काढण्यात आली आहेत.



पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक : सोबत जिल्हाधिकारी श्री. राजेश देशमुख व इतर अधिकारी



यशदा, पुणे येथील प्रशिक्षण कार्यक्रम

**२.४.३ राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक विभाग : श्रीमती चित्रा कुलकर्णी यांच्या भेटी व बैठका**

| अ.क्र. | दिनांक व स्थळ | विषय | उपस्थित अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | १६/०६/२०२२ संगमनेर | प्रलंबित अर्ज/ अपील याबाबत आढावा बैठक - ता.संगमनेर, जि. अहमदनगर | तालुकास्तरीय विभाग प्रमुख |
| २ | १७/०६/२०२२ अहमदनगर | लोकसेवा हक्क कायद्याखालील प्रलंबित कामांचा आढावा - ता.जि.अहमदनगर | जिल्हास्तरीय विभाग प्रमुख |
| ३ | २४/०८/२०२२ त्रंबकेश्वर | लोकसेवा हक्क कायदयाखालील प्रलंबित कामांचा आढावा व महा-ई-सेवा केंद्र तपासणी ता.त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक | तालुकास्तरीय विभाग प्रमुख |
| ४ | २४/११/२०२२ सिन्नर | प्रलंबित अर्ज/ अपील याबाबत आढावा बैठक ता. सिन्नर, जि. नाशिक | तालुकास्तरीय विभाग प्रमुख |
| ५ | २४/११/२०२२ निफाड | आढावा बैठक ता. निफाड, जि. नाशिक | तालुकास्तरीय विभाग प्रमुख |
| ६ | २७/१२/२०२२ नंदुरबार | ऑनलाईन व ऑफलाईन अर्जांची व प्रलंबित अपिलांची बैठक ता. जि. नंदुरबार | जिल्हास्तरीय विभाग प्रमुख व अपर जिल्हाधिकारी |
| ७ | २८/१२/२०२२ साक्री | मुदतीत सेवा देण्याबाबत बैठक ता. साक्री, जि. धुळे | नगर पंचायत विभाग अधिकारी/कर्मचारी |
| ८ | २९/१२/२०२२ धुळे | प्रलंबित अपील/ अर्ज व अधिसूचित सेवांबाबत आढावा ता.जि. धुळे | जिल्हास्तरीय विभाग प्रमुख, जिल्हाधिकारी |
| ९ | ०७/०२/२०२३ चाळीसगाव | प्रथम व द्वितीय अपिलांबाबत आढावा ता. चाळीसगाव, जि. जळगाव | तालुकास्तरीय विभाग प्रमुख |
| १० | ०८/०२/२०२३ जळगाव | जिल्हाधिकारी कार्यालयात लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी बैठक जि. जळगाव | जिल्हास्तरीय विभाग प्रमुख, जिल्हाधिकारी |
| ११ | ०९/०२/२०२३ जळगाव | अधिसूचित सेवा व नाकारण्यात आलेल्या अर्जांबाबत बैठक ता.चोपडा, जि. जळगाव | पदनिर्देशित अधिकारी तथा ग्रामसेवक |
| १२ | २३/०२/२०२३ मुंबई | 'आपले सरकार' पोर्टलवर लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींबाबत | महाआयटी अधिकारी/ कर्मचारी अ.मु.स.(सा.प्र.) |

| | | | |
|---|---|---|---|
| **१३** | ०८/०३/२०२३ पारनेर | प्रथम व द्वितीय अपील प्राधिकाऱ्यांचे प्रत्यक्ष कामकाज व कार्यपध्दतीबाबत आढावा ता. पारनेर, जि. अहमदनगर | तालुकास्तरीय विभागप्रमुख |
| **१४** | ०९/०३/२०२३ अहमदनगर | अहमदनगर जिल्हा कामकाज आढावा | जिल्हास्तरीय विभागप्रमुख जिल्हाधिकारी |
| **१५** | १४/०३/२०२३ नाशिक | प्रलंबित कामकाजाचा आढावा नाशिक जिल्हा | अपर जिल्हाधिकारी, नाशिक व इतर विभागप्रमुख |




दिनांक २७,२८ व ३० जानेवारी २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाने आयुक्त, राज्य सेवा हक्क आयुक्त,नाशिक विभाग यांची घेतलेली मुलाखत



ता.चोपडा जि.जळगांव येथे पदनिर्देशित अधिकारी तथा ग्रामसेवक यांच्या बैठकीत मार्गदर्शन




मौजे पाळधी खु. ता.धरणगांव जि.जळगाव येथे शेतकरी चर्चासत्रात शेतकऱ्यांना लोकसेवा हक्क कायद्याची माहिती देताना




अहमदनगर जिल्हाधिकारी व जिल्हास्तरीय विभागप्रमुख यांच्या समवेत आढावा बैठक



# लोकसेवा हक्क कायद्यातील सेवा नागरिकांना वेळेत द्यावी

## चित्रा कुलकर्णी यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

▸ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २८ : शासकीय कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांची कामे वेळेवर व पारदर्शक पद्धतीने व्हावीत, हा लोकसेवा हक्क कायद्याचा हेतू आहे. शासनाने नागरिकांना हा हक्क दिला असून, अधिकाऱ्यांनी कायद्यात दिलेली कालमर्यादा पाळत लोकसेवा हक्क कायद्याखालील येणाऱ्या सेवा वेळेत द्याव्या, अशा सूचना नाशिक सेवा हक्क आयोगाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी अधिकाऱ्यांना केली आहे.

चित्रा कुलकर्णी

शासनाच्या वेगवेगळ्या विभागांकडून नागरिकांची कामे वेळेवर व पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा २०१५ लागू केला आहे. शासनाच्या ३१ विभागातील वेगवेगळ्या ५२ खात्यांच्या एकूण ५०६ सेवा या कायद्याखाली येतात. या सेवांसाठी कालमर्यादा घालून दिलेली आहे. यापैकी ३८७ सेवा ऑनलाइन असून, संबंधित विभागातील अधिकाऱ्यांकडे या सेवांसाठी अर्ज येतो, त्यांनी कायद्यात नमूद केल्यानुसार वेळेवर अर्जदारास विहित मुदतीत करून द्यायचे आहे. किंवा ते करता येत नसल्यास कारणासहित अर्जदारास वेळेतच कळवायचे आहे. या पद्धतीने काम न झाल्यास अर्जदार प्रथम, व्दितीय अपील दाखल करू शकतो. अपील अधिकाऱ्यांना वेळेतच अपील निकाली काढणे बंधनकारक आहे. तिथेही न्याय न मिळाल्यास तिसरे अपील सेवा हक्क आयोगाकडे करता येते.

### त्यांना ठोठावला दंड

गेल्या महिन्यात नाशिक सेवा हक्क आयोगाकडे दाखल झालेल्या धुळे जिल्ह्यातील एका तृतीय अपिलाची सुनावणी घेतल्यावर अर्जदाराचे काम करून देण्यास वर्षभराहून अधिक कालावधी लावल्याचे दिसून आले. या अक्षम्य दिरंगाईबाबत आयोगाने सेवा देणारे अधिकारी, प्रथम अपील अधिकारी यांना समज दिलेली असून त्यांना प्रत्येकी एक हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. या रक्कमेचा भरणा सुद्धा अधिकाऱ्यांनी केला आहे. आयोगाने कडक धोरण स्वीकारल्याने वेगवेगळ्या विभागातील अधिकारी सजग झाले आहेत. नगर जिल्ह्यातील एका अपील अधिकाऱ्यांनी वेळेत सेवा न देणाऱ्या अधिकाऱ्यांना पाचशे रुपये दंड लावण्याची कारवाई केली आहे, अशी माहिती आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी दिली आहे.

माध्यम वृत्तांत

### २.४.४ राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग : डॉ. किरण जाधव यांच्या भेटी व बैठका

| अ.क्र. | बैठकीचा दिनांक व स्थळ | विषय | उपस्थित अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | ११/०४/२०२२ छत्रपती संभाजी नगर | मुद्रांक उप महानिरीक्षक , छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | दुय्यम निबंधक, उप निबंधक,जिल्हा निबंधक, उप महानिरीक्षक मुद्रांक विभाग व कर्मचारी वृंद |
| २. | २९/०६/२०२२ खुलताबाद | पंचायत समिती कार्यालय, खुलताबाद, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी, कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर |
| ३. | ३०/०६/२०२२ फुलंब्री | पंचायत समिती कार्यालय, फुलंब्री, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी , कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर |
| ४. | ०१/०७/२०२२ छत्रपती संभाजी नगर | पंचायत समिती कार्यालय, छत्रपती संभाजी नगर, जि. छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी , कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर |
| ५. | ०५/०७/२०२२ गंगापूर | पंचायत समिती कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी , कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | ०५/०७/२०२२ वैजापूर | पंचायत समिती कार्यालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी , कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर |
| ७. | ०७/०७/२०२२ सिल्लोड | पंचायत समिती कार्यालय, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी , कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर |
| ८. | १२/०७/२०२२ कन्नड | पंचायत समिती कार्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी , कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर |
| ९. | १९/०७/२०२२ पैठण | पंचायत समिती कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी , कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर |
| १०. | ०७/०७/२०२२ सिल्लोड | उप विभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ चे कलम १६(१) (ख) प्रमाणे कार्यालयाची तपासणी | उप विभागीय अधिकारी, नायब तहसीलदार, अव्वल कारकून, इतर सर्व कर्मचारी वृंद |
| ११. | १२/०७/२०२२ कन्नड | उप विभागीय अधिकारी कार्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजी नगर, कार्यालयाची तपासणी | उप विभागीय अधिकारी, नायब तहसीलदार, अव्वल कारकून, इतर सर्व कर्मचारी वृंद |
| १२. | २०/०७/२०२२ बीड | उप विभागीय अधिकारी कार्यालय, बीड, जि.बीड, कार्यालयाची तपासणी | उप विभागीय अधिकारी, नायब तहसीलदार, अव्वल कारकून, इतर सर्व कर्मचारी वृंद |

| | | | |
|---|---|---|---|
| **१३.** | २०/०७/२०२२ बीड | पंचायत समिती, बीड जि.बीड, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी , कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर |
| **१४.** | २१/०७/२०२२ फुलंब्री | उप विभागीय अधिकारी कार्यालय, फुलंब्री-पैठण, जि. छत्रपती संभाजी नगर, कार्यालयाची तपासणी | उप विभागीय अधिकारी, नायब तहसीलदार, अव्वल कारकून, इतर सर्व कर्मचारी वृंद |
| **१५** | २१/०७/२०२२ वैजापूर | उप विभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर जि. छत्रपती संभाजी नगर, कार्यालयाची तपासणी | उप विभागीय अधिकारी, नायब तहसीलदार, अव्वल कारकून, इतर सर्व कर्मचारी वृंद |
| **१६** | ०२/०८/२०२२ छत्रपती संभाजी नगर | उप विभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजी नगर, जि. छत्रपती संभाजी नगर कार्यालयाची तपासणी | उप विभागीय अधिकारी, नायब तहसीलदार, अव्वल कारकून, इतर सर्व कर्मचारी वृंद |
| **१७** | १८/०८/२०२२ बदनापूर | पंचायत समिती, बदनापूर, जि.जालना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी , कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर |
| **१८** | १८/०८/२०२२ बदनापूर | तहसीलदार, बदनापूर कार्यालयाची तपासणी | तहसीलदार, नायब तहसीलदार, अव्वल कारकून, आणि कर्मचारी वृंद |
| **१९** | २५/०८/२०२२ सोयगाव | पंचायत समिती सोयगाव, ता.जि. छत्रपती संभाजी नगर आढावा बैठक | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी , कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर |
| **२०** | २७/०९/२०२२ नांदेड | जिल्हाधिकारी ,नांदेड महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक व 'आपले सरकार' सेवा केंद्रास भेट | जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार (सर्व) महाआयटी समन्वयक |
| **२१** | २७/०९/२०२२ नांदेड | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची | मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता, कृषी अधिकारी , जिल्हा आरोग्य अधिकारी, गट विकास |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अंमलबजावणी आढावा बैठक | अधिकारी (सर्व) जिल्हा परिषदांचे सर्व विभागप्रमुख |
| **२२** | २८/०९/२०२२ लातूर | जिल्हाधिकारी , लातूर व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक, 'आपले सरकार' सेवा केंद्रास भेट | जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद सर्व खाते प्रमुंख गट विकास अधिकारी (सर्व), गट व्यवस्थापक, महाआयटी समन्वयक |
| **२३** | २८/०९/२०२२ अंबाजोगाई | पंचायत समिती, अंबाजोगाई, लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी, उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई कार्यालयाची तपासणी | गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी , कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक (सर्व) 'आपले सरकार' गट व्यवस्थापक व केंद्र चालक ग्राम पंचायतस्तर उप विभागीय अधिकारी अंबाजोगाई कार्यालयाची तपासणी |
| **२४** | २२/१२/२०२२ छत्रपती संभाजी नगर | आयुक्त, शहर पोलीस छत्रपती संभाजी नगर यांचे कार्यालयात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | पोलीस आयुक्त,उपायुक्त, पोलीस स्टेशन, सर्व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ आयोगाचे कामकाज हाताळणारे अधिकारी आणि कर्मचारी |
| **२५** | २१/०१/२०२३ छत्रपती संभाजी नगर | महानगर पालिका छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | आयुक्त, अप्पर आयुक्त, उपायुक्त, विभाग प्रमुख, कर निरीक्षक, रजिस्टार जन्म मृत्यू, विवाह निबंधक, वार्ड अधिकारी, सर्व लिपीक वर्गीय कर्मचारी अधिकारी |
| **२६** | ३१/०१/२०२३ मुंबई | महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | प्रणाली विश्लेषक, कार्यपध्दती व्यवस्थापक,प्रभारी सह संचालक, उप सचिव, सचिव सर्व संबधित कर्मचारी वृंद |
| **२७** | २७/०३/२०२३ मुंबई | आयुक्त, आरोग्य सेवा मुंबई-३२ महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायद्याची अंमलबजावणी आढावा बैठक | प्रथम व व्दितीय अपीलीय अधिकारी, संचालक, सह संचालक (सर्व), उप संचालक, (रुग्णालये) सहायक संचालक,( सर्व ) कक्ष अधिकारी , सर्व संबधित कर्मचारी वृंद |



उप महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक, जि. छत्रपती संभाजी नगर व पदनिर्देशित अधिकारी यांना मार्गदर्शन




पंचायत समिती खुलताबाद, जि. छत्रपती संभाजी नगर. ग्रामीण भागातील पदनिर्देशित अधिकारी यांना मार्गदर्शन करताना



पंचायत समिती गंगापूर, जि. छत्रपती संभाजी नगर ग्रामीण भागातील पदनिर्देशित अधिकारी यांना मार्गदर्शन करताना


www.maharashtratimes.com

एकमेव नि:पक्ष वृत्तपत्र

अग्रलेख
पावसाआड लपणारे यमदूत

आजचा गणपती
श्री खडकेश्वर गणेश, राजगुरुनगर
प्रेषक : राजेंद्र सुतार, राजगुरुनगर

महाराष्ट्र टाइम्स

बुधवारचे तापमान
औरंगाबाद
कमाल ३१.७
किमान २०.६

वर्ष : ११ अंक : १७१ | औरंगाबाद । गुरुवार, ३० जून २०२२ । पाने १४ (औरंगाबाद टाइम्ससह) । शहर आवृत्ती । ₹ ३.००


# 'लोकसेवा'ची अंमलबजावणी करा

## डॉ. किरण जाधव यांचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, खुलताबाद

'राज्य सरकारने लोकसेवा हक्क अधिनियम हा क्रांतिकारी कायदा लोकांना अधिकार देण्यासाठी केला आहे. सर्व प्रशासकीय यंत्रणांनी वेळेत नागरिकांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी,' असे आवाहन औरंगाबाद विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी खुलताबाद पंचायत समिती येथे केले. पंचायत समिती कार्यालयात आयोजित राज्य लोकसेवा हक्क अधिनियमासंदर्भातील बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या वेळी गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, सहायक कक्ष अधिकारी संजीव शिंदे, विस्तार अधिकारी मंगेश शिंदे, शशिकांत ससाणे, पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी बोलताना राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव म्हणाले, 'लोकसेवा हक्क अधिनियमाच्या माध्यमातून जनतेला पारदर्शक, गतिमान आणि कालमर्यादेत प्रभावी सेवा मिळणार आहेत. या कायद्यामुळे जनतेच्या हक्कांची जपणूक होणार आहे. कार्यालयात दर्शनी भागात या कायद्याच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सेवांची आणि कालमर्यादेची माहिती लावणे बंधनकारक आहे. लोकसेवा हक्क अधिनियम कायद्याबाबत औरंगाबाद विभागातील सर्व जिल्ह्यात 'आमचे कर्तव्य, आपली सेवा' या भावनेने नागरिकांना वेळेत सेवा देण्याचे कार्य सुरू आहे. नागरिकांना सेवा देण्यासाठी प्रशासन कायम तत्पर आहे.'

'महाराष्ट्रात ३२ हजार आपले सरकार सेवा केंद्रे कार्यरत आहेत. लोकसेवा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग काम करीत आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये नागरिकांना सेवेचा हक्क देणारा क्रांतिकारी कायदा म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ होय. या कायद्यान्वये राज्याच्या नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबद्ध सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली,' अशी माहिती त्यांनी दिली.

'या कायद्याअंतर्गत कोणत्या सेवा नागरिकांना प्राप्त करून घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे, याची माहिती आपण 'आरटीएस महाराष्ट्र' या मोबाइल ॲपवर किंवा 'आपले सरकार' वेब पोर्टलवर पाहू शकता. सेवा प्रदान करताना विलंब झाल्यास किंवा संयुक्तिक कारण नसताना सेवा नामंजूर करण्यात आली तर नागरिक प्रथम, द्वितीय अपील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे व तिसरे आणि शेवटचे अपील आयोगाकडे दाखल करू शकतात,' असे जाधव यांनी स्पष्ट केले.

या वेळी सेवा ॲपबाबत माहिती देण्यात आली. सेवा अधिकार, अधिनियम, आपली सेवा, आमचे कर्तव्य याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीसाठी तालुक्यातील ग्रामसेवक, संगणक परिचालक उपस्थित होते. या वेळी जाधव यांनी या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

माध्यम वृत्तांत




पंचायत समिती कन्नड, जि. छत्रपती संभाजी नगर व ग्रामीण भागातील पदनिर्देशित अधिकारी यांना मार्गदर्शन करताना



पंचायत समिती पैठण, जि. छत्रपती संभाजी नगर व ग्रामीण भागातील पदनिर्देशित अधिकारी यांना मार्गदर्शन करताना




पंचायत समिती वैजापूर जि. छत्रपती संभाजी नगर व ग्रामीण भागातील पदनिर्देशित अधिकारी यांना मार्गदर्शन करताना




पंचायत समिती, सोयगाव जि. छत्रपती संभाजी नगर येथील पदनिर्देशित अधिकारी यांना मार्गदर्शन करताना




पंचायत समिती बदनापूर जि. जालना व ग्रामीण भागातील पदनिर्देशित अधिकारी यांना मार्गदर्शन करताना

वृत्तपत्राचे नांव – गुरुधर्म

दिनांक :– २९ सप्टेंबर २०२२

# लोकसेवा हक्क कायद्याच्या माध्यमातून नागरिकांना सशक्त करण्याची जबाबदारी लोकसेवकांची : डॉ. किरण जाधव




लातूर दि.२८ : नागरिकांना लोकसेवा हक्क कायद्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील व ग्रामीण भागातील नागरिकांना सशक्त करण्याची जबाबदारी लोकसेवकाच्या असल्याचे औरंगाबाद लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी प्रतिपादन केले. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान आयोजित करण्यात आलेला सेवा पंधरवाडा आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, लातूर महानगर पालिकेचे आयुक्त अमन मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांची उपस्थिती होती. दि. १७ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबर या कालावधीत राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता हा सेवा पंधरवाडा राबविला जात असून या अंतर्गत विशेष प्राधान्याने निकाली काढावयाच्या अधिसूचित सेवाबाबतचा तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या डी.पी.डी.सी. सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

औरंगाबाद लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव मार्गदर्शन करताना म्हणाले की, विहीत कालावधीत नागरिकांना सेवा उपलब्ध करून देणे आपले कर्तव्य असून त्यामधील अडचणी स्थानिकरे दूर करून त्यांची अंमलबजावणीत प्रलंबितता राहू नये, याबाबत तत्पर कार्यवाही करण्याचे सुचित केले. नागरिकांना विविध सेवा पुरविण्यासाठी संधी आपल्याला लाभलेली आहे. याची जाणीव ठेवून प्रत्येकाने काम करण्याची गरज असल्याचे अधोरेखित करीत आयुक्त किरण जाधव यांनी कोणताही अर्ज नाकारण्यापूर्वी त्या अर्जदाराला आवश्यक त्या सर्व संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, असे मत व्यक्त केले. सेवा पंधरवाड्याच्या कालावधीत प्रलंबित अर्ज नागरिकांना सेवा पुरवून निकाली काढावेत असेही त्यांनी यावेळी सूचना केल्या.

जिल्हा प्रशासन शासकीय सेवक म्हणून सेवा देत आहोतच. नागरी सेवा हक्क कायदा याबाबतही त्यांनी यावेळी सविस्तर मार्गदर्शन केले. जग हे माहिती तंत्रज्ञान माध्यमातून पारदर्शकपणे पुढे जात आहे. तसेच आपले सरकार महा-ऑनलाईनच्या माध्यमातून सेवा देत आहे. प्रशासनाकडून नागरिकांना उत्तम सेवा कशी देता येईल. यासाठी सर्व देशांनी एकत्रित प्रयत्न करून हा बदल घडवून आणण्याचेही त्यांनी सांगितले.

(पान ४ वर)

माध्यम वृत्तांत



पंचायत समिती बीड व ग्रामीण भागातील पदनिर्देशित अधिकारी यांना मार्गदर्शन करताना

### २.४.५ राज्य सेवा हक्क आयुक्त, अमरावती विभाग : श्री. रामबाबू नरुकुल्ला यांच्या भेटी व बैठका

| अ.क्र. | बैठकीचा दिनांक व स्थळ | बैठकीचा विषय | उपस्थित अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | दि.०२.०५.२०२२ यवतमाळ | जिल्हाधिकारी, यवतमाळ कार्यालयाला भेट. जिल्हा यंत्रणेतील विविध विभागांतर्गत प्राप्त अर्ज/ अपील, नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत आढावा. | जिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील सर्व विभागातील अधिकारी |
| २. | दि.१६.०५.२०२२ वाशिम | जिल्हाधिकारी, वाशिम कार्यालयाला भेट. जिल्हा यंत्रणेतील विविध विभागांतर्गत प्राप्त अर्ज/ अपील, नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत आढावा. | जिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील सर्व विभागातील अधिकारी |
| ३. | दि.०६.०६.२०२२ बुलढाणा | जिल्हाधिकारी, बुलढाणा कार्यालयाला भेट. जिल्हा यंत्रणेतील विविध विभागांतर्गत प्राप्त अर्ज/ अपील, नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत आढावा. | जिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील सर्व विभागातील अधिकारी |
| ४. | दि.०४.०७.२०२२ अकोला | जिल्हाधिकारी, अकोला कार्यालयाला भेट. जिल्हा यंत्रणेतील विविध विभागांतर्गत प्राप्त अर्ज/ अपील, नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत आढावा. | जिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील सर्व विभागातील अधिकारी |
| ५. | दि.२४.०८.२०२२ अमरावती | जिल्हाधिकारी, अमरावती कार्यालयाला भेट. जिल्हा यंत्रणेतील विविध विभागांतर्गत प्राप्त | जिल्हाधिकारी व महसूल विभागातील सर्व प्रमुख |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अर्ज/ अपील, नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत आढावा. | अधिकारी उपस्थित होते. |
| **६.** | दि.०६.०६.२०२२ बुलढाणा | जिल्हा परिषद, बुलढाणा येथे भेट. सदर बैठकीमध्ये प्राप्त अर्ज, सेवा दिलेले अर्ज व प्रलंबित अर्जांचा आढावा. | जिल्हापरिषद मुख्यालयातील विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व गटविकास अधिकारी |
| **७.** | दि.०४.०७.२०२२ अकोला | जिल्हा परिषद, अकोला येथे भेट. सदर बैठकीमध्ये प्राप्त अर्ज, सेवा दिलेले अर्ज व प्रलंबित अर्जांचा आढावा. | जिल्हापरिषद मुख्यालयातील विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व गटविकास अधिकारी |
| **८.** | दि.२०.०७.२०२२ अमरावती | विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती येथे भेट व कृषी विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची संख्या, प्राप्त अर्ज, सेवा दिलेले अर्ज व प्रलंबित अर्जांबाबत आढावा. | अमरावती विभागीतील सर्व जिल्ह्यातील कृषी अधिक्षक यांचे प्रतिनिधी |
| **९.** | दि.२१.०७.२०२२ वाशिम | जिल्हा परिषद, वाशिम येथे भेट. सदर बैठकीमध्ये प्राप्त अर्ज, सेवा दिलेले अर्ज व प्रलंबित अर्जांचा आढावा. | जिल्हापरिषद मुख्यालयातील विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व गटविकास अधिकारी |
| **१०.** | दि.२१.०७.२०२२ वाशिम | नगर परिषद, वाशिम येथे भेट. नगर परिषद मार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची संख्या, प्राप्त अर्ज, सेवा दिलेले अर्ज व प्रलंबित अर्जांबाबत आढावा. | नगर परिषद, मुख्याधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी |
| **११.** | दि.०८.०९.२०२२ अमरावती | जिल्हा परिषद, अमरावती येथे भेट. प्राप्त अर्ज, सेवा दिलेले अर्ज व प्रलंबित अर्जांचा आढावा. | जिल्हापरिषद मुख्यालयातील विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व गट विकास अधिकारी |
| **१२.** | दि.१४.१०.२०२२ यवतमाळ | जिल्हा परिषद, यवतमाळ येथे भेट. सदर बैठकीमध्ये प्राप्त अर्ज, सेवा दिलेले अर्ज व प्रलंबित अर्जांचा आढावा. | जिल्हापरिषद मुख्यालयातील विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व गट विकास अधिकारी |
| **१३.** | दि.०६.०६.२०२२ बुलढाणा | नगर परिषद, बुलढाणा येथे भेट. नगरपरिषदेमार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची संख्या, प्राप्त अर्ज, सेवा दिलेले अर्ज व प्रलंबित अर्जांबाबत आढावा. | नगर परिषद मुख्याधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी |
| **१४.** | दि.०४.०७.२०२२ अकोला | महानगरपालिका, अकोला येथे भेट. महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची संख्या, प्राप्त अर्ज, सेवा दिलेले अर्ज | महानगरपालिका आयुक्त व विविध विभागाचे प्रमुख अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | व प्रलंबित अर्जांबाबत आढावा. | |
| **१५.** | दि.२९.०९.२०२२ | महानगरपालिका अमरावती येथे भेट. महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारे सेवांची संख्या, प्राप्त अर्ज, सेवा दिलेले अर्ज व प्रलंबित अर्जांबाबत आढावा. | महानगरपालिका आयुक्त व विविध विभागाचे प्रमुख अधिकारी |
| **१६.** | दि.१४.१०.२०२२ यवतमाळ | नगर परिषद, यवतमाळ येथे भेट. सदर बैठकीच्या वेळी नगरपरिषद मार्फत देण्यात येणारे सेवांची संख्या , प्राप्त अर्ज, सेवा दिलेले अर्ज व प्रलंबित अर्जांबाबत आढावा घेण्यात आला. | मुख्याधिकारी व नगर परिषदेच्या विविध विभागांचे प्रमुख |
| **१७.** | दि.२०.१०.२०२२ अमरावती | डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती येथे भेट देऊन सहायक लेखाधिकारी व लेखाधिकारी यांचे पदोन्नती नंतरचे प्रशिक्षण सत्रात त्यांना संबोधित करण्यात आले. | सदर प्रशिक्षणामध्ये सहायक लेखाधिकारी व लेखाधिकारी प्रशिक्षणार्थी |
| **१८.** | दि.२४.११.२०२२ अमरावती | डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती येथे भेट देऊन अव्वल कारकून यांच्या पदोन्नती नंतरच्या प्रशिक्षण सत्रात त्यांना संबोधित करण्यात आले. | सदर प्रशिक्षणामध्ये अव्वल कारकून प्रशिक्षणार्थी |
| **१९.** | दि.१९.१२.२०२२ मोर्शी | उप विभागीय अधिकारी कार्यालय, मोर्शी कार्यालयास भेट व प्रलंबित अर्जांचा आढावा. | उप विभागीय अधिकारी, मोर्शी व तहसीलदार मोर्शी उपस्थित |
| **२०.** | दि.१९.१२.२०२२ मोर्शी | गट विकास अधिकारी कार्यालय, मोर्शी येथे भेट. ग्रामीण स्तरावर सेवा प्रदान करण्याबाबतचा आढावा. | गटविकास अधिकारी, मोर्शी व त्यांच्या अधिनस्त अधिकारी |
| **२१.** | दि.१९.०१.२०२३ अकोला | जिल्हा परिषद, अकोला येथे भेट. 'आपले सरकार' पोर्टल, Mahaegram portal वर तालुका/ सेवा निहाय प्राप्त निपटारा केलेला व प्रलंबित अर्ज तसेच ऑफलाईन प्राप्त अर्ज, याबाबतचा आढावा. | जिल्हापरिषद मुख्यालयातील विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व गटविकास अधिकारी |
| **२२.** | दि.१९.०१.२०२३ अकोला | जिल्हाधिकारी, अकोला या कार्यालयास भेट. सन २०२२-२३ या वर्षात निपटारा केलेल्या व प्रलंबित अर्ज तपशिलांचा आढावा. | जिल्हाधिकारी व इतर अधिकारी |
| **२३.** | दि.१९.०१.२०२३ अकोला | महानगरपालिका, अकोला मार्फत एकूण ५२ सेवा पुरविण्यात येत असून, त्याबाबतचा आढावा घेण्यात आला. | महापालिका आयुक्त व त्यांचे अधीनस्त विविध विभागाचे अधिकारी |
| **२४.** | दि.१५.०२.२०२३ यवतमाळ | पंचायत समिती, यवतमाळ येथे सरपंच प्रशिक्षणास भेट देऊन नवनियुक्त सरपंच यांना महाराष्ट्र लोक सेवा हक्क अधिनियम, २०१५ बाबत माहिती देण्यात आली. | सहायक गट विकास अधिकारी, यवतमाळ पंचायत समिती, मुख्याध्यापक, पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, पुसद |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आणि नवनियुक्त सरपंच |
| **२५.** | दि.१५.०२.२०२३ बाभुळगाव | पंचायत समिती, बाभुळगाव येथे सरपंच प्रशिक्षणास भेट देऊन नवनियुक्त सरपंच यांना महाराष्ट्र लोक सेवा हक्क अधिनियम, २०१५ बाबत माहिती देण्यात आली. | गट विकास अधिकारी, बाभुळगाव, पंचायत समिती, मुख्याध्यापक, पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, पुसद आणि नवनियुक्त सरपंच |



जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे भेट व कामकाजाचा आढावा



यवतमाळ पान ६

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनिमाची प्रभावी अंमलबजावणी करा–आयुक्त रामबाबु नरुकुल्ला

**✻ नागरिकांना तत्पर सेवा द्या ✻ सर्व ऑनलाईन सेवा वेळेवर पुरविण्यात याव्या ✻ प्रकरणे प्रलंबित ठेवू नये**

**यवतमाळ दि.२**
**महासागर प्रतिनिधी**

जिल्ह्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नागरिकांना ऑनलाईन सेवा विहित वेळेत तत्परतेने देवून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी, अशा सूचना राज्य लोकसेवा हक्क आयोग अमरावती विभागाचे आयुक्त रामबाबु नरुकुल्ला यांनी आज दिल्या.

लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमल बजावणीबाबत आयुक्त नरुकुल्ला यांनी आज बचत भवन येथे यवतमाळ जिल्ह्याचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, अपर जिल्हाधिकारी प्रमोदसिह दुबे, उपविभागीय अधिकारी अनिरूद्ध बक्षी, सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता मनिष राजभोज, जिल्हा नियोजन अधिकारी मुरलीनाथ वाडेकर, उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, महाआयटीचे जिल्हा समन्वयक फिरोज पठाण प्रामुख्याने उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा दिनांक २८ एप्रिल २०१५ पासून अंमलात आला आहे. या अधिनियमांतर्गत सदर अधिनियमांची जिल्हा पातळीवर प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांचे संनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी सर्व विभाग प्रमुखांकडून नियमित आढावा घेण्याचे सांगितले. तसेच सर्व विभागा प्रमुखांनी आपले सरकार पोर्टलवरील सर्व सेवा ऑलनाईन पद्धतीनेच पुरविण्याचे निर्देश दिले. कोणतेही प्रकरण प्रलंबित ठेवण्यात येवू नये असेही त्यांनी सांगितले. बैठकीला जिल्हा पुरवठा अधिकारी सुधाकर पवार, तहसिलदार कुणाल झाल्टे, मुख्याधिकारी माधुरी मडावी, अधिक्षक कृषी अधिकारी नवनाथ कोळपकर, , उपनिबंधक रमेश कटके तसेच विविध विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

माध्यम वृत्तांत




जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे भेट व कामकाजाचा आढावा




जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे भेट व कामकाजाचा आढावा



जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे भेट व कामकाजाचा आढावा





जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे भेट व कामकाजाचा आढावा



जिल्हा परिषद कार्यालय, वाशिम येथे भेट व कामकाजाचा आढावा




महानगरपालिका, अमरावती येथे भेट व कामकाजाचा आढावा

### २.५.६ राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर विभाग : श्री. अभय यावलकर यांच्या भेटी व बैठका

| अ. क्र. | दिनांक व स्थळ | विषय | उपस्थित अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | २७ एप्रिल, २०२२ विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर | 'आपले सरकार' बाबत आढावा व लोकसेवा हक्क अधिनियमाचा प्रचार व प्रसिध्दी | नागपूर विभागातील सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विभागीय उपायुक्त |
| २ | २८ एप्रिल, २०२२ पवनी जि. भंडारा | तहसील कार्यालय, सेतु केंद्रास भेट आढावा व चर्चा | तहसीलदार, पवनी, जि. भंडारा<br>केंद्र चालक व नागरीक |
| ३ | २३ जुन, २०२२ विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर | अधिनियमाची जनजागृती व प्रभावी प्रचार व प्रसिध्दी | विभागीय आयुक्त, नागपूर व उपायुक्त (महसूल) |
| ४ | २८ जुलै, २०२२ जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर | अधिनियमाची जनजागृती व प्रभावी प्रचार व प्रसिध्दी | जिल्हाधिकारी, नागपूर व निवासी उपजिल्हाधिकारी |
| ५ | ०५ सप्टेंबर, २०२२ जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर | अधिनियमाची जनजागृती व प्रभावी प्रचार व प्रसिध्दी करीता कार्यवाही करणे | जिल्हाधिकारी, नागपूर व निवासी उपजिल्हाधिकारी |
| ६ | ०८ नोव्हेंबर, २०२२ विभागीय आयुक्त कार्यालय | अधिनियमाची जनजागृती व प्रभावी प्रचार व प्रसिध्दी करीता अधिसूचित सेवांबाबत तपशीलासह फलक लावणे | विभागीय आयुक्त, नागपूर |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | १२ डिसेंबर, २०२२<br>विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर | अधिनियमाची जनजागृती व प्रभावी प्रचार प्रसिध्दी बाबत | विभागीय आयुक्त, नागपूर |
| ८ | २९ जानेवारी, २०२३<br>धापेवाडा, ता. कळमेश्वर जि. नागपूर | सेतू केंद्र व 'आपले सरकार' केंद्रास भेट आढावा व चर्चा | नायब तहसीलदार, कळमेश्वर, जि. नागपूर<br>केंद्र चालक व नागरीक |
| ९ | ०१ फेब्रुवारी, २०२३<br>कारंजा (घा), जि. वर्धा | तहसिल कार्यालय, सेतु केंद्र व 'आपले सरकार' केंद्रास भेट आढावा व चर्चा<br>नारायणराव काळे स्मृती महाविद्यालय व मानवता विकास प्रतिष्ठानद्वारे आयोजीत कार्यक्रमास संबोधन | तहसीलदार, कारंजा (घाडगे), जि. वर्धा<br>केंद्र चालक व नागरीक विद्यार्थी |








"आपले सरकार" सेवा केंद्र घाटगे, ता. कारंजा, जिल्हा वर्धा येथे भेट




राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर यांचे वर्धा येथे व्याख्यान

# प्रकरण ३:-

## ‘आपले सरकार’ सेवा पोर्टल व मोबाईल ॲप

### ३.१ ‘आपले सरकार’ सेवा पोर्टल बाबतची माहिती

नागरिकांनी संगणक किवा मोबाईल ॲपचा वापर करुन तसेच राज्यातील ३७,८९५ आपले सरकार सेवा केंद्रांचा उपयोग करून शासनाच्या विविध विभागांकडे अर्ज सादर करुन सेवा प्राप्त करण्यासाठी ‘आपले सरकार’ पोर्टल आहे. ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲपवर मराठी व इंग्रजीत उपलब्ध करण्यात आली आहे.




महाराष्ट्र राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व विहित कालावधीत लोकसेवा उपलब्ध होण्यासाठी व शासनाचे विविध विभाग, व सार्वजनिक प्राधिकरणांच्या कामकाजामध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व येण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ पारित केला.

‘आपले सरकार’ पोर्टल व मोबाईल ॲपद्वारे नागरिक खालील लाभ करून घेऊ शकतात.

- लाभ घेण्यासाठी नागरिक स्वतःचे ऑनलाईन ओळख खाते (Self Profile) निर्माण करू शकतात. एकदा स्वतःचे ओळख खाते निर्माण केल्यावर उपयोगकर्ता त्याच ओळख खात्याचा उपयोग करून आवश्यकतेनुसार सर्व अधिसूचित सेवा प्राप्त करण्यासाठी अर्ज करू शकतात.
- सदर पोर्टलचा उपयोग करून नागरिक सेवा शुल्काचे प्रदान तसेच आवश्यक दस्तऐवज, छायाचित्र सुद्धा अपलोड करू शकतात.
- अर्जदाराने नोंदणी केलेल्या ओळख खात्यात अंतिम प्रमाणपत्र जमा करण्यात येते व त्याची प्रत डिजिटल लॉकरमध्ये अग्रेषित करण्यात येते.

- नागरिक सदर ऑनलाईन पोर्टलवर आपल्या अर्जाचा मागोवा घेऊ शकतात.
- आपले सरकार सेवा पोर्टलकडून प्राप्त झालेल्या कोणत्याही ऑनलाईन प्रमाणपत्राची कोणीही त्रयस्थ व्यक्ती पडताळणी करू शकते.
- अर्जासाठी एकल क्रमांक (Unique Number) व पावती त्वरित प्राप्त होते.

### ३.१.१ स्वयंसेवा पोर्टल

'आपले सरकार' सेवा केंद्रांमधून उपलब्ध असलेल्या सर्व सेवा **https//:aaplesarkar.mahaonline.gov.in** ह्या स्वयंसेवा पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना सेवांचा जास्तीत जास्त लाभ घेता येतो. सेवांसाठी ऑनलाईन अर्ज सुलभतेने सादर करण्यासाठी व स्वतःचे ओळख खाते (Self Profile) तयार करण्यासाठी राज्यात ३७,८९५ आपले सरकार केंद्र स्थापन करण्यात आली आहेत. आपले सरकार सेवा पोर्टलची तांत्रिक रचना अशी आहे की, आपले सरकार सेवा केंद्र व आपले सरकार सेवा पोर्टल वरील सर्व सेवांची सुरुवात एकाच वेळेला करण्यात आली आहे. शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आपले सरकार सेवा पोर्टलचा कसा उपयोग करावा याचे प्रशिक्षण महा.आय.टी. महामंडळातर्फे सर्व 'आपले सरकार' सेवा केंद्रांना देण्यात येते. दि. ३१ मार्च, २०२३ पर्यंत ७१,७२,९१७ नागरिकांनी आपले सरकार पोर्टल वर स्वतःचे ओळख खाते (Self Profile) तयार केले आहेत.

### ३.१.२ प्रक्रिया सुलभीकरण

प्रक्रियांचे अंतस्थ (Back End) बाजूने एकत्रीकरण करण्यासाठी सेवा प्रक्रियेचे सुलभीकरण आवश्यक असते. प्रक्रिया सुलभीकरणाच्या अभावामुळे माहिती तंत्रज्ञानात अतिरिक्त प्रक्रियांचा स्तर निर्माण करावा लागतो. विविध विभागांच्या व महा.आय.टी. महामंडळाच्या टीम यांच्यामधील विचारमंथन सत्राद्वारे सेवा प्रक्रियेचे पुनर्अभियांत्रिकीकरण अनेक विभागांमध्ये एकाच वेळेस करण्यात आले होते. सर्व विभाग सेवा प्रक्रिया पुनर्अभियांत्रिकीकरण प्रक्रियेतून गेले आहेत.

### ३.१.३ डिजिटल कार्यप्रवाह

ज्याठिकाणी सेवा देण्याकरीता ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे त्याठिकाणी संबंधित विभागांच्या कामकाजाचा प्रवाह डिजिटल स्वरुपात होत असून ह्यात कुठेही मानवी हस्तक्षेप नाही. उदाहरणार्थ, एखाद्या नागरिकाने उत्पन्न दाखल्यासारखा दस्तऐवज प्राप्त करण्यासाठी अर्ज सादर केला असल्यास, संपूर्ण कार्यप्रवाह हा डिजिटल स्वरूपाचा असून कोठेही कागदपत्रे-नस्ती यांचा वापर नाही. अर्ज एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर फिरण्याची गरज नाही. प्रक्रियेतील सहभागी अधिकारी सेवेचा लाभ देण्यासाठी प्राप्त अर्जावर ऑनलाईन कार्यवाही करतात. आपला अर्ज कोणत्या टप्प्यावर प्रलंबित आहे, याची नागरिक ऑनलाईन तपासणी करू शकतात.




- संकेतस्थळ- **aaplesarkar.mahaonline.gov.in** ह्या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठाची माहिती
- भाषा बदलण्याचा पर्याय ( मराठी / इंग्रजी )
- लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत उपलब्ध सेवांचा विभाग निहाय तपशील
- मंजूर अर्जाची अधिप्रमाणनासाठी (Validation) पडताळणी शक्य.
- नागरिक त्यांचा अर्ज कोणत्या टप्प्यावर आहे, याचा मागोवा घेऊ शकतात.

**'आपले सरकार' पोर्टल मधील अर्जाचा मागोवा घ्या** -

"आपल्या अर्जाचा मागोवा घ्या" ह्या सुविधेद्वारे अर्जदार स्वतःच्या अर्जाचा मागोवा घेऊ शकतात. प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केल्यावर मिळालेला अर्ज क्रमांक तिथे प्रविष्ट केल्यावर उपयोगकर्ता आपण सादर केलेल्या अर्जाची सद्य:स्थिती जाणून घेऊ शकतो.




आवश्यक तो तपशील सादर केल्यावर अर्जाची सद्य:स्थिती व तपशील आपोआप दिसू लागेल .




**आपले सरकार पोर्टल वरून अधिप्रमाणित प्रमाणपत्राची सत्यता पडताळून घेण्याची कार्यपद्धती** -

कोणताही त्रयस्थ पक्षकार 'आपले सरकार' वरुन ऑनलाईन प्राप्त प्रमाणपत्राची सत्यता त्याच्या अधिप्रमाणन व वैधतेसाठी पडताळू शकतो. पडताळणीच्या प्रक्रियेत उपयोगकर्त्याने सत्यता पडताळणी खिडकीत विभागाचे नाव, प्रमाणपत्रावरील बारकोड क्रमांक प्रविष्ट करून Submit वर क्लिक करावे.

सर्व तपशील सादर केल्यावर अधिप्रमाणित प्रमाणपत्राचा तपशील सत्यता पडताळणी करण्यासाठी दिसू शकेल.

**सेवा हक्क आयोगाबाबत** - या टॅबमध्ये सेवा हक्क आयोगाबाबत थोडक्यात माहिती देण्यात आली असून नागरिक महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ व त्या अंतर्गत नियम येथून डाऊनलोड करु शकतात. मागील सर्व वर्षांचे वार्षिक अहवालही येथे उपलब्ध आहेत.




- **विभागांकडून अधिसूचित करण्यात आलेल्या सेवा** - विहित कालावधी , पदनिर्देशित अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची माहिती नागरिक येथून डाऊनलोड करू शकतात.



### ३.१.४ आपले सरकार सेवा पोर्टल वर नोंदणी करण्यासाठी टप्पे




अ) "नवीन उपयोगकर्ता ? येथे नोंदणी करा" या जोडणीला क्लिक करा.




ब) वापरकर्त्याचे नाव व संकेतशब्द नोंदणी करण्यासाठी दिलेल्या पर्यायांपैकी एका पर्यायाची निवड करावी. म्हणजेच मोबाईल **क्रमांकाची** पडताळणी करुन घेऊन किंवा **अर्जदाराने संपूर्ण माहिती** भरुन आपले ओळख खाते तयार करावे.

क) पर्याय १ - आपला मोबाईल क्रमांक द्यावा

किंवा

पर्याय २ - खालील सहा टप्प्यांमध्ये नोंदणी अर्ज भरावेत.

**पहिला टप्पा : अर्जदाराचा तपशील**




**दुसरा टप्पा : अर्जदाराचा पत्ता**




**तिसरा टप्पा - मोबाईल क्रमांक व उपयोगकर्ता नावाची पडताळणी**



**चौथा टप्पा - छायाचित्र अपलोड करावे**




**पाचवा टप्पा - ओळखीचा पुरावा (कोणताही एक )**




**सहावा टप्पा - पत्त्याचा पुरावा (कोणताही एक )**




ड) सेवेची निवड - उपयोगकर्ता नाव व संकेतशब्दाचा उपयोग करून लॉग इन केल्यावर डाव्या बाजूस आपणास कृषि, गृह, उद्योग, उर्जा, कामगार इत्यादी विभागांची नावे दिसतील. सदर विभागांपैकी एकाची निवड केल्यावर वापरकर्त्याला त्या विभागाच्या उपलब्ध सेवांची यादी दिसेल.




इ) अपील - अर्जदार विहित कालावधीत सेवा न पुरविल्यास किंवा न्यायोचित कारणाशिवाय अर्ज नामंजूर केल्यास, आपले सरकार पोर्टलद्वारे विभागाने विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडे प्रथम व द्वितीय अपील दाखल करू शकतात. तसेच तिसरे व अंतिम अपील आयोगाकडे दाखल करू शकतात.

## ३.२ 'आर टी एस महाराष्ट्र' या मोबाईल ॲपची माहिती

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार अधिसूचित लोकसेवेचा लाभ घेण्यासाठी "आरटीएस महाराष्ट्र" नावाचे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. नागरिक मोबाईलद्वारा ऑनलाईन अर्ज करू शकतात, आपल्या अर्जाची स्थिती जाणून घेऊ शकतात, मिळालेल्या प्रमाणपत्राची वैधता तपासू शकतात. त्यामुळे 'आपले सरकार' पोर्टल हे नागरिकांना उपयुक्त ॲप्लीकेशन झाले असून नागरिकांना कधीही व कोणत्याही ठिकाणी सेवा प्राप्त होऊ शकते. मोबाईल ॲपद्वारा सोप्या–पद्धतीने नागरिक आपल्या अर्जाचा मागोवा घेऊ शकतात. "आरटीएस महाराष्ट्र" ॲन्ड्रॉईड व आय ओ एस प्रणालीमध्ये इंग्रजी व मराठी ह्या दोन भाषांमध्ये विनामूल्य उपलब्ध आहे.

### ३.२.१ भाषा निवडा

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत प्राप्त करावयाच्या सेवांसाठी मोबाईल ॲप किंवा आपले सरकार पोर्टल वापरताना सुरवातीलाच अर्जदाराला इंग्रजी किंवा मराठी भाषा निवडण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

### ३.२.२ डॅशबोर्ड व ऑनलाईन सेवांची यादी

यामध्ये लोकसेवा हक्क अधिनियम, विभागांची यादी व अधिनियमाच्या अंतर्गत उपलब्ध सेवांची माहिती मोबाईल ॲपमध्ये देण्यात आली आहे.

भाषा निवडा




डॅशबोर्ड




सेवांचा उप संवर्ग




### ३.२.३ उप संवर्गाचे तपशील

उप संवर्गाचे तपशील




येथे प्रत्येक सेवेची माहिती देण्यात आली आहे . यामध्ये त्यासाठीची कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकाऱ्याचे पदनाम, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकाऱ्याचे पदनाम व अर्जासोबत जोडणे आवश्यक असलेल्या दस्तऐवजांची यादी, शुल्क इत्यादी आवश्यक तपशील देण्यात आला आहे.

### ३.२.४ लॉग इन व नोंदणी

मोबाईल ॲपद्वारे वापरकर्ता दोन पद्धतीने नोंदणी करू शकतो. एक म्हणजे आधार क्रमांक किंवा तपशिलवार नोंदणीद्वारे :-

लॉग इन




नोंदणी




### ३.२.५ मागोवा घ्या / पडताळणी करा / संपर्क साधा

ऑनलाईन पोर्टलद्वारे वापरकर्ता आपल्या अर्जाचा मागोवा घेऊ शकतो किंवा त्रयस्थ व्यक्ती आपले सरकार पोर्टल कडून प्राप्त प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करू शकते.

मागोवा घ्या




पडताळणी करा




संपर्क साधा




**३.२.६** खाली टोल फ्री क्रमांक दिला आहे, त्या क्रमांकावर नागरिक सेवा हक्क कायद्यांतर्गत २४x७ कोणतीही मदत मागू शकतात.

| Toll free No. – १८०० १२० ८०४० |
|---|

### ३.२.७ फायदे







### ३.२.८ अर्जदाराने केलेल्या अर्जांची माहिती

पूर्वीचे व्यवहार या पर्यायाद्वारे वापरकर्ता आपल्या पूर्वीच्या अर्जांची माहिती व सद्य:स्थिती पाहू शकतो.






## ३.३ 'आपले सरकार' पोर्टलवरील नोंदणीमध्ये लक्षणीय वाढ

ऑनलाईन सेवांचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराने 'आपले सरकार' पोर्टलवर फक्त एकदाच नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी केल्यानंतर अर्जदार स्वतः अधिसूचित सेवेसाठी ऑनलाइन अर्ज करू शकतो. हे अत्यंत उल्लेखनीय आहे की, आपले सरकार पोर्टलवर नोंदणी केलेल्या नागरिकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. कोविड-१९ महामारीच्या काळात आपले सरकार आरटीएस पोर्टलवर नोंदणीकृत नागरिकांच्या संख्येत २८ लाखांवरून मार्च २०२१ पर्यंत ४२ लाख आणि मार्च २०२३ पर्यंत ७१,७२,९१७ इतकी लक्षणीय वाढ झाली आहे.

सार्वजनिक सेवांसाठी ऑनलाईन अर्जांची संख्या झपाट्याने वाढत आहे हे उत्साहवर्धक आहे. सार्वजनिक सेवांसाठी २०२२-२३ या कालावधीत १५,०२,७६७ अर्जदारांनी नोंदणी केली आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या कलम ७ नुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन निर्धारित वेळेच्या मर्यादेत सार्वजनिक सेवा वितरीत करण्यासाठी शासन प्रोत्साहित करेल अशी तरतूद आहे. आयोगाने वरील तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी आग्रह धरला आहे.




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)

## प्रकरण ४ :-

# लोकसेवा हक्काचा नागरिकांकडून उपयोग

### ४.१ विभागवार अधिसूचित सेवा

दि. ३१.०३.२०२३ पर्यंत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत एकूण ३१ विभागांपैकी २८ विभागांनी ५२९ सेवा अधिसूचित केल्या आहेत. गृह व परिवहन विभाग (९१), उद्योग, कामगार व उर्जा विभाग (८०), महसूल व वन विभाग (६८), नगर विकास विभाग (५५) या चार विभागांनी जास्त सेवा अधिसूचित केल्या आहेत. संसदीयकार्य विभाग, मराठी भाषा विभाग व कौशल्य विकास, उद्योजकता विभाग - या तीन विभागांनी कोणत्याही सेवा अधिसूचित केलेल्या नाहीत.

**तक्ता ४.१ :- दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी अधिसूचित सेवांची विभागवार यादी**

| अ. क्र. | विभागाचे नाव | उपविभागाचे नाव | एकूण अधिसूचित सेवा |
|---|---|---|---|
| १ | गृह व परिवहन विभाग | गृह विभाग | १८ |
| | | परिवहन विभाग | १४ |
| | | राज्य उत्पादन शुल्क | ५२ |
| | | महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड | ०७ |
| २ | महसूल व वने विभाग | महसूल विभाग | २० |
| | | भूमी अभिलेख विभाग | २० |
| | | वन विभाग | १३ |
| | | नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग | १५ |
| ३ | कृषि पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, व मत्स्य व्यवसाय विभाग | कृषि विद्यापीठे | ०९ |
| | | कृषि विभाग | १६ |
| | | पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभाग | २० |
| | | मत्स्य व्यवसाय विभाग | |
| ४ | नगर विकास विभाग | नगर विकास विभाग | ५५ |
| ५ | विधी व न्याय विभाग | विधि व न्याय विभाग | ०४ |
| ६ | ग्रामविकास व पंचायतराज विभाग | ग्राम विकास व पंचायतराज विभाग | ०७ |
| ७ | मृद व जल संवर्धन विभाग | मृद व जल संधारण विभाग | ०८ |

| अ.क्र | विभागाचे नाव | उपविभागाचे नाव | एकूण अधिसूचित सेवा |
|---|---|---|---|
| ८. | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | १६ |
| ९ | गृहनिर्माण विभाग | महाराष्ट्र क्षेत्र व गृहनिर्माण विकास प्राधिकरण | १२ |
| | | मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळ | ०४ |
| | | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | ०५ |
| १० | महिला व बालविकास विभाग | महिला व बालविकास विभाग | ०८ |
| ११ | अल्पसंख्याक विभाग | अल्पसंख्याक विभाग | ०१ |
| १२ | उद्योग , कामगार व उर्जा विभाग | उद्योग विभाग | २५ |
| | | कामगार विभाग | ४१ |
| | | उर्जा विभाग | १४ |
| १३ | वित्त विभाग | राज्य वस्तू व सेवा कर विभाग | ०४ |
| १४ | जलसंपदा विभाग | जलसंपदा विभाग | १० |
| १५ | सहकार , पणन, व वस्त्रोद्योग विभाग | सहकार , पणन, व वस्त्रोद्योग विभाग | ०९ |
| १६ | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | १६ |
| | | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (GSDA) | ०२ |
| १७ | सार्वजनिक आरोग्य विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग | ०६ |
| १८ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | १२ |
| १९ | आदिवासी विकास विभाग | आदिवासी विकास विभाग | ०२ |
| २० | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | १२ |
| २१ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | वैद्यकीय शिक्षण विभाग (आयुष) | ०१ |
| | | अन्न व औषध प्रशासन | ०४ |
| २२ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | २० |
| २३ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १० |

| अ.क्र. | विभागाचे नाव | उपविभागाचे नाव | एकूण अधिसूचित सेवा |
|---|---|---|---|
| २४ | पर्यावरण विभाग | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | ०७ |
| २५ | सार्वजनिक बांधकाम विभाग | सार्वजनिक बांधकाम विभाग | ०२ |
| २६ | सामान्य प्रशासन विभाग | सामान्य प्रशासन विभाग | ०५ |
| २७ | नियोजन विभाग | नियोजन विभाग | ०२ |
| २८ | इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग | इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग | ०१ |
| २९ | संसदीयकार्य विभाग | संसदीयकार्य विभाग | निरंक |
| ३० | मराठी भाषा विभाग | मराठी भाषा विभाग | निरंक |
| ३१ | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | कौशल्य विकास व उद्योजकता | निरंक |
| | **३१** | **४६** | **५२९** |

## ४.२ विभागवार प्राप्त व कार्यवाही केलेल्या अर्जांची स्थिती

ऑक्टोबर, २०१५ ते मार्च, २०२३ ह्या कालावधीतील अर्जांचा आढावा घेतला असता सर्व ३१ विभागांनी अधिसूचित केलेल्या सेवांसाठी एकूण १३,६८,४२,९७६ अर्ज ऑनलाईन प्राप्त झाल्याचे दिसते.

आलेख ४.१ - एकूण प्राप्त अर्ज संख्या (२०१५-२३)




(स्रोत : महाआयटी महामंडळ)

**टीप** :- २०१९-२०, २०२०-२१ आणि २०२१-२२ या वर्षांमध्ये कोरोना महामारीच्या अभूतपूर्व परिस्थितीमुळे प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येत घट झाल्याचे दिसते, तसेच गाव नमुना नं. ७/१२ व ८ अ उतारा देणे या सर्वात लोकप्रिय सेवा आपले सरकार पोर्टलवरून वगळण्यात आल्यामुळे गेल्या दोन वर्षांत प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येत घट झाल्याचे दिसत आहे. या दोन सेवा महसूल विभागाच्या महाभूलेख पोर्टलवरून नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. २०२२-२३ या वर्षात प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येत वाढ झाली आहे.

### ४.२.१ कार्यवाही झालेले व प्रक्रियेत असलेले अर्ज



(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)

सन २०१५-२३ दरम्यान एकूण १३,६८,४२,९७६ अर्ज प्राप्त झाले व १२,९८,८१,५४६ अर्जांवर कार्यवाही करण्यात आली. म्हणजेच दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी ९४.४३ % अर्जांवर कार्यवाही करण्यात आली व ५.५७ % अर्जांवर कार्यवाही सुरु होती.




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)

सन २०२२-२३ दरम्यान प्राप्त एकूण २,०७,६४,३०९ अर्जांपैकी १,९०,०४,३५७ अर्जांवर कार्यवाही करण्यात आली. दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी ९१.५२% अर्जांवर कार्यवाही झाली होती व ८.४८% अर्ज प्रक्रियाधीन होते.

प्रत्येक विभागाची कामगिरी दुसऱ्या विभागापेक्षा भिन्न आहे. एकूण ३१ विभागांपैकी काही विभाग हे अर्ज प्राप्त करण्याच्या व त्यांच्या निपटाऱ्याच्या संख्येत आघाडीवर आहेत. आलेख क्रमांक ४.३ नुसार महसूल विभागाने सर्वात जास्त अर्ज प्राप्त केल्याचे व त्यावर कार्यवाही केल्याचे दिसून येते. अन्य दोन म्हणजेच कामगार विभाग व गृह विभागाची कामगिरी ही अनुक्रमे आलेख क्रमांक ४.४ व ४.५ मध्ये दर्शविली आहे ते अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर आहेत.

आलेख क्र. ४.३ सन २०२२-२३ या वर्षामध्ये महसूल विभागाने प्राप्त केलेले व कार्यवाही केलेल्या एकूण अर्जांची संख्या




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)

आलेख क्र. ४.४ सन २०२२-२३ या वर्षामध्ये कामगार विभागाने प्राप्त केलेले व कार्यवाही केलेल्या एकूण अर्जांची संख्या




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)

### ४.२.२ मंजूर व नामंजूर अर्ज

सन २०२२-२३ या वर्षाच्या कालावधीत एकूण १,९०,०४,३५७ अर्जांचा निपटारा करण्यात आला. त्यापैकी १,८९,३४,७६० म्हणजे ९९.६३ % अर्ज मंजूर करण्यात आले. त्यावरून असे दिसून येते की फक्त ०.३७% अर्ज नामंजूर करण्यात आले. अर्ज नामंजूर होण्याचे इतके कमी प्रमाण कौतुकास्पद आहे. सदर अर्जांचा तपशील आलेख क्रमांक ४.६ मध्ये दिला आहे.




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)

**मंजूर व नामंजूर अर्जांची वर्षवार संख्या आलेख क्रमांक ४.७ मध्ये दर्शविली आहे.**



(स्रोत :- महाआयटी महामंडळ दिनांक ११ ऑगस्ट, २०२३)

सदर आलेखावरुन असे दिसून येते की, सन २०१५-२३ या सर्व वर्षांत अर्ज नामंजूर करण्याचे प्रमाण सातत्याने अत्यल्प आहे म्हणजेच ते १% पेक्षा कमी आहे.

**तक्ता क्रमांक ४.२ : २०२२-२३ या कालावधीत प्राप्त, कार्यवाही केलेले, मंजूर व नामंजूर अर्जांची विभागवार यादी**

| अ.क्र. | विभाग | प्राप्त | कार्यवाही झाली | मंजूर | नामंजूर |
|---|---|---|---|---|---|
| १ | महसूल विभाग | १,७४,५७,०८० | १,६१,५८,४१२ | १,६१,२७,७६८ | ३०,६४४ |
| २ | कामगार विभाग | १२,२४,४३३ | १२,१७,८६० | १२,०८,५१६ | ९,३४४ |
| ३ | गृह व परिवहन विभाग | १०,८०,३११ | ९,६६,७१५ | ९,६६,७११ | ४ |
| ४ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | ४,९६,५९१ | २,१८,४३६ | २,१४,७१९ | ३,७१७ |
| ५ | उद्योग विभाग | २,२४,२४६ | २,२४,०८६ | २,०९,४९८ | १४,५८८ |
| ६ | ऊर्जा विभाग | ८३,९९५ | ७९,५२७ | ७४,९३९ | ४,५८८ |
| ७ | आदिवासी विकास विभाग | ६८,११५ | ६५,५९३ | ६०,०१६ | ५,५७७ |
| ८ | राज्य उत्पादन शुल्क विभाग | ४७,३१८ | ४२,६२० | ४२,४७८ | १४२ |
| ९ | ग्राम विकास व पंचायत राज विभाग | २ | २ | ० | २ |
| १० | विधि व न्याय विभाग | १८,३५९ | १,०७४ | १,०७२ | २ |
| ११ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १९,७८९ | १०,०६० | १०,०५७ | ३ |
| १२ | कृषि विभाग | १८,८१९ | ६,३४२ | ६,२८२ | ६० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **१३** | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ६,८१५ | ६,८१५ | ६,८१५ | ० |
| **१४** | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | | | | |
| **१५** | नगर विकास विभाग | ४,९९६ | ३,१२७ | २,५६३ | ५६४ |
| **१६** | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ५,२४७ | २६७ | २६३ | ४ |
| **१७** | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | २,८१७ | १,१५१ | ८७१ | २८० |
| **१८** | महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड | ३,११८ | २,००८ | १,९३३ | ७५ |
| **१९** | महिला व बालविकास विभाग | १,८०१ | १७ | १७ | ० |
| **२०** | वैध वजन माप विभाग | | | | |
| **२१** | वित्त विभाग | | | | |
| **२२** | अल्पसंख्याक विकास विभाग | १५१ | ५७ | ५४ | ३ |
| **२३** | जलसंपदा विभाग | २९९ | १८८ | १८८ | ० |
| **२४** | गृह निर्माण विभाग | ० | ० | ० | ० |
| **२५** | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | ३ | ० | ० | ० |
| | **एकूण संख्या** | **२,०७,६४,३०५** | **१,९०,०४,३५७** | **१,८९,३४,७६०** | **६९,५९७** |

(स्त्रोत :- महाआयटी दिनांक ११ ऑगस्ट, २०२३)

### ४.२.३ विहित कालावधीत कार्यवाही केलेल्या व न केलेल्या अर्जांची संख्या




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)

सन २०२२-२३ या वर्षी सर्व विभागात मिळून २,०७,६४,३०९ अर्ज प्राप्त झाले. पैकी १,९०,०४,३५७ अर्जांवर कार्यवाही केली. यापैकी ८२.२७ टक्के अर्जांवर म्हणजेच १,५६,३५००० अर्जांवर विहित

कालमर्यादेत कार्यवाही केली आहे. तर १७.७३ टक्के अर्जांवर म्हणजेच ३३,६९,३५७ अर्जांवर विहित कालमर्यादेनंतर कार्यवाही झाली.

## ४.३ राज्यामध्ये विविध माध्यमांद्वारे प्राप्त झालेल्या व निकाली काढलेल्या अर्जांची संख्या

आपले सरकार सेवा केंद्र - व्हीएलई, आपले सरकार सेवा केंद्र-सेतू, आपले सरकार पोर्टल, व आपले सरकार सेवा केंद्र - ग्राम पंचायत या माध्यमातून लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत पुढीलप्रमाणे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

**आलेख क्रमांक ४.९ सन २०२२-२३ मध्ये माध्यमनिहाय प्राप्त व कार्यवाही झालेल्या अर्जांची संख्या**




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)

आलेख क्रमांक ४.१० विहित कलावधीत प्रक्रिया केलेल्या अर्जांचे माध्यमनिहाय प्रमाण विहित वेळेत वितरण (२०२२-२३)




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)

## ४.४ अर्जांची महसूल विभागवार स्थिती

सदर आलेखात राज्याच्या सहा महसुली विभागात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत प्राप्त व निकाली अर्ज दिसून येतात. एकूण प्राप्त अर्जांपैकी सहा महसुली विभागांमध्ये पुणे महसूल विभागात सर्वात जास्त अर्ज प्राप्त होऊन त्यांच्यावर कार्यवाही झाल्याचे दिसून येते.

आलेख क्र. ४.११ सन २०२२-२३ या वर्षी महसूल विभागनिहाय प्राप्त, कार्यवाही झालेले, मंजूर व नामंजूर अर्ज




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)

## ४.५. अर्जांची जिल्हावार स्थिती

जिल्ह्यांमध्ये प्राप्त अर्जांचा आढावा घेऊन त्याचे विश्लेषण केले असता, प्राप्त व कार्यवाही झालेल्या अर्जांच्या संख्येत पुणे जिल्ह्याचा राज्यात पहिला क्रमांक दिसून येतो. सर्व जिल्ह्यांच्या कामगिरीवर खालील आलेखात दृष्टिक्षेप टाकला आहे.

**आलेख क्र.४.१२ जिल्हानिहाय प्राप्त, कार्यवाही केलेल्या व मंजूर अर्जांची संख्या**



## ४.६ महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अपिलांची स्थिती

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमानुसार अर्जदाराला विहित कालावधीत सेवा न पुरविली गेल्यास किंवा न्यायोचित कारणाशिवाय अर्ज नामंजूर केल्यास, विभागाने विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील करण्याचा हक्क आहे. प्रथम अपीलावर विहित कालावधीत कार्यवाही न झाल्यास किंवा झालेल्या कार्यवाहीने समाधान न झाल्यास, विहीत केलेल्या प्राधिकाऱ्याकडे दुसरे अपील करण्याचा हक्क आहे. त्यावरही समाधान न झाल्यास महाराष्ट्र सेवा हक्क आयोगाकडे तिसरे अपील दाखल करता येते.

* प्रथम व द्वितीय अपिलांची पुढील माहिती फक्त प्राप्त ऑनलाईन अपिलांची आहे. ऑफलाईन अपिलांची माहिती प्राप्त होऊ शकली नाही.




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)




(स्त्रोत : महाआयटी महामंडळ)

## ४.७ अधिसूचित सेवांना प्राप्त प्रतिसादाच्या आधारावर विभागांचे वर्गीकरण

अधिनियमाच्या अंतर्गत अधिसूचित लोकसेवांची संख्या विभागवार वेगवेगळी आहे. त्याचप्रमाणे प्राप्त होणाऱ्या व प्रतिसाद दिल्या जाणाऱ्या अर्जांची संख्यासुद्धा वेगवेगळी आहे. 'आपले सरकार' पोर्टलचा

उपयोग करुन अधिसूचित सेवांच्या व त्या अनुषंगाने प्राप्त अर्जांवर त्यांनी केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भाने विभागाचे वर्गीकरण केलेले आहे. हे वर्गीकरण वेगवेगळया रंगांने चिन्हांकित केले असून त्याचे निकष खालीलप्रमाणे विषद केलेले आहेत.

| क्रमांक | हिरव्या श्रेणीसाठीचे निकष |
|---|---|
| १ | अर्ज स्वीकारण्याची व निपटाऱ्याची संपूर्ण प्रक्रिया डिजीटल पद्धतीने पूर्ण करुन "आपले सरकार पोर्टलद्वारे" सेवा देण्यात येते. |
| २ | बहुतांशी सेवांना उत्तम प्रतिसाद |
| ३ | उत्तम प्रतिसाद - प्रत्येक सेवेसाठी १००० पेक्षा जास्त संख्येने अर्ज प्राप्त होतात. |
| ४ | मध्यम प्रतिसाद - प्रत्येक सेवेसाठी १००० पेक्षा कमी संख्येने अर्ज प्राप्त होतात. |
| ५ | शून्य प्रतिसाद - सेवेसाठी अर्ज प्राप्त नाहीत. |

| क्रमांक | अंबर श्रेणीसाठीचे निकष |
|---|---|
| १ | अधिसूचित काही सेवांसाठीच ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यात येतात. विभागाचा कार्यप्रवाह डिजिटल आहे व नागरिकांना सेवांचे वितरण "आपले सरकार पोर्टलद्वारे"करण्यात येते. |
| २ | उत्तम प्रतिसाद - प्रत्येक सेवेसाठी १००० पेक्षा जास्त संख्येने अर्ज प्राप्त होतात. |
| ३ | मध्यम प्रतिसाद - प्रत्येक सेवेसाठी १००० पेक्षा कमी संख्येने अर्ज प्राप्त होतात |
| ४ | शून्य प्रतिसाद - सेवेसाठी अर्ज प्राप्त नाहीत. |

| क्रमांक | लाल श्रेणीसाठीचे निकष |
|---|---|
| १ | नागरिकांना सेवा देण्यासाठी "आपले सरकार पोर्टलचा" उपयोग नागरिकांनी करावा म्हणून विभागाकडून कोणतेही प्रयत्न नाहीत. |
| २ | "आपले सरकार" पोर्टलशी एकत्रीकरण पूर्ण झाले आहे. परंतु सेवा व रक्कम प्रदान करण्यासाठी एकच व्यासपीठ (Single Platform) ह्या धोरणाचे पालन केले जात नाही. |
| ३ | ऑनलाईन प्रणालीचा वापर न केल्यामुळे प्राप्त अर्ज व त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीवरील सद्य:स्थितीची पडताळणी करणे शक्य नाही. |

अधिसूचित सेवांना ऑनलाईन प्रणालीचा वापर करुन मिळालेल्या प्रतिसादानुसार विभागांची खालीलप्रमाणे वर्गवारी केली आहे :-

**तक्ता ४.३ हिरव्या श्रेणीत वर्गीकृत केलेले विभाग (अतिशय चांगली कामगिरी)**

| क्रमांक | विभाग | सेवा | उत्तम प्रतिसाद | मध्यम प्रतिसाद | शून्य प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|
| १ | महसूल | ४० | १३ | १० | १७ |
| २ | कामगार | ४१ | १० | २८ | ३ |
| ३ | उर्जा | १४ | ६ | १ | ७ |
| ४ | उद्योग-छपाई व लेखनसामग्री महासंचालनालय | २ | २ | ० | ० |
| | **एकूण** | **९७** | **३१** | **३९** | **२७** |

स्रोत :- महाआयटी (३१ मार्च,२०२३ रोजी )

**तक्ता क्रमांक ४.४ अंबर श्रेणीत वर्गीकृत केलेले विभाग (चांगली कामगिरी)**

| क्रमांक | विभाग | सेवा | उत्तम प्रतिसाद | मध्यम प्रतिसाद | शून्य प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|
| १ | गृह | १८ | ३ | ३ | १२ |
| २ | राज्य उत्पादन शुल्क विभाग | ५२ | ५ | ७ | ४० |
| ३ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १० | ५ | ४ | १ |
| ४ | ग्रामविकास व पंचायतराज विभाग | ७ | ३ | ४ | ० |
| ५ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | १२ | ३ | ४ | ५ |
| ६ | उद्योग | १६ | ० | १ | १५ |
| ७ | परिवहन ( मेरीटाईम बोर्ड ) | ७ | ० | ६ | १ |
| ८ | जल संपदा विभाग | १० | ० | ४ | ६ |
| ९ | विधि व न्याय विभाग | ४ | १ | १ | २ |
| १० | महिला व बालकल्याण विभाग | ८ | ० | ८ | ० |
| ११ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | ७ | ० | २ | ५ |
| १२ | आदिवासी विकास विभाग | २ | १ | ० | १ |
| १३ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ९ | २ | २ | ५ |
| १४ | नगर विकास विभाग | ५२ | १ | १६ | ३५ |
| १५ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | १६ | १ | ५ | १० |
| १६ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | १२ | १ | ५ | ६ |
| | **एकूण** | **२४२** | **२६** | **७२** | **१४४** |

स्रोत : महाआयटी (३१ मार्च,२०२३ रोजी)

**तक्ता क्रमांक ४.५ लाल श्रेणीत वर्गीकृत केलेले विभाग**

| अ.क्र. | विभाग | सेवा | उत्तम प्रतिसाद | मध्यम प्रतिसाद | शून्य प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि विभाग | २५ | २ | १ | २२ |
| २ | अल्पसंख्यांक विकास | १ | ० | १ | ० |
| ३ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | २० | ० | ० | २० |
| ४ | परिवहन विभाग | १४ | ० | ० | १४ |
| ५ | वित्त विभाग | ४ | ० | ० | ४ |
| ६ | गृहनिर्माण विभाग-झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | ५ | ० | ० | ५ |
| ७ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | ५ | ० | ० | ५ |
| ८ | वन विभाग | १३ | ० | ० | १३ |
| ९ | पशुसंवर्धन विभाग | १४ | ० | ० | १४ |
| १० | मत्स्य व्यवसाय विभाग | ६ | ० | ० | ६ |
| ११ | सार्वजनिक बांधकाम विभाग | २ | ० | ० | २ |
| १२ | पाणी पुरवठा - महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | १६ | ० | ० | १६ |
| १३ | पाणी पुरवठा - भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | २ | ० | ० | २ |
| १४ | नियोजन विभाग | २ | ० | ० | २ |
| १५ | सार्वजनिक आरोग्य | ६ | ० | ० | ६ |
| १६ | नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग | १५ | ० | ० | १५ |
| १७ | गृहनिर्माण विभाग - म्हाडा | १२ | ० | ० | १२ |
| १८ | गृहनिर्माण विभाग - इमारत दुरुस्ती मंडळ | ४ | ० | ० | ४ |
| १९ | मृद व जल संवर्धन विभाग | ८ | ० | ० | ८ |
| २० | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | ० | ० | ० | ० |
| २१ | सामान्य प्रशासन विभाग | ५ | ० | ० | ५ |
| २२ | इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग | १ | ० | ० | १ |
| २३ | पर्यावरण (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ) | ७ | ० | ० | ७ |
| | **एकूण** | **१८७** | **२** | **२** | **१८३** |

स्रोत :- महाआयटी (३१ मार्च, २०२३ रोजी )

**टीप :-**

१. कृषि विभाग, परिवहन विभाग, वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन कार्यालय, जमाबंदी आयुक्त (भूमी अभिलेख), नोंदणी महानिरीक्षक आणि वन विभाग यांनी त्यांच्या स्वत:च्या पोर्टलवरून सन २०२२-२३ मध्ये खालीलप्रमाणे ऑनलाईन व ऑफलाईन सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत, मात्र त्या 'आपले सरकार' पोर्टलवर दिसत नाहीत.

अ) कृषि विभाग – २,५३,२९७

ब) परिवहन विभाग – ९६,४४,२६१

क) वैद्यकीय शिक्षण - ९९,२७५, अन्न व औषध प्रशासन कार्यालय - ५,५९,७४६

ड) भूमि अभिलेख - ही आकडेवारी इंटीग्रेशन न झाल्यामुळे आपले सरकार पोर्टलवर दिसत नाही.

- गाव नमुना नं. ७/१२ (जमीन तुकडा माहिती) — १,९०,११,९०८
- ८अ (जमीनधारक माहिती पत्रक) — ५९,१७,४४१
- फेरफार नोंद (म्युटेशन एंट्री रजिस्टर) — ७,४६,०७९
- मिळकत पत्रिका — १४,८८,८९४

इ) नोंदणी महानिरीक्षक — ऑनलाईन - ८,६०,०६०+ऑफलाईन ३३,००,१३७=४१,६०,१९७

ई) वन विभाग - १,१५,७७८

**(वरील आकडेवारीचा स्त्रोत - संबंधित विभागाकडून)**

२. उपरोक्त तक्ता क्र. ४.३, ४.४ व ४.५ मध्ये दर्शविण्यात आलेले विश्लेषण व वर्गीकरण हे **'आपले सरकार पोर्टलवर'** ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येवर आधारित आहे. अंबर/लाल श्रेणीत वर्गीकृत झालेल्या विभागांकडे अनेक ऑफलाईन अर्ज प्राप्त झालेले असण्याची शक्यता आहे, किंवा त्यांनी त्यांच्या स्वतंत्र पोर्टलवरुन सेवा दिलेल्या आहेत. मात्र 'अ', 'ब' व 'क' नमुने जारी करून व वारंवार ते सादर करण्यासाठी सूचना देऊन सुद्धा ऑफलाईन प्राप्त, व निर्णय झालेल्या अर्जांची माहिती आयोगाला प्राप्त झालेली नाही. त्यामुळे विभागांचे वर्गीकरण उपलब्ध ऑनलाईन आकडेवारीवरुन करण्यात आले आहे.

३. काही विभागांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सुविधा तर दिली आहे, पण 'आपले सरकार' पोर्टलशी त्याचे एकत्रीकरण झालेले नाही. त्यामुळे 'आपले सरकार' पोर्टलशी एकत्रीकरण न झालेल्या प्रणालीत प्राप्त व कार्यवाही झालेल्या अर्जांची माहिती नसल्यामुळे वरील विश्लेषणात त्या माहितीचा समावेश करण्यात आलेला नाही.

**प्रकरण ५ :-**

# प्रशिक्षण व क्षमता बांधणी

## ५.१ प्रशिक्षण व क्षमता बांधणी

कोणत्याही नवीन धोरण किंवा तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करताना प्रशिक्षण अतिशय महत्वाचे असते. त्यामुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांना कार्यक्षमतेने आणि परिणामकारकपणे काम करणे सोपे जाते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम २० (४) नुसार अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पदनिर्देशित अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांना नियमित प्रशिक्षण देण्याची गरज विहित करण्यात आली आहे. तसेच शासन प्रशिक्षणासाठी आवश्यक त्या तरतुदी करील, असे देखील अधिनियमात नमूद केले आहे. सर्व अधिकाऱ्यांच्या पायाभूत प्रशिक्षणात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांचा समावेश हा त्यांच्या अभ्यासक्रमाचा एक अविभाज्य भाग असेल असे ठरविण्यात आले आहे. त्यामुळे अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे.

## ५.२ यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी (यशदा) तर्फे प्रशिक्षण

यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी (यशदा), पुणे ही महाराष्ट्र राज्य शासनाची शिखर प्रशिक्षण संस्था आहे. यशदा सन २०११ पासून राज्याचे प्रशिक्षण धोरण अंमलात आणित असून त्याद्वारे प्रादेशिक प्रशासन प्रशिक्षण संस्था व जिल्हा प्रशासन प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून विविध प्रशिक्षण कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

### ५.२.१ जागरुकता प्रशिक्षण टप्पा - १ ( २०१५-१६ )

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंमलात आल्यावर शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये त्याबाबत जागरूकता निर्माण करण्याची जबाबदारी यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे यांच्याकडे सोपविण्यात आली होती. यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे यांनी 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' - "दिशानिर्देशन प्रशिक्षण कार्यक्रम" या नावाने एक प्रशिक्षण कार्यक्रम आखून त्याची युद्धपातळीवर अंमलबजावणी केली आहे.

प्रशिक्षणाच्या गरजांचे विश्लेषण केल्यावर प्रशिक्षणात समाविष्ट करण्यासाठी अधिनियमातील विनिर्दिष्ट कलमे व अन्य तपशिलाला अंतिम स्वरूप देण्यात आले. त्यानुसार संबंधित घटकांशी संबंधित लघुचित्रपट/चित्रपटातील क्षणचित्रे निवडण्यात आली, अधिनियमातील तरतुदी, संबंधित असलेले वाचन साहित्य, सादरीकरण, प्रश्नोत्तर स्वरुपात शंका समाधान व नेहमी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची नमुना उत्तरे तयार करुन घेण्यात आली. या सुरुवातीच्या तयारीनंतर राज्यस्तरावरील प्रशिक्षकांची पहिली प्रशिक्षण कार्यशाळा दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी व दुसरी राज्यस्तरावरील प्रशिक्षण कार्यशाळा दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे यांच्यातर्फे आयोजित करण्यात

आली. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे १३० राज्यस्तरीय प्रशिक्षक तयार करण्यात आले. या प्रशिक्षकांनी सन २०१५ मध्ये ३६ जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षण सत्रे घेऊन २,८१५ जिल्हा प्रशिक्षक किंवा संसाधन व्यक्तींना पुढील स्तरावर प्रशिक्षण प्रदान करण्यासाठी तयार केले.

अधिनियम व त्यामधील तरतुदींच्या बाबत जागरुकता निर्माण करण्याच्या उद्दिष्टाने उपरोक्त प्रशिक्षकांनी शासकीय अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याच्या पहिल्या टप्प्यात २८,७३३ सहभागी अधिकाऱ्यांना प्रशिक्षित केले. त्याचप्रमाणे दुसऱ्या टप्प्यात ५२,७७९ अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले. यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे यांच्या सदर प्रयत्नांची भारत सरकारच्या कर्मचारी व प्रशिक्षण विभागाने दखल घेऊन त्यांना सन २०१५-१६ साठीचा "प्रशिक्षणातील उत्कृष्टता" पुरस्कार बहाल करून गौरविले आहे.

### ५.२.२ जागरुकता प्रशिक्षण टप्पा - २ (२०१६-१७)

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील संबंधित तरतुदींबाबत शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण केल्यावर विभागातील पदनिर्देशित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची गरज जाणवली. सन २०१६-१७ मध्ये यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे यांनी सदर विषयात विभागवार मुख्य प्रशिक्षक तयार केले. त्यासाठी महसूल विभाग, ग्रामविकास विभाग, पशुसंवर्धन विभाग, मत्स्य व दुग्धव्यवसाय विकास विभाग व एकात्मिक बालविकास योजना या विभागांची निवड करण्यात आली.

**तक्ता ५.१ : यशदा, पुणे यांच्यातर्फे प्रशिक्षण कार्यक्रम २०१६-१७**

| अ.क्र. | विभाग | प्रशिक्षक | प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|
| १ | महसूल | ८१ | ७,२९८ |
| २ | पशुसंवर्धन, मत्स्य व दुग्धव्यवसाय विकास विभाग | १३८ | ३,०७७ |
| ३ | ग्राम विकास व पंचायत राज विभाग | १२५ | १२,९४३ |
| ४ | महिला व बाल विकास विभाग (ICDS) | १३१ | ९०,३०५ |
| ५ | कृषि, गृह (पोलीस) व अन्य | ० | ८,३१३ |
| | **एकूण** | **४७५** | **१,२१,९३६** |

### ५.२.३ पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत जागरूकता प्रशिक्षण कार्यक्रम

सन २०२२-२३ दरम्यान यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांच्या माध्यमातून १३,७३५ (गट " अ " ११,८१७ ,गट " ब "व " क " १,९१८) अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. सन २०१५ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत यशदाने एकूण २,५३,४८९ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे.

**तक्ता ५.२ : दरवर्षी प्रशिक्षित गट "अ" आणि "ब" व गट "क"  अधिकारी**

| अ.क्र. | वर्ष | गट " अ " मधील प्रशिक्षणार्थी अधिकारी | गट " ब "  व " क " मधील प्रशिक्षणार्थी अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ६५२ | ८४,२७८ |
| २ | २०१६-१७ | ३५९ | १,२१,९२६ |
| ३ | २०१७-१८ | १,३६६ | १३,८०४ |
| ४ | २०१८-१९ | १,०५८ | ८,१३६ |
| ५ | २०१९-२० | १,७११ | ४,०५३ |
| ६ | २०२०-२१ | १८५ | २०४ |
| ७ | २०२१-२२ | ५२० | १,५०२ |
| ८ | २०२२-२३ | ११,८१७ | १९१८ |
| **एकूण** | | **१७,६६८** | **२,३५,८२१** |

(स्त्रोत :- यशदा यांचे पत्र दि. २५.०४.२०२३ व महाआयटी यांचे पत्र दिनांक ३१ मार्च, २०२३)

## ५.३ महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाद्वारे तांत्रिक प्रशिक्षण

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची अंमलबजावणी करण्यासाठी ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जांवर प्रक्रिया करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल प्रणाली विकसित करून तिचे विभागांशी एकत्रीकरण करण्यासाठी, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची (महा.आय.टी.महामंडळ) नियुक्ती करण्यात आली आहे.

लोकसेवा देण्याची प्रक्रिया समजून घेण्यासाठी महा.आय.टी.महामंडळाने प्रत्येक विभागात विश्लेषक नियुक्त केला आहे व त्यामुळे अर्जांच्या नमुन्याचे प्रमाणीकरण, दर सुसंगतीकरण व प्रक्रिया प्रवाहाचे सुलभीकरण करण्यात मोठी मदत झाली. 'आपले सरकार' सेवा पोर्टलद्वारे  नागरिकांना सुलभतेने अर्ज करण्यासाठी महा.आय.टी.महामंडळाने  सदर काम केले. सर्व विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांसाठी अनुभवावर आधारीत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

महा.आय.टी.महामंडळ यांनी क्षेत्रिय स्तरावरील विभागांच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर जिल्हा समन्वयक नियुक्त केला आहे.  जिल्हा स्तरावरील जिल्हा समन्वयकांनी विभागांच्या जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांसाठी १७७ पेक्षा जास्त प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले आहेत.

- सदर प्रशिक्षणात प्राप्त अर्जांचा व त्यासोबत जोडावयाच्या दस्तऐवजांचा प्रक्रिया आढावा घेण्यात आला.
- मागोवा व त्रयस्थ पक्ष पडताळणी प्रक्रियेचा उपयोग करण्यात आला.
- विभाग स्तरावर प्रक्रिया प्रवाहासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.
- अपील स्तरावरील कार्यप्रवाहासाठी अपिलीय प्राधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.
- व्यवस्थापन माहिती प्रणालीसाठी डॅशबोर्ड प्रशिक्षण देण्यात आले.

**प्रशिक्षणाची आकडेवारी** :-

महा.आय.टी.महामंडळाने विविध विभागांना तांत्रिक प्रशिक्षण दिले आहे. महा.आय.टी.महामंडळाने ३८७ प्रशिक्षण कार्यक्रमांच्याद्वारे ६२८ अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे.

सन २०२२-२३ मध्ये यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनीने १३,७३५ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे.

याप्रमाणे सन २०२२-२३ वर्षात एकूण १४,३६३ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

**निरंतर प्रक्रिया :-**

प्रशिक्षण ही निरंतर प्रक्रिया आहे. ऑनलाईन सेवांचे प्रमाण व जागरुकता वाढत असल्याने सर्व पातळयांवर पायाभूत व (रिफ्रेशर) उजळणी वर्गाद्वारे व्यापक प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.

**व्यापक प्रशिक्षण आणि उजळणी आवश्यक :-**

वरील आकडेवारीवरुन हे निदर्शनास येते की, सन २०१६-१७ नंतर व्यापक प्रमाणावर प्रशिक्षण देण्यात आलेले नाही. वस्तुत: सर्वच विभागात लोकसेवा हक्क कायद्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी बदलत असतात/नव्याने नियुक्त होत असतात. त्यामुळे सातत्यपूर्ण व सर्वच पातळयांवर नियमित व्यापक प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. आपले सरकार सेवा केंद्र चालविणारे केंद्रचालकही बदलत असतात. त्यांनाही नियमित प्रशिक्षण देणे आवश्यक ठरते. अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या प्रत्यक्ष प्रक्रियेत सुमारे २ लक्ष अधिकारी-कर्मचारी गुंतलेले आहेत. या सर्वांना कायदा व प्रक्रिया याबाबत नियमित सातत्यपूर्ण प्रशिक्षण देणे आवश्यक आहे व कायद्यांतर्गत तसे अपेक्षित देखील आहे.

## प्रकरण ६ :-

### नाविन्यपूर्ण उपक्रम

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सन २०१७ मध्ये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व कालबद्ध पद्धतीने राज्य शासनाने लोकसेवा पुरवावी असे अधिनियमाचे उद्दिष्ट आहे. अधिनियमाच्या कलम ७ ची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विहित कालबद्ध मर्यादेत सार्वजनिक सेवांचे वितरण होण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास राज्य शासनाने सर्व सार्वजनिक प्राधिकाऱ्यांना प्रोत्साहन द्यावे व उद्युक्त करावे अशी तरतूद आहे. सदर उद्दिष्टे साध्य करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने व माहिती तंत्रज्ञान विभागाने खालील उपक्रम हाती घेतले आहेत :

१. ३१ मार्च २०२३ अखेर ३८७ लोकसेवा ऑनलाईन देण्यात येतात.
२. आयोगासाठी बोधचिन्हाची व "आपली सेवा हेच आमचे कर्तव्य" या घोषवाक्याची निवड लोकांकडून स्पर्धेद्वारे करण्यात आली आहे.
३. जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.
४. प्रभावी संनियंत्रण करण्यासाठी सर्व सचिव, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना 'आपले सरकार' पोर्टलवर डॅशबोर्ड उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
५. पदनिर्देशित अधिकाऱ्यांद्वारे डिजिटल स्वाक्षरीचा उपयोग करण्यात येत आहे. सदर प्रणाली अतिशय गतिमान व सुरक्षित आहे .
६. राज्यातील ३७,८९५ 'आपले सरकार सेवा केंद्रे' नागरिकांना ऑनलाईन सेवा पुरवितात.
७. पदनिर्देशित अधिकाऱ्यांना व अपिलीय प्राधिकाऱ्यांना लघुसंदेशाद्वारे (SMS) सतर्क केले जाते .
८. विविध विभागांच्या ऑनलाईन सेवांना मिळणाऱ्या प्रतिसादानुसार विभागांचे मूल्यमापन व प्रतवारी ठरविण्यात येते.
९. ३१ मार्च २०२३ पर्यंत ७१,७२,९१७ नागरिकांनी 'आपले सरकार पोर्टल' वर नोंदणी केली आहे.

उपरोक्त सर्व उपाययोजनांमुळे लोकसेवांचे पारदर्शक, कार्यक्षम व कालबद्ध पद्धतीने वितरण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत होत आहे. सन २०२२-२३ मध्ये लोकसेवांचे पारदर्शक, कार्यक्षम व कालबद्ध पद्धतीने वितरण होईल याची काळजी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाने घेतली आहे. सदर कालावधीत लोकसेवांची मागणी करणारे २,०७,६४,३०९ अर्ज प्राप्त झाले व त्यापैकी १,९०,०४,३५८ अर्ज मंजूर झाले आणि निकाली काढण्यात आले. त्या अर्जांपैकी फक्त ६९,५९७ एवढे अर्जच नामंजूर करण्यात आले. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याचे प्रमाण अत्यल्प म्हणजेच १% पेक्षाही कमी झाले असल्याचे दिसून येईल.

या आर्थिक वर्षात पारदर्शीपणे आणि तत्परतेने सेवा देण्याचे काही नाविन्यपूर्ण उपक्रम क्षेत्रीय पातळीवरील काही विभागांनी/कार्यालयांनी राबविले आहेत. त्यातील ठळक उदाहरणे पुढे दिली आहेत:-

## ६.१ <u>सिडकोचे पथदर्शी डिजिटल परिवर्तन: व्यवसाय सुलभता पोर्टल :(EODB)</u>




नागरी सुविधा केंद्र, सिडको, नवी मुंबई

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) हे नवीन शहर विकासाचा पर्यायी शब्द बनले आहे. सिडकोने SMART प्रणालीचा वापर केला आहे. सिडकोचे व्यवसाय सुलभता (Ease of Doing Business- EODB) पोर्टल सर्वसमावेशक आहे, ज्यात मालमत्तेसंबंधी सेवा, बांधकामविषयक परवानग्या, अभियांत्रिकी सेवा आणि अशा कामकाजातील जवळपास सगळ्याच अत्यावश्यक बाबींचा कटाक्षाने समावेश केला आहे. हे केवळ एखादे सामान्य संकेतस्थळ नाही, तर सर्वसमावेशक सेवा प्रदान करणारे परिपूर्ण माध्यम आहे.

**S**mart (स्मार्ट): ज्यांना कार्यक्षमता वृद्धिंगत करण्यासाठी तंत्रज्ञान वापरायचे आहे.
**M**oral (नैतिक): जे नैतिकता पाळून पारदर्शक कारभारासाठी वचनबद्ध आहेत.
**A**ccountable (जबाबदार): जे ते करतात त्याची सर्वप्रकारची जबाबदारी स्वीकारतात.
**R**esponsive (प्रतिसाद): जे भेडसावणाऱ्या समस्यांचे त्वरित निराकरण करतात.
**T**ransparent (पारदर्शक): जे प्रामाणिक असतात व त्यामुळेच लोकांसाठी विश्वासपात्र असतात;

या SMART प्रणालीचा वापर करण्यासाठी वेळमर्यादेचे बंधन नाही. 24x7 उपलब्धता आहे व बहुभाषिक (Multilingual) असल्याने कोणत्याही भाषेचा अडथळा नाही. सिडकोशी संबंधित नागरिकांचे प्रत्येक काम, प्रत्येक देयक सुरक्षितरीत्या व खात्रीने तात्काळ म्हणजेच रियल टाईममध्ये पूर्ण होते.

**सिडकोचे'नागरी सुविधा केंद्र'** (Common Facility Centre-CFC) हे फक्त डिजिटल सेवा देणारे ठिकाण नाही, तर नॉन डिजिटल जगताला डिजिटल जगताशी जोडणारा नागरी सहचर्याचा सिडकोने

बांधलेला अनोखा पूल आहे. त्यामुळेच संगणक सुविधा नसणाऱ्यांना वा संगणक वापराचे ज्ञान नसणाऱ्यांना देखील EODB पोर्टलचा लाभ घेता येईल याची पूर्ण खातरजमा केली आहे.

प्रगत माध्यम सुविधांनी सुसज्ज, नागरिकांना मदत करण्यासाठी तत्पर असणारे, प्रशिक्षित व समर्पित कर्मचारी, माहितीची गोपनीयता व सुरक्षितता यांवर काटेकोर निगराणी यांमुळे 'नागरी सुविधा केंद्र' हे डिजिटल संक्रमणाच्या काळात प्रत्येक नागरिकाला सेवा-सुविधांच्या बाबतीत काळासोबत नेण्याच्या सिडकोच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे.

**कार्यप्रवाह**




सिडकोच्या व्यवसाय सुलभता पोर्टल (EODB) अंतर्गत उपलब्ध सेवा:

• मालमत्ता विषयक : ६४ उपसेवा.

• बांधकाम परवानगी : ०४ उपसेवा.

• अभियांत्रिकी : ०३ उपसेवा.

• सामान्य : ०४ उपसेवा.

• नैना : ०४ उपसेवा.

सिडकोचे तत्कालीन उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली वरील नाविन्यपूर्ण व लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात आले आहे. आयोग या उपक्रमाची प्रशंसा करतो.

## ६.२ जमाबंदी आयुक्त, भूमि अभिलेख यांचे नाविन्यपूर्ण उपक्रम -

### ६.२.१ आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे मोजणी काम

जमिनीचे मोजणीचे काम अधिक जलदगतीने आणि अधिक अचूकतेने करण्यासाठी राज्यात सर्व्हे ऑफ इंडिया यांच्यामार्फत एकुण ७७ कोर्स स्टेशन (CORS - Continuous Operating Reference Station) स्थापित करण्यात आले असून त्याच्या आधारे जी.एन.एस.एस. रोव्हर्स च्या सहाय्याने मोजणीकाम करण्यात येत आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे मोजणी काम केल्यानंतर तयार होणारा नकाशा जीआयएस प्रणालीवर आधारित असणार असून तो अक्षांश व रेखांशासहित तयार होणार आहे. सन २०२२-२३ या वर्षात जमाबंदी आयुक्त, भूमि अभिलेख यांच्याकडून ५०१ व संबंधित जिल्हा नियोजन समिती यांचे निधीमधून ४०० असे एकूण ९०१ जी.एन.एस.एस. रोव्हर्स खरेदी करण्यात आलेले आहेत. तसेच सन २०२३-२४ या वर्षात एकुण ६०० जी.एन.एस.एस. रोव्हर्स खरेदी करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. माहे जुलै २०२३ पासून जमीन मोजणीचे प्रकरण पूर्ण करण्यास ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागणार नाही याबाबतचे नियोजन करण्याकामी जिल्हानिहाय कार्यवाही सुरु आहे.

### ६.२.२.भूमापन नकाशांचे डिजीटायझेशन

केंद्र शासनाच्या डिजीटल इंडिया भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत, राज्यातील भूमापन नकाशांचे डिजीटायझेशन करण्याच्या प्रकल्पाअंतर्गत पहिल्या टप्प्यात पुणे, रायगड, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती व नागपूर या ६ जिल्ह्यांतील भूमापन नकाशांचे डिजीटायझेशनचे काम हाती घेण्यात आले होते. सदर काम आता पूर्ण झालेले असून नागरिकांना जमिनींचे डिजीटल नकाशे लवकरच ऑनलाईन उपलब्ध होणार आहेत. तसेच उर्वरित २८ जिल्हयांमधील भूमापन नकाशांचे Digitization चे काम BEL या कंपनीस दिले आहे व २० जिल्हयात काम सुरु झालेले आहे.

### ६.२.३. ई-मोजणी २.०

भूमि अभिलेख विभागाकरीता E-Mojani Ver २.० ही आज्ञावली मोजणी प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्यासाठी विकसित करण्यात आली आहे.

E-Mojani Ver २.० मध्ये नागरिकांना CITIZEN Portal Online उपलब्ध करुन देण्यात आलेले असून मोजणी अर्ज भरणे, फी भरणे, मोजणी अर्जावरील प्रत्येक टप्प्याबाबत माहिती एस. एम. एस. व्दारे उपलब्ध होते व मोजणी नोटीस ऑनलाईन देण्यात येते. मोजणी नकाशा डिजीटल स्वरुपात उपलब्ध होतो. ही आज्ञावली प्रायोगिक तत्वावर नंदूरबार व वाशिम जिल्ह्यात तसेच प्रत्येक जिल्ह्यांतील एक उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात सुरु करण्यात आली आहे. तसेच उर्वरित ३२ जिल्हयातील प्रत्येकी १ तालुक्यात ई-मोजणी-२.० लागू करण्यात आलेली आहे व १ डिसेंबर २०२३ पासून सदर प्रणाली ७२ तालुक्यात लागू करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांना Latitude, Longitude Based Online GIS मोजणी नकाशे उपलब्ध होणार आहेत.

**६.२.४. ई हक्क प्रणाली**

महाराष्ट्राच्या महसूल विभागांतर्गत भूमि अभिलेख विभाग राज्यातील अधिकार अभिलेखांचे संगणकीकरण व डिजीटायझेशन करत असून अधिकार अभिलेख ऑनलाइन उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. भूमि अभिलेखांमध्ये फेरफाराचे अर्ज भरण्यासाठी नागरिकांना पब्लिक डेटा एंट्री (PDE) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ई-हक्क प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या अधिकार अभिलेखामध्ये खालील प्रकारचे फेरफारासाठी अर्ज करता येतात.

१. वारस नोंद.
२. बँकेचा बोजा निर्माण करणे.
३. बँकेचा बोजा रद्द करणे.
४. ई-करार नोंदी.
५. अधिकार अभिलेख वरून मृतकांची नावे रद्द करणे.
६. ए कु व्य (एकत्र कुटुंब व्यवस्थापक) नाव रद्द करणे.
७. ट्रस्टीचे नाव अधिकार अभिलेखातून रद्द करणे.
८. अधिकार अभिलेखामधील लेखन प्रमाद दुरुस्ती साठी अर्ज.

या प्रणालीद्वारे केलेल्या प्रत्येक अर्जाला अर्ज ओळख क्रमांक मिळतो. अर्जदाराला केव्हाही अर्जाची स्थिती पाहता येते. अर्जदाराने अर्ज दाखल केल्यानंतर त्याला विविध टप्पे पूर्ण केल्याबद्दल संदेशदेखील मिळतात. जमाबंदी आयुक्त श्री निरंजन सुधांशु यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्रीमती सरिता नरके, प्रकल्प समन्वयक यांच्या अथक प्रयत्नांतून वरील स्तुत्य उपक्रम चालू आहेत. या उपक्रमाची क्षेत्रीय पातळीवर प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

## ६.३ नोंदणी व मुद्रांक विभाग यांचे नाविन्यपूर्ण उपक्रम -

### ६.३.१. माय सरिता-मोबाईल ॲप्लिकेशन

नोंदणी व मुद्रांक विभागाने विभागाची माहिती तसेच ऑनलाईन सेवा नागरिकांना मोबाईलवर उपलब्ध करुन देण्याकरिता मोबाईल ॲप तयार केले आहे. सदरचे मोबाईल ॲप वापरण्यास सोपे आणि सुलभ आहे. मोबाईल ॲपद्वारे दस्त नोंदणीची माहिती सहज मिळते.

### ६.३.२. CRM Portal http:// crm.igrmaharashtra.in

१. नागरिकांच्या तक्रारींचे वेळेवर निरसन करण्याकरिता Citizen Relationship Management Portal तयार करण्यात आलेले आहे.

२. नागरिकांना मोबाईल ॲप्लिकेशन ,CRM website, Voice Call, सोशल मिडीया (फेसबुक Twitter, Whats app, SMS, Email) वापरुन त्यांच्या तक्रारी नोंदविता येतात.

३. CRM Portal द्वारे विभागातील सर्व तक्रारींचे तपशीलवार विश्लेषण करुन त्यावर योग्य कार्यवाही करण्यासाठी संबंधित कार्यालयात तक्रार पाठविण्यात येऊन तक्रारीचे निरसन झाल्यावर त्याबाबत तक्रारदाराचे अभिप्राय घेण्यात येतात.

नोंदणी व मुद्रांक विभागाने श्री. श्रावण हर्डीकर, तत्कालीन नोंदणी महानिरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविलेल्या या नाविन्यपूर्ण उपक्रमांची आयोग नोंद घेत असून सर्व संबंधित अधिकारी अभिनंदनास पात्र आहेत.

## ६.४ अमरावती विभागातील नाविन्यपूर्ण उपक्रम

### ATDM (KIOSK) व ई-कोतवाल बुक प्रणाली -जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम

वाशिम जिल्ह्यातील नागरिकांना महसुली दस्तऐवज ऑनलाइन उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय व कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये All Time Document Machine-ATDM (किओक्स) मशीन बसविण्यात आल्या आहेत. याव्दारे सातबारा, जुना सातबारा आणि फेरफार, कोतवाल बुक नक्कल, हक्क नोंदणी व गाव नमुना ८ अ इत्यादी दस्तऐवज ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. जिल्ह्यातील लोकांसाठी आणि विशेषत: शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या सर्वात महत्त्वाच्या नोंदी म्हणजे हक्कांच्या नोंदी (जमीन शीर्षक), फेरफार, कोतवाल बुक नक्कल, हक्क नोंदणी, गाव नमुना ८ अ, पेरे पत्रक इत्यादी महसूल दस्तऐवज तहसील कार्यालयातून प्राप्त करुन घेण्यासाठी तहसील कार्यालयामध्ये वांरवार जावे लागत होते, तसेच सदर दस्तऐवज मिळविण्यासाठी जास्त वेळ (सुमारे १०-१५ दिवस) आणि पैसा खर्च करावा लागत होता. सदर दस्तऐवज तत्परतेने उपलब्ध करुन देण्यासाठी एटीडीएम (किओस्क) मशीन कार्यान्वित करण्यात आली असून तहसील कार्यालयांमार्फत जवळपास ४३ लाख कागदपत्रे स्कॅन करण्यात आली आहेत. सदर डाटा एकत्रित केल्यानंतर, स्कॅन केलेले दस्तऐवज सिंगल क्लिकवर पाहण्यासाठी तसेच कॅश रिसेप्टरद्वारे आवश्यक रक्कम (रु. ३० फक्त) भरणा केल्यानंतर विशिष्ट दस्तऐवजाची प्रिंट काढण्यासाठी प्रणाली विकसित केली आहे. वाशिम जिल्ह्यात एकूण १४ यंत्रे बसविण्यात आली असून त्यापैकी दोन मशिन जिल्हाधिकारी कार्यालयात आहेत आणि सहा तहसील व सहा एपीएमसी (कृषि उत्पन्न बाजार समिती) कार्यालयांमध्ये प्रत्येकी एक मशीन बसविण्यात आली आहे. भविष्यात नागरिकांना डिजिटल पेमेंटसाठी QR कोड सुविधा उपलब्ध करुन देण्याचे योजले आहे.

ऑनलाईन कोतवाल बुक नक्कल नागरिकांना https://digitalwashim.in या पोर्टलवर एका क्लिक वर रु. ३० चा भरणा करुन मिळत आहे. सदरचे दस्तऐवज अत्यंत कमी वेळेत मिळणार असून नागरिकांना प्रिंट काढण्याची सुविधा नसल्यास PDF मध्ये Save/जतन करणे शक्य आहे. एकूण उपलब्ध १ लाख ७० हजार कोतवाल बुक नक्कलेचे इमेजेस स्कॅन करुन झालेले आहेत. त्यापैकी जवळपास १ लाख कोतवाल बुक नक्कलेची स्कॅन वरुन डेटा एंट्री झाली असून डिजिटल कोतवाल बुक नागरिकांना पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत सदरची सेवा ११० गावांकरीता सुरु करण्यात आली असून उर्वरित गावांकरीता सदर सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

हा नाविन्यपूर्ण उपक्रम श्री. शण्मुगराजन एस., भा.प्र.से. तत्कालीन जिल्हाधिकारी वाशिम, यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला असून त्यांचे प्रयत्न प्रशंसनीय आहेत.

## ६.५ नाशिक विभागात राबविण्यात आलेले नाविन्यपूर्ण उपक्रम

### राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता स्पर्धा सन २०२२-२०२३ (सर्वोत्कृष्ट कल्पना) वैयक्तिक व्दितीय पुरस्कार — अहमदनगर

अहमदनगर जिल्हयातील माणिक दौंडी ता. पाथर्डी जि. अहमदनगर येथील तलाठी श्री राजू मोहन मेरड व मंडळ अधिकारी श्रीमती वैशाली सदाशिव दळवी यांनी, माणिकदौंड सजा तसेच सजेतील १२ महसुली गावातील डोंगराळ भागात राहणाऱ्या भिल्ल समाजाच्या तसेच भटकंती करणाऱ्या लोकांकडे विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे उपलब्ध नाहीत ही बाब लक्षात आल्यावर या वर्गाला मूळ प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांना आधारकार्ड, रेशनकार्ड, जातीचे दाखले मिळवून दिले. सदर उपक्रमांची नोंद राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान २०२२-२३ पुरस्काराकरीता घेण्यात आली.

## ६.६ नागपूर विभागातील नाविन्यपूर्ण उपक्रम :-

### गडचिरोली पोलीस दादालोरा खिडकी :-

ही योजना गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड उप विभागात प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली. आदिवासींसाठी विविध सेवा व शासकीय योजना, शासकीय प्रमाणपत्रे (उदा. जात प्रमाणपत्र, विविध प्रकारचे दाखले इत्यादी), उच्च दर्जाचे कृषि बियाणे, रोजगार, स्वयंरोजगार अशा योजना एकाच खिडकीतून राबविण्यात आल्या. गडचिरोली जिल्ह्यात पोलीस स्टेशन, पोलीस मदत केंद्रात एकूण ५३ दादालोरा खिडक्या उभारण्यात आल्या असून अशा प्रत्येक ठिकाणी नागरी कृती दल आहे. यामुळे जिल्हा अथवा तालुका स्तरावर न जाता गडचिरोली सारख्या अतिदुर्गम आणि नक्षलप्रवण भागात आदिवासीं क्षेत्रातील नागरिकांना पोलीस संरक्षणाखाली स्थानिक स्तरावर सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

या उपक्रमासाठी तत्कालीन पोलीस अधीक्षक श्री अंकित गोयल (भा.पो.से.) यांचे अभिनंदन!



# गडचिरोली पोलीस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून नागरिकांना मिळालेल्या लाभांचा गोषवारा

| उपक्रम | ऑगस्ट/2022 लाभार्थी संख्या | जानेवारी/2021 ते ऑगस्ट/2022 लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| प्रोजेक्ट प्रगती अंतर्गत जात प्रमाणपत्र | 364 | 9390 |
| प्रोजेक्ट विकास अंतर्गत विविध प्रकारच्या योजना (बालसंगोपन योजना, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, अटल दिव्यांग योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना आणि इतर.) | 3511 | 58831 |
| विविध प्रकारचे दाखले (आधार कार्ड, आयुष्मान भारत कार्ड, पॅनकार्ड, QRCode कार्ड, जॉब कार्ड, ई-श्रम कार्ड, वाहन परवाना) | 5743 | 126448 |
| गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा | 1 | 170 |
| रोजगार व व्होकेशनल ट्रेनिंग (नर्सिंग असिस्टंट, VLE, बिझनेस डेव्हलपमेंट (ॲक्सिस बँक), वाहन चालक प्रशिक्षण व परवाना, भाजीपाला लागवड, मत्स्य पालन, राखी बनविणे प्रशिक्षण कुक्कुटपालन, MSCIT प्रशिक्षण, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत पदवी करिता प्रवेश ) | 404 | 6218 |
| प्रोजेक्ट कृषी समृद्धी अंतर्गत (शेतकऱ्यांना मोफत कृषी बियाणे, मत्स्य बीज तसेच पपई रोपे, व फळझाडे वाटप व कृषी दर्शन सहल इ.) | 1285 | 12918 |
| प्रोजेक्ट शक्ती (दिव्यांगांना तीन चाकी सायकल, एम आर किट, स्टिक, बेरोजगार युवतींना शिलाई मशीन तसेच इतर साहित्य वाटप) | 140 | 1686 |
| इतर उपक्रम (दिव्यांग महामेळावा, ऑपरेशन रोशनी अंतर्गत नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी, आदिवासी सामुहिक विवाह व इतर) | 204 | 10529 |
| एकूण | 11,652 | 2,26,190 |

/gadchirolipolice



# गडचिरोली पोलीस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून नागरिकांना मिळालेल्या लाभांचा गोषवारा

| उपक्रम | सप्टेंबर/2022 लाभार्थी संख्या | जानेवारी/2021 ते सप्टेंबर/2022 लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| प्रोजेक्ट प्रगती अंतर्गत जात प्रमाणपत्र | 1046 | 10436 |
| प्रोजेक्ट विकास अंतर्गत विविध प्रकारच्या योजना (बालसंगोपन योजना, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, अटल दिव्यांग योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना आणि इतर.) | 2879 | 61710 |
| विविध प्रकारचे दाखले (आधार कार्ड, आयुष्मान भारत कार्ड, पॅनकार्ड, QRCode कार्ड, जॉब कार्ड, ई-श्रम कार्ड, वाहन परवाना) | 11953 | 138401 |
| गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा | 4 | 174 |
| रोजगार व व्होकेशनल ट्रेनिंग (नर्सिंग असिस्टंट, VLE, बिझनेस डेव्हलपमेंट (ॲक्सिस बँक), वाहन चालक प्रशिक्षण व परवाना, भाजीपाला लागवड, मत्स्य पालन, राखी बनविणे प्रशिक्षण कुक्कुटपालन, MSCIT प्रशिक्षण, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत पदवी करिता प्रवेश ) | 379 | 6597 |
| प्रोजेक्ट कृषी समृद्धी अंतर्गत (शेतकऱ्यांना मोफत कृषी बियाणे, मत्स्य बीज तसेच पपई रोपे, व फळझाडे वाटप व कृषी दर्शन सहल इ.) | 597 | 13515 |
| प्रोजेक्ट शक्ती (दिव्यांगांना तीन चाकी सायकल, एम आर किट, स्टिक, बेरोजगार युवतींना शिलाई मशीन तसेच इतर साहित्य वाटप) | 276 | 1962 |
| इतर उपक्रम (दिव्यांग महामेळावा, ऑपरेशन रोशनी अंतर्गत नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी, आदिवासी सामुहिक विवाह व इतर) | 0 | 10529 |
| एकूण | 17,134 | 2,43,324 |

/gadchirolipolice

## प्रकरण ७ :-

# सूचना, शिफारशी व पुढील वाटचाल

अधिनियमातील कलम १६ (१) नुसार आयोगाने अधिनियमाची योग्य अंमलबजावणी होण्याची खबरदारी घेणे व लोकसेवांचे अधिकाधिक चांगले वितरण होण्यासाठी शासनाला सूचना करणे ही जबाबदारी देण्यात आली आहे. त्याप्रमाणे आयोगाने दरवर्षी शासनाला सूचना केल्या आहेत. (२०२०-२१ पूर्वीच्या सूचना संबंधित वर्षाच्या वार्षिक अहवालात आहेत.) आयोगाने केलेल्या शिफारशींवर कार्यवाही करणे अधिनियमाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी आवश्यक आहे.

### ७.१ २०२१-२२ च्या सर्वसाधारण सूचना व शिफारशी व त्यांची सद्य:स्थिती

| अ.क्र. | शिफारस | सद्य:स्थिती |
|---|---|---|
| १ | सर्व विभागांना सर्व सेवांची बृहद् यादी (Master List) तयार करण्याचे निर्देश दिले आहेत आणि विभागांनी त्याची प्रत आयोग आणि सामान्य प्रशासन विभाग (प्र. सु. र. व का.) यांना पाठवावी. | सद्य:स्थितीत १७ विभागांच्या मास्टरलिस्ट आयोगास प्राप्त झालेल्या आहेत. उर्वरित विभागांच्या मास्टर लिस्ट अद्याप अप्राप्त आहेत. सातत्यपूर्ण कार्यवाही आवश्यक आहे. |
| २ | सामान्य प्रशासन विभागाने सर्व विभागांच्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवांचा आढावा घेऊन विभागवार अधिसूचित सेवांची यादी अद्ययावत करावी. | सामान्य प्रशासन विभाग (प्र. सु. र व का.) ने सर्व अधिसूचित सेवांची यादी अद्ययावत केली आहे आणि आयोगाला त्यांचे पत्र क्र आर.टी.एस.-२०२२/प्र.क्र. ६९ /लो. दि. कक्ष दि. २५ जानेवारी, २०२३ अन्वये उपलब्ध करुन दिली आहे. |
| ३ | ऑफलाईन अर्जांची आणि अपिलांची माहिती विहित प्रपत्र "अ", "ब" व "क" नमुन्यामध्ये संकलित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग आणि महा आयटी महामंडळ यांनी संगणकीकृत प्रणाली तयार करावी. | सदर बाब सामान्य प्रशासन विभाग (प्र. सु. र व का.), माहिती व तंत्रज्ञान विभाग आणि महा आयटी महामंडळ यांच्या विचाराधीन आहे. |
| ४ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्याची योजना निश्चित करण्यात यावी. | ही बाब शासन स्तरावर प्रलंबित आहे. |
| ५ | सर्व विभागांनी अधिसूचित सेवांचा आढावा घेऊन | सातत्यपूर्ण कार्यवाही आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| | जास्तीतजास्त लोकोपयोगी सेवा नव्याने अधिसूचित कराव्यात व त्या संकेतस्थळावर प्रसिद्ध कराव्यात. | |
| ६ | प्रलंबित प्रथम व द्वितीय अपीले निकाली काढण्यासाठी, लॉक अपीले अनलॉक करण्यासाठी शासन स्तरावरून एक वेळ अपवाद (OneTime Exception) म्हणून निर्णय घेण्यात यावा. | ही बाब ३१.०३.२०२३ अखेर प्रलंबित होती. |
| ७ | सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी प्रलंबित प्रथम व द्वितीय अपीलांचा नियमितपणे आढावा घ्यावा व विहित कालमर्यादेत निकाली न निघणाऱ्या अपिलांच्या कामकाजात सुधारणा होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. | सातत्यपूर्ण कार्यवाही आवश्यक आहे. |
| ८ | सर्व जिल्हाधिकारी यांनी 'आपले सरकार' सेवा केंद्रांच्या कामकाजाचा आढावा घेऊन त्यांचे सक्षमीकरण करावे व आवश्यकतेनुसार आणि माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि. १९.०१.२०१८ च्या शासन निर्णयातील निकषानुसार नवीन केंद्रे आपल्या जिल्ह्यात मंजूर करावीत. | सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. |
| ९ | सर्व विभागांनी आपले सरकार पोर्टलवर अधिसूचित केलेल्या सर्व सेवा ऑनलाईन पद्धतीनेच पुरवाव्यात असा शासन निर्णय दि.२८.११.२०२२ रोजी मुख्य सचिव यांचे स्वाक्षरीने निर्गमित झाला आहे. त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. | सातत्यपूर्ण कार्यवाही आवश्यक आहे. अधिसूचित केलेल्या १३९ सेवा अद्यापही ऑनलाईन नाहीत. |
| १० | १२ मार्च २०१८ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी 'नियंत्रक अधिकारी' म्हणून सर्व विभागांच्या कामकाजांचा नियमित आढावा घेऊन अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करावेत. | जिल्हाधिकारी आढावा बैठका घेत आहेत. त्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. |
| ११ | सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी अल्प प्रतिसाद असलेल्या सेवांचा आढावा घेऊन त्यामागील कारणमीमांसा जाणून त्याचे विश्लेषण करावे त्याबाबत जनतेचे मत जाणून घ्यावे व त्या सेवांना अधिक प्रतिसाद मिळण्यासाठी उपाययोजना कराव्यात. | विभागीय आयुक्त आढावा बैठका घेत आहेत. त्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| १२ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत देण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्रावर राज्य सेवा हक्क आायोगाचे बोधचिन्ह व घोषवाक्य मुद्रित करण्यात यावे. | सद्य:स्थितीत महाआयटीने तयार केलेल्या प्रमाणपत्रांवर आयोगाचा लोगो आणि टॅगलाइन मुद्रित केली जातात आणि ऑनलाईन देण्यात येतात. |
| १३ | सर्व जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांची तपासणी करण्यासाठी वेळापत्रक निश्‍चित करावे व त्याप्रमाणे कार्यालयांची तपासणी करण्यात यावी आणि आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात तपासणी अहवालाची प्रत राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या कार्यालयाला सादर करावी. | कार्यवाही चालू आहे. |
| १४ | सर्व जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची माहिती जास्तीतजास्त नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आठवडी बाजार, भित्तीपत्रके, शिबिरे, जाहिरात इ. माध्यमातून अधिनियमाची प्रसिद्धी करावी. | सातत्यपूर्ण कार्यवाही आवश्यक आहे |
| १५ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व सेवा एकाच पोर्टल मार्फत नागरिकांना पुरविण्याबाबत शासनाचे धोरण आहे. विविध पोर्टलद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवांचे 'आपले सरकार' पोर्टलबरोबर जोडून घेण्याच्या अनुषंगाने माहिती व तंत्रज्ञान विभागाने उचित कार्यवाही करावी. | सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण क्र.- २०१५/प्र.क्र.१२३/१८ (र. व का.) दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ मध्ये याबाबत विस्तृत माहिती दिली आहे. तथापि, अनेक विभागांकडून अंमलबजावणी प्रलंबित आहे. |
| १६ | राज्य सेवा हक्क आयोगाच्या विभागीय कार्यालयासाठी जागा, कर्मचारी वृंद उपलब्ध करुन देण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने योग्य ती कार्यवाही करावी. | नाशिक वगळता राज्य सेवा हक्क आयोगाच्या इतर सर्व विभागीय कार्यालयांना कार्यालयीन जागा व कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. |
| १७ | सर्व जिल्हाधिकारी यांनी अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आपल्या जिल्हयात राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची माहिती आयोगास उपलब्ध करुन द्यावी. | काही विभागांची व जिल्हयांची माहिती प्राप्त झाली आहे, ती प्रकरण ६ मध्ये दिली आहे. |
| १८ | 'आपले सरकार पोर्टलवर' प्रसिध्द करण्यात आलेले वार्षिक अहवाल व वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ) यांना अधिनियमाच्या प्रभावी | सातत्यपूर्ण कार्यवाही आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अंमलबजावणीसाठी व्यापक प्रसिध्दी द्यावी. | |

**७.२ आयोग यावर्षी शासनाला पुढीलप्रमाणे सर्वसाधारण शिफारशी करीत आहे- (सन २०२२-२३ या वर्षातील सर्व विभागासाठी शिफारशी)**

| क्रमांक | शिफारस |
|---|---|
| १. | सर्व प्रशासकीय विभागांकडून देण्यात येणाऱ्या सेवांची बृहद् यादी (मास्टर लिस्ट) तयार करुन नागरिकांसाठी उपलब्ध होण्याकरीता त्याची प्रत आयोग आणि सामान्य प्रशासन विभाग (प्र. सु. र व का.) यांना पाठवावी. |
| २. | राज्य शासनाचे सर्व विभाग, उपक्रम, प्राधिकरण, स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत अधिसूचित होण्याचा कालावधी निर्धारित करण्यासाठी एक निश्‍चित वेळापत्रक राज्य शासनाने तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे . |
| ३. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरिता, सर्व विभागांनी आपल्या विभागाच्या सर्व सेवा ऑनलाईन उपलब्ध होण्याच्यादृष्टीने महाआयटी महामंडळाकडे अथवा संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा करुन सर्व सेवा ऑनलाईन कराव्यात. |
| ४. | शासनाच्या धोरणाप्रमाणे आपले सरकार पोर्टल व्यतिरिक्त, संबंधित विभागातील सेवांबाबत अन्य पोर्टल कार्यरत असल्यास ते आपले सरकार पोर्टलबरोबर जोडून घ्यावे. |
| ५. | दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर सर्व केंद्रे 'आपले सरकार सेवा केंद्रे' म्हणून ओळखली जातील असा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णय स्वागतार्ह आहे. तो सर्वत्र अंमलात आणावा. |
| ६. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून नेमण्याचा दि. १२.०३.२०१८ चा शासन निर्णय आहे. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी नियमितपणे अधिनियमाच्या अंमलबजावणीमधील प्रगतीचा आढावा घेणे आवश्यक आहे असाच आढावा विभागीय आयुक्तांनी सुध्दा घ्यावा. मात्र उपरोक्त शासन निर्णय पुरेसा नसून त्यासाठी कायदेशीर तरतूद असणे आवश्यक आहे. त्यासंबंधी कायद्यात दुरुस्ती करणे गरजेचे आहे. |
| ७. | सर्व विभागांनी त्यांच्याकडील महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाशी संबंधित बाबींसंदर्भात समन्वय साधण्यासाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. संबंधित अधिकाऱ्यांची नावे, दूरध्वनी क्रमांक, ईमेल आयडी इ. माहिती आयोगास उपलब्ध करुन देण्यात यावी. |
| ८. | सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी प्रलंबित प्रथम व द्वितीय अपिलांचा नियमितपणे आढावा घ्यावा व विहित कालमर्यादेत निकाली न निघणाऱ्या अपिलांशी निगडीत अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या कामकाजात सुधारणा होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. |
| ९. | सर्व जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आठवडी बाजार, भित्तीपत्रके, शिबिरे, जाहिरात इ. माध्यमातून |

| क्रमांक | शिफारस |
|---|---|
| | अधिनियमाची प्रसिद्धी करावी. |
| १०. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची कार्यपध्दती याबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी, सर्व विभागांनी / त्यांच्या अधीनस्त कार्यालयांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व सेवा, सेवांचा कालावधी, शुल्क, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिल प्राधिकारी इ. माहिती कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रदर्शित करावी. |
| ११. | 'आपले सरकार' पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात आलेल्या सेवेपोटीचा महसूल सर्व संबंधितांना विनाविलंब मिळण्याची दक्षता माहिती तंत्रज्ञान विभागाने घेणे आवश्यक आहे. |
| १२. | सर्व पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय प्राधिकारी यांना स्वतंत्र आयडी व पासवर्ड महाआयटी महामंडळाकडून त्वरित देण्यात यावेत. |
| १३. | संबंधित राज्य सेवा हक्क आयुक्त, विभागीय आयुक्त (महसूल) व जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधीनस्त कार्यालयांची तपासणी करावी व आढळणाऱ्या त्रुटींची पूर्तता करुन घ्यावी. |
| १४. | सर्व विभागांनी ऑनलाईन व ऑफलाईन अर्जांची तपशीलवार माहिती विहित "अ", "ब" व "क" नमुन्यामध्ये आयोगाला दरवर्षी वर्ष अखेरीस कळविणे आवश्यक आहे. |
| १५. | सर्व जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्रांची यादी जिल्ह्याच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावी. सदरील केंद्रांचे ठराविक कालावधी नंतर कार्यमूल्यांकन करावे. सर्व केंद्रे कार्यान्वित राहण्यासाठी उपाययोजना कराव्यात. |
| १६. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंतर्गत जे अधिकारी चांगले काम करतात त्यांची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालात घेण्यात यावी. त्यासाठी आवश्यक निर्देश साप्रवि ने निर्गमित करावेत. तसेच अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अशा कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन योजना तयार करुन ती लागू करावी. |
| १७. | महाआयटी महामंडळामार्फत नागरिकांना देत असलेल्या सेवांसाठी दाखल करावयाच्या कागदपत्रांमध्ये बदल झाला असल्यास त्या बदललेल्या कागदपत्रांची नोंद आपले सरकार पोर्टलवर अद्ययावत करण्यात यावी. |
| १८. | दिनांक ३१.०३.२०२३ रोजी राज्यभरात जरी ३७,८९५ 'आपले सरकार' सेवा केंद्रे सेवा पुरवित असली, तरीही फक्त २०,००१ केंद्रे सक्रीय असल्याचे व १७,८९४ केंद्रे निष्क्रिय असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. सदर केंद्रे आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य राहण्यासाठी पावले उचलणे आवश्यक आहे. |
| १९. | जनतेकडून अत्यल्प किंवा कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही अशा अनेक सेवा आहेत. संबंधित विभागांनी त्यामागील कारणमीमांसा जाणून त्याचे विश्लेषण केले पाहिजे. सदर सेवांना का प्रतिसाद मिळत नाही , याबाबत सामान्य जनतेचे मत ही विचारात घेण्यात यावे. |
| २०. | प्रकरणे हाताळताना ऑनलाईन प्रणालीचे व ऑफलाईन कार्यपद्धतीचे त्रयस्थ यंत्रणेमार्फत लेखापरीक्षण करून घेणे इष्ट ठरेल. |
| २१. | प्रत्येक पदनिर्देशित अधिकारी, अपिलीय प्राधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त व विभागप्रमुख यांना माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित आवश्यक |

| क्रमांक | शिफारस |
|---|---|
| | अशा सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. |
| २२. | सर्व विभागांनी ज्या सेवांसाठी ऑनलाईन प्रणाली उपलब्ध आहे त्या सेवा ऑफलाईन देणे त्वरित बंद करावे. |
| २३. | सन २०२२-२३ च्या दरम्यान वेळेवर सेवा देण्याचे प्रमाण ८२% व विलंबाने सेवा देण्याचे प्रमाण १८% असल्याचे महत्वपूर्ण निरीक्षण आयोगाने नोंदविले आहे. त्यामुळे सन २०२२-२३ या वर्षात लोकसेवांचे कालबद्ध वितरण करण्यात काही प्रकरणी विभाग कसूर करतात हे आयोगाचे मत आहे. त्यात सुधारणा व्हावी. |
| २४. | सर्व विभागांनी  त्यांच्या अधिसूचित सेवांच्या कार्यपद्धतीचे पुनर्अभियांत्रिकीकरण (BPR) करुन घ्यावे. प्रामुख्याने मागितली जाणारी कागदपत्रे, विहित केलेला कालावधी व प्रक्रिया यांचे पुनर्अभियांत्रिकीकरण करावे. |
| २५. | सर्व जिल्हाधिकारी यांनी त्यांचे जिल्हयातील सर्व पदनिर्देशित अधिकारी व सर्व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे User ID आणि Password असल्याची खात्री करावी. |
| २६. | सर्व जिल्हास्तरीय कार्यालयांच्या संकेतस्थळावर राज्य सेवा हक्क आयोग व सेवा हक्क कायद्याविषयी माहिती प्रदर्शित करावी. |
| २७. | जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामपंचायत पातळीवर आदर्श "आपले सरकार सेवा केंद्रे" उभारावीत. |
| २८. | जिल्हाधिकारी यांनी सर्व जिल्हास्तरीय विभाग प्रमुखांची नियमित बैठक घ्यावी. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आढावा घ्यावा व त्या बैठकींना संबंधित राज्य सेवा हक्क आयुक्तांना निमंत्रित करावे. |

## ७.३ विभागनिहाय सूचना व शिफारशी

वरील ७.२ मध्ये नमुद केलेल्या सूचना व शिफारशींव्यतिरिक्त काही विभागांसाठी विवक्षित शिफारशी पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | शिफारस |
|---|---|
| १. | **महसूल व वन विभाग** |
| | १. भूमि अभिलेख विभागाच्या सेवा या बहुधा विहित वेळेत दिल्या जात नाहीत असे निदर्शनास आले आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करुन सेवा विहित वेळेत देण्यात याव्यात.<br>२. महाभूमि व महाभूलेख ही पोर्टल्स 'आपले सरकार' पोर्टलशी जोडावित. |

| क्रमांक | शिफारस |
|---|---|
| २. | **गृह व परिवहन विभाग** |
| | १. परिवहन विभागाच्या सेवा, ''सारथी'' व ''वाहन'' या स्वतंत्र पोर्टल वरुन देण्यात येतात. त्यांचे 'आपले सरकार' पोर्टलशी इंटिग्रेशन करण्यात यावे. |
| ३. | **कृषि व पदुम विभाग** |
| | १. कृषी विभागाच्या काही सेवा या ''अपेडा'' व केंद्र शासनाच्या विकसित केलेल्या ऑनलाईन सुविधेमार्फत पुरविण्यात येतात. त्या सेवा आपले सरकार पोर्टलबरोबर जोडून घेण्यात याव्यात.<br>२. मासेमारी परवाना, मच्छिमार संस्थेची नोंदणी व ॲक्वाकल्चर पाँड व फीड सीड सेंटर या सेवांचा आढावा घेऊन त्या अधिसूचित कराव्यात.<br>३. कृषि व पशुसंवर्धन विभागातील सर्व सेवांचा अभ्यास करुन अधिकच्या सेवा ऑनलाईन करुन आपले सरकार पोर्टलबरोबर जोडून घेण्यात याव्यात. |
| ४. | **नगर विकास विभाग** |
| | १. नगर विकास विभागातील जन्म-मृत्यू नोंदणी, विवाह नोंदणी, बांधकाम परवाना, जोते प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र इ. सेवा महानगरपालिका/स्थानिक प्राधिकरणाकडून स्वतंत्र पोर्टल्सद्वारा दिल्या जातात. तसेच नगर विकास विभागांतर्गत इतर प्राधिकरणाकडून स्वतंत्र पोर्टल्सचा वापर होतो. सदर पोर्टल्सचे संलग्नीकरण आपले सरकार पोर्टलशी करण्यात यावे.<br>२. सर्व नगरपंचायती / नगरपालिका, यांची सेवा देण्याची कार्यपद्धती, व कालमर्यादा एकसमान असाव्यात. त्याचप्रमाणे सर्व महानगर पालिकांची सेवा देण्याची कार्यपद्धती व कालमर्यादा एकसमान असाव्यात व त्यांची पोर्टल्स आपले सरकार पोर्टलशी संलग्न करण्यात यावेत. |
| ५. | **माहिती व तंत्रज्ञान विभाग, एनआयसी व महाआयटी महामंडळ** |
| | १. माहिती व तंत्रज्ञान विभागाने सर्व जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त व सर्व सचिवांचे आपले सरकार सेवेचे डॅशबोर्ड अद्ययावत करुन द्यावेत. डॅशबोर्डवर विश्लेषणासाठी आकडेवारी उपलब्ध असावी.<br>२. आपले सरकार पोर्टल अद्ययावत करुन वर्जन २.० ही प्रणाली लागू करावी.<br>३. आपले सरकार सेवा केंद्रावरुन अर्जदारांना अपील करण्याची सुविधा द्यावी.<br>४. विभागांच्या अनेक अधिसूचित सेवांचे 'आपले सरकार' पोर्टलशी इंटिग्रेशन झालेले नाही. ते त्वरित करण्यात यावे.<br>५. जेथे लागू असेल तेथे एनआयसी व महाआयटी महामंडळाने एकमेकांच्या संपर्कात राहून पोर्टल्सच्या इंटिग्रेशन बाबत संयुक्तपणे कार्यवाही करावी.<br>६. 'आपले सरकार' पोर्टलवर Chat – BOT ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.<br>७. 'आपले सरकार' पोर्टलवर प्रलंबित प्रकरणांबाबत संबंधितांना सूचना देण्याबाबत प्रणाली विकसीत करण्यात यावी.<br>८. महाआयटी महामंडळाकडून क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी, महा-ई सेवा केंद्र/ सेतू सेवा केंद्र व आपले सरकार सेवा केंद्र चालकांना नियमित प्रशिक्षण देण्यात यावे.<br>९. प्रलंबित अपिलांचा तपशील 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात यावा. त्यासाठी स्वतंत्र प्रणाली विकसित करावी. |

| क्रमांक | शिफारस |
|---|---|
| **६.** | **ग्रामविकास विभाग** |
| | जिल्हा परिषद पुणे यांनी सुमारे ११०० हुन अधिक सेवांचे प्रोसेस मॅपिंग केले आहे. या सर्व सेवांचा अभ्यास करुन राज्यातील सर्व जिल्हा परिषदांनी यातील जास्तीत जास्त सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाखाली अधिसूचित करण्याबाबत व आपले सरकार पोर्टल वर ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. |
| **७.** | **उद्योग, उर्जा व कामगार विभाग** |
| | उद्योग विभागाच्या 'मैत्री' या पोर्टलवरुन देण्यात येणाऱ्या सर्व सेवांचे आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण करण्यात यावे. |
| **८.** | **उच्च व तंत्रशिक्षण विभाग** |
| | या विभागाची एक सेवा सीईटी सेल मार्फत सुरु आहे. सदरील पोर्टलचे आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण करण्यात यावे. |
| **९.** | **कौशल्य विभाग व उद्योजकता विभाग** |
| | विभागाच्या स्वतंत्र 'महास्वयंम' पोर्टलवरुन देण्यात येणाऱ्या सर्व सेवा अधिसूचित कराव्यात व आपले सरकार पोर्टलबरोबर जोडून घेण्यात याव्यात. |
| **१०.** | **विधी व न्याय विभाग** |
| | विभागाच्या ज्या सेवा MLSA/NALSA मार्फत दिल्या जातात त्या सेवा आपले सरकार पोर्टलबरोबर जोडून घेण्यात याव्यात. |
| **११.** | **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग** |
| | या विभागाच्या काही सेवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत देण्यात येतात. त्या सर्व सेवा आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध होतील याबाबत कार्यवाही करण्यात यावी. विभागाच्या पोर्टलवरुन दिल्या जाणाऱ्या सेवा आपले सरकार पोर्टलशी संलग्न कराव्यात. |

**टीप** :-

आयोगाने २०२२-२३ या वर्षात सर्वच विभागांचा वारंवार आढावा घेऊन जास्तीतजास्त सेवा अधिसूचित करण्याच्या सूचना विभागांना दिल्या आहेत. तसेच कार्यप्रणालींचा अभ्यास करुन सेवा देण्याचा कालावधी कमी करता येईल का व प्रक्रिया सोपी व सुलभ करता येईल का हे तपासण्यास सांगितले आहे.

## ७.४ व्यापक प्रशिक्षणाची आवश्यकता

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम २० (४) नुसार लोकसेवा ठराविक कालावधीत देण्यामध्ये वाढ करण्यासाठी आणि त्याची सुनिश्चिती करण्यासाठी सर्व पदनिर्देशित अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना नियतकालिक प्रशिक्षण देण्याची तरतूद विहित करण्यात आली आहे. प्रशिक्षण ही नियमित चालणारी प्रक्रिया आहे कारण पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी हे बदलत असतात. त्यांना कायद्याचे संपूर्ण ज्ञान असणे व तांत्रिक बाबी हाताळण्याचे कौशल्य असणे आवश्यक ठरते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गतचे शेवटचे व्यापक प्रशिक्षण हे सन २०१६ मध्ये पार पडले आहे. तदनंतर या अधिनियमाअंतर्गत आवश्यक कार्यप्रणाली बाबतचे किंवा तांत्रिक बाबीविषयक प्रशिक्षण पुरेशा प्रमाणात दिले गेले नाही; ते देणे आवश्यक आहे.

पात्र लाभार्थीला कायद्यानुसार सेवा न पुरविली गेल्यास किंवा न्यायोचित कारणाशिवाय अर्ज नामंजूर केल्यास दाखल झालेली प्रथम व द्वितीय अपिले निकाली काढण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रक्रियाधीन अपिलांवर कार्यवाही करण्यासाठी प्रशिक्षणाच्या माध्यमातून जाणीव जागृती निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

तसेच बऱ्याच सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या सेवा अधिसूचित केलेल्या नाहीत. अशा सेवा अधिसूचित करण्याच्या आवश्यकतेबाबत प्रशिक्षणामध्ये भर देण्याची आवश्यकता आहे.

**राज्यव्यापी प्रशिक्षणाविषयक शिफारस**

वरील पार्श्वभूमीवर प्रशिक्षणासदर्भात पुढीलप्रमाणे शिफारस करण्यात येत आहे :-

- सर्व विभागांनी लोकसेवा हक्क अधिनियमाबाबत राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत जिल्हा/ विभागस्तरावर, विभागीय प्रशिक्षण संस्थांमार्फत जिल्ह्यातील सर्व पदनिर्देशित अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रशिक्षण आयोजित करावे व त्यांना कायद्याविषयक जागरूकता, अंमलबजावणी व तांत्रिक बाबीविषयक प्रशिक्षण महाआयटी मंडळाकडून व यशदामार्फत देण्यात यावे.
- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याविषयी सखोल प्रशिक्षण आवश्यक आहे. हे प्रशिक्षण "यशदा" मार्फत देण्यात यावे. राज्य पातळीवर प्रत्येक जिल्ह्यातून तज्ञ प्रशिक्षक निवडावेत, त्यांना प्रशिक्षित करून जिल्हा व तालुका स्तरापर्यंत कायदेविषयक, प्रक्रियात्मक आणि तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात यावे. या कायद्याच्या अनुपालनार्थ पदनिर्देशित अधिकाऱ्यांपासून कार्यालय प्रमुखापर्यंत अनेकांचा सहभाग असतो व ही संख्या काही लाखांच्या वर आहे. त्यामुळे सर्व पातळ्यांपर्यंत सखोल प्रशिक्षण कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी आवश्यक आहे.

## ७.५ प्रचार व प्रसिद्धीची आवश्यकता

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम व आयोगाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी जनमानसात व्यापक प्रसिद्धीची आवश्यकता आहे. नागरिकांना कायद्याची व त्यांच्या हक्कांची

माहितीच नसेल तर सदर अधिनियमाचा उद्देश सफल होणार नाही. मागील अनेक अहवालात शिफारस करुनही याबाबत पुरेशी प्रसिद्धी झालेली नाही. यासंदर्भात प्रचार व प्रसिद्धीसाठी आजपर्यंत कोणतीही विवक्षित आर्थिक तरतूद करण्यात आली नाही. नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी वर्षातून ठराविक कालावधीत जसे की 'सेवा हक्क पंधरवडा' साजरा करुन विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे. तसेच प्रसिद्धी पत्रके, जाहिराती, दृकश्राव्य माध्यमे, वर्तमानपत्रे व इतर विविध प्रसारमाध्यमांचा वापर करुन व्यापक प्रसिद्धी देणे आवश्यक आहे व ही एक नियमित बाब असली पाहिजे.

### ७.५.१ प्रचार व प्रसिद्धीसाठी समाजमाध्यमांचा वापर

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी विविध समाजमाध्यमांचा वापर करणे कालानुरुप आवश्यक आहे. जसे फेसबुक, व्हॉट्सअँप, ट्वीटर, इन्स्टाग्राम इ. अशा प्रकारच्या माध्यमांना हाताळण्यासाठी आयोगात स्वतंत्र कक्ष असणे आवश्यक आहे. ज्यामुळे नागरिकांना सेवा मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी किंवा कोणत्याही माहितीबद्दल या समाजमाध्यमाद्वारेही मार्गदर्शन करता येईल. तसेच नागरिकांच्या दैनंदिन अडचणी/सूचना/प्रतिक्रियांना प्रतिसाद देता येईल. या प्रयोजनार्थ आयोगास आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

**५. अर्ज स्वीकारण्याकरिता पदनिर्देशित अधिकाऱ्याने अन्य अधिकाऱ्यास प्राधिकृत करणे.—**पदनिर्देशित अधिकाऱ्यास, पात्र व्यक्तिंनी, या अधिनियमांतर्गत अधिसूचित केलेली कोणतीही सेवा प्राप्त करण्यासाठी केलेले अर्ज स्वीकारण्याकरिता आणि त्या अर्जांची रीतसर पोच अर्जदारास देण्याकरिता, त्यास दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, आदेशाद्वारे, प्राधिकृत करता येईल. अशा रीतीने अर्ज स्वीकारण्यासाठी यथोचितरीत्या प्राधिकृत करण्यात आलेल्या दुय्यम अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे नाव विभागाच्या किंवा कार्यालयाच्या सूचनाफलकावर किंवा संकेतस्थळावर किंवा पोर्टलवरदेखील प्रदर्शित केले जाईल.

**६. अर्जदारास पोच देणे.—**पात्र व्यक्तिकडून लोकसेवेसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, यथास्थिति, पदनिर्देशित अधिकारी किंवा प्राधिकृत दुय्यम अधिकारी किंवा कर्मचारी अर्जदारास **नमुना एक** मध्ये पोच देईल. जर सेवा पुरविण्यासाठी आवश्यक असलेले एखादे कागदपत्र अर्जासोबत जोडलेले नसेल तर, पोच पावती देताना त्यात तसे स्पष्ट नमूद करण्यात येईल आणि ती सेवा पुरविण्यासाठीची नियत कालमर्यादा ही आवश्यक कागदपत्र सादर केल्याच्या दिनांकापासून गणणे सुरू होईल.

**७. अर्जाचा नमुना, त्या सोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे.—**

(१) लोकसेवा देण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्जाचा विहित नमुना जर संबंधित अधिनियम, नियम, अधिसूचना, आदेश, शासन निर्णय किंवा अन्य कोणताही संलेख यांमध्ये देण्यात आलेला नसेल, तर प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण तो नमुना तयार करील.

(२) अर्जाचा नमुना मराठी व इंग्रजी भाषेमध्ये असेल. अर्जाच्या नमुन्यासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी, अर्जाच्या नमुन्यामध्येच नमूद करण्यात येईल.

(३) अर्जाचा नमुना पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या कार्यालयात आणि सेतू सुविधा केंद्र, महा-इ सेवा केंद्र, संग्राम केंद्र यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात आणि अन्य कोणत्याही संबंधित नागरिक सेवा केंद्रात सहजपणे उपलब्ध होईल. सदर अर्जाच्या नमुन्याची प्रत कार्यालयाचे किंवा विभागाचे संकेतस्थळ किंवा आपले सरकार पोर्टलवर देखील उपलब्ध होईल व ती मोबाईल ॲप वरून अथवा ऑनलाइन उपलब्ध (डाऊनलोड) होऊ शकेल.

(४) केवळ लोकसेवा मिळविण्यासाठीची आवश्यक माहितीच अर्जदाराकडून मागविण्यात येत असल्याबाबत पदनिर्देशित अधिकारी खातरजमा करील.

(५) अर्ज सादर करतेवेळी, शक्य असेल तेथवर आवश्यक कागदपत्रे जोडलेले व पूर्ण भरलेले अर्जच केवळ स्वीकारण्यात येत असल्याबाबत पदनिर्देशित अधिकारी खातरजमा करील. ऑनलाईन सादर केलेले अर्जसुद्धा पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून स्वीकारण्यात येतील.

(६) अर्जावर, पदनिर्देशित अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेला दुय्यम अधिकारी किंवा कर्मचारी रीतसर पोच देईल आणि त्यावर अर्ज प्राप्तीचा दिनांक, वेळ आणि ठिकाण, अनन्य ओळख क्रमांक (युनिक आयडेन्टिफिकेशन नंबर), अर्ज स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्याचे नाव, ज्या कालमर्यादेच्या आत लोकसेवा पुरविण्यात येईल ती नियत कालमर्यादा या बाबी नमूद करण्यात येतील.

(७) अर्ज जर व्यक्तिशः स्वरूपात मिळाला असेल तर, त्याची पोच व्यक्तिशः देण्यात येईल. अर्ज ऑनलाईन पोर्टल सुविधेमार्फत मिळाला असेल तर, त्याची पोच इ-मेल किंवा एसएमएस किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक साधनांमार्फत देण्यात येईल. ऑनलाईन देण्यात आलेली पोच ही अर्जदारास देण्यात आलेली पोचपावती समजली जाईल.

**८. शुल्काचे (फी) प्रदान.—**अर्जदारास सेवा प्राप्त करण्यासाठी संबंधित प्राधिकरणाने प्रत्येक सेवेसाठी वेळोवेळी अधिसूचित केलेल्या शुल्काचे प्रदान, कोणतेही असल्यास, एकतर थेट प्राधिकरणाकडे किंवा इलेक्ट्रॉनिक सुविधेमार्फत ऑनलाईन करावे लागेल.

**९. अर्ज फेटाळण्याची सूचना.—**जेथे संबंधित पदनिर्देशित अधिकारी हा, वैध कारणांमुळे, अर्जदाराला अधिसूचित लोकसेवा पुरविता येऊ शकत नाहीत या निष्कर्षाप्रत आला असेल त्याबाबतीत, ज्या विशिष्ट सेवांसाठी अर्ज करण्यात आला असेल त्या विशिष्ट सेवा पुरविण्याकरिता दिलेल्या नियत कालमर्यादेच्या कालावधीत ती बाब अर्जदाराला कारणांसह लेखी कळवील. अर्ज फेटाळण्याच्या सूचनेसोबत, अपिलीय प्राधिकाऱ्याचे नाव व पदनाम, अपील प्राधिकाऱ्याशी संपर्क साधण्यासाठी उपलब्ध सर्व माहितीसह त्याचा पत्ता, ज्या कालमर्यादेत अपील सादर करण्याची गरज आहे ती कालमर्यादा नमूद करण्यात येईल. जर अर्ज ऑनलाईन करण्यात आला असेल तर अर्जदाराचा अर्ज फेटाळण्याबाबतचे आदेश ऑनलाईन अथवा मोबाईल ॲप वर पाठविण्यात येतील.

**१०. अर्जाची स्थिती पाहण्यासाठी यंत्रणा.—**

(१) सार्वजनिक प्राधिकरण, शक्य असेल तेथवर, अर्जदाराला दिलेल्या अनन्य ओळख क्रमांकाचा (युनिक आयडेन्टिफिकेशन नंबर) वापर करून अर्जाची स्थिती पाहण्यासाठी एक यंत्रणा निर्माण करील.

(२) सार्वजनिक प्राधिकरण, शक्य असेल तेथवर, ज्यामार्फत पात्र व्यक्तिला एसएमएस किंवा इ-मेल याद्वारे किंवा इतर कोणत्याही साधनांमार्फत अर्जाच्या सद्यस्थितीबाबतची अद्ययावत माहिती वेळेवर पाठविली जाऊ शकेल, अशी यंत्रणा निर्माण करील, जेणेकरून ज्या पात्र व्यक्तिने सेवांकरिता अर्ज केला असेल अशी पात्र व्यक्ती, तिच्या सेवांबाबतच्या अर्जाच्या स्थितीची ऑनलाईन पाहणी करू शकेल.

**११. अपिलाची कार्यपद्धती.—**

(१) कलम ९ च्या पोट-कलम (१) अन्वये, प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे नमुना दोन मध्ये व्यक्तिशः किंवा ऑनलाईन अपील दाखल करता येईल.

(२) कलम ९ च्या पोट-कलम (३) अन्वये, द्वितीय अपिलीय प्राधिकाऱ्याकडे नमुना तीन मध्ये व्यक्तिशः किंवा ऑनलाईन अपील दाखल करता येईल.

**१२. अपिलासोबत जोडावयाची कागदपत्रे.—**

(१) पहिल्या किंवा दुसऱ्या अपिलासोबत, अपीलकर्ता पुढील कागदपत्रे जोडीलः—

(क) अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी.

(ख) ज्या आदेशाविरुद्ध प्रथम किंवा द्वितीय अपील करण्यात येत असेल त्या आदेशांची स्व-साक्षांकित प्रत.

(ग) अपीलकर्त्याने प्रथम किंवा द्वितीय अपिलामध्ये ज्याचा आधार घेतला असेल अशा आणि त्या संदर्भित करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या प्रती.

**१३. सुनावणीची नोटीस बजावणे.—**पहिल्या किंवा यथास्थिती दुसऱ्या अपिलाची नोटीस खाली नमूद करण्यात आलेल्या पद्धतींपैकी कोणत्याही रीतीने बजावण्यात येईल :

(१) विशेष संदेशवाहकामार्फत अथवा आदेशिका बजावणाऱ्यामार्फत (प्रोसेस सर्व्हर) हातबटवड्याने ;

(२) पोचपावतीसह नोंदणीकृत डाकेने ;

(३) इ-मेल किंवा एसएमएस किंवा मोबाईल ॲप्स व्दारे ऑनलाईन ;

(४) शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत, त्याच्या नियंत्रक अधिकाऱ्यामार्फत किंवा इ-मेल किंवा एसएमएस किंवा मोबाईल ॲप्स व्दारे.

**१४. अर्जदार किंवा पदनिर्देशित अधिकारी यांची व्यक्तिशः उपस्थिती.—**

(१) प्रथम व द्वितीय अपिलाच्या सर्व प्रकरणी अपीलकर्ते आणि पदनिर्देशित अधिकारी त्याचप्रमाणे द्वितीय अपिलाचे प्रकरण असल्यास प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना सुनावणीचा दिनांक किमान सात पूर्ण दिवस अगोदर कळविण्यात येईल.

(२) सुनावणीची रीतसर नोटीस बजावल्यानंतरही जर एखादा पक्षकार सुनावणीच्या वेळी अनुपस्थित राहिला तर अपील त्याच्या अनुपस्थितीत निकाली काढले जाईल.

**१५. अपिलावर निर्णय घेण्याची कार्यपद्धती.—**अपील अर्जाबाबत निर्णय घेताना अपिलीय प्राधिकारी-

(एक) पदनिर्देशित अधिकारी आणि अपीलकर्ता यांना अपिलाच्या सुनावणीच्या वेळी बोलवील.

(दोन) अपिलाशी संबंधित कागदपत्रे व त्यांच्या प्रतींची छाननी करील.

(तीन) अपिलाच्या सुनावणीच्या वेळी पदनिर्देशित अधिकारी व अपीलकर्त्याची बाजू ऐकून घेईल.

**१६. प्रथम किंवा द्वितीय अपिलावरील आदेश.—**

(१) प्रथम किंवा द्वितीय अपिलावरील आदेश लिखित स्वरूपात असेल.

(२) अपिलामध्ये देण्यात आलेल्या आदेशाची प्रत, ज्याने अपील दाखल केले असेल तो अपीलकर्ता, पदनिर्देशित अधिकारी किंवा यथाःस्थिति प्रथम अपील प्राधिकारी यांना देण्यात येईल.

**१७. अधिनियमांतर्गत प्रकरणांची नोंदवही ठेवणे.—**पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी आणि द्वितीय अपिलीय प्राधिकारी नमुना चार मध्ये प्रकरणांची नोंदवही एकतर व्यक्तिशः किंवा ईलेक्ट्रॉनिक नमुन्यात ठेवील.

**१८. आयोगाकडे दाखल करण्यात येणारे अपील.—**

द्वितीय अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध आयोगाकडे नमुना-पाच मध्ये अपील दाखल करण्यात येईल.

**१९. मुख्य आयुक्त किंवा आयुक्त यांच्या कार्यालयात प्रतिनियुक्तीवर नेमलेले अधिकारी व अन्य कर्मचारी यांचे वेतन व भत्ते, सेवेच्या अटी व शर्ती.—**

(१) राज्य शासनाचा कोणताही विभाग, राज्य शासनाचे मंडळ, महामंडळ अथवा अन्य सांविधिक संस्था यांमधून मुख्य आयुक्त किंवा आयुक्त यांच्या कार्यालयात प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांना, त्यांच्या सेवेबाबत लागू असतील अशा नियमांनुसार त्यांना अनुज्ञेय असतील असे वेतन व भत्ते देण्यात येतील आणि उक्त नियम व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या संबंधित सूचना यांनुसार त्यांचे नियमन करण्यात येईल.

(२) राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती आणि शिस्तविषयक बाबी यांबाबत नियमन करणारे नियम हे, योग्य त्या फेरफारांसह, आयोगाच्या अधिकाऱ्यांना व इतर कर्मचाऱ्यांना लागू असतील.

(३) अधिकारी व अन्य कर्मचारी यांचा पदावधी, राज्य शासनाकडून आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

**नमुना-एक**

(नियम ६ पहा)

**पोच**

प्रेषक

________________

________________

(पदनिर्देशित अधिकारी / प्राधिकृत अधिकारी)

प्रति,

________________

________________

(पात्र व्यक्तिचे नाव आणि पत्ता)

**संदर्भ:**--दिनांक .................... रोजीचा आपला अर्ज.

मी, याद्वारे, आपल्या संदर्भित अर्जाची पोच देत आहे.

अर्जातील पुढील त्रुटी तात्काळ दुरुस्त करण्यात याव्यात :

(त्रुटींचा उल्लेख, कोणत्याही असल्यास)

१. ..........................

२. ..........................

३. ..........................

पुढील आवश्यक कागदपत्रे किंवा ना हरकत प्रमाणपत्रे कृपया तात्काळ सादर करावीत.

१. ..........................

२. ..........................

३. ..........................

आपला/आपली विश्वासू,

(पदनिर्देशित अधिकारी/प्राधिकृत अधिकारी)

(कार्यालयाची मोहोर).

ठिकाण :

दिनांक :

**नमुना दोन**

[नियम ११ (१) पहा]

**प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडे करावयाच्या पहिल्या अपिलाचा नमुना**

..................... (प्रथम अपील प्राधिकाऱ्याचे पदनाम व कार्यालयाचा पत्ता) यांच्या समक्ष

.....................

.....................

..................... ( पात्र व्यक्तीचे नाव व पत्ता) :

..................... ( पदनिर्देशित अधिकाऱ्याचे नाव व पत्ता) :

(१) सेवा उपलब्ध करून देण्यासाठी पदनिर्देशित :
अधिकाऱ्याकडे अर्ज सादर केल्याचा दिनांक

(२) पोच मिळाल्याचा दिनांक :

(३) कागदपत्रे, कोणतीही असल्यास, सादर केल्याचा दिनांक :

(४) मागणी केलेल्या लोकसेवेचा तपशील :

(५) पदनिर्देशित अधिकाऱ्याचा निर्णय :

(६) नियत कालमर्यादा :

(७) पात्र व्यक्तीकडून मिळालेला अर्ज फेटाळण्यात आला :
असल्याचे ज्या पत्रान्वये कळविण्यात आले असेल त्याचा
दिनांक

(८) अपिलाची कारणे :

(एक) नियत कालमर्यादेत लोकसेवा देण्यात आली नाही,
किंवा

(दोन) अर्ज फेटाळण्यात आला :

(९) मागितलेले सहाय्य :

(१०) अपील दाखल करण्यासाठीची इतर कोणतीही आवश्यक :
माहिती.

**सोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी**

(१) .......................................

(२) .......................................

**प्रतिज्ञापत्र**

वर दिलेला तपशील माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरा व बिनचूक आहे.

दिनांक ........... माहे .......२०.... (वर्ष) रोजी

पात्र व्यक्तीची स्वाक्षरी.

## नमुना तीन

[नियम ११ (२) पहा]

**द्वितीय अपील प्राधिकाऱ्याकडे करावयाच्या दुसऱ्या अपिलाचा नमुना**

................. समक्ष (प्रथम अपील प्राधिकाऱ्याचे नाव व कार्यालयाचा पत्ता)

................. (पात्र व्यक्तीचे नाव व पत्ता)

................. (पदनिर्देशित अधिकाऱ्याचे नाव व पत्ता)

................. (प्रथम अपील प्राधिकाऱ्याचे नाव व पत्ता)

(१) पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे सादर केलेल्या अर्जाचा दिनांक :

(२) पोच मिळाल्याचा दिनांक :

(३) मागणी केलेल्या लोकसेवेचा तपशील :

(४) पदनिर्देशित अधिकाऱ्याचा निर्णय :

(५) प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा निर्णय :

(६) नियत कालमर्यादा :

(७) प्रथम अपिलाचा दिनांक :

(८) प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडून कोणताही आदेश मिळाल्याचा दिनांक किंवा अपेक्षित दिनांक :

(९) अपिलाची कारणे

(एक) प्रथम अपिलावर कोणताही निर्णय घेण्यात आला नाही ; किंवा

(दोन) अपील फेटाळण्याची कारणे; किंवा

(तीन) पहिल्या अपिलावरील आदेश समाधानकारक नसणे (कारणे) :

**सोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी :-**

(१) ......................

(२) ......................

**प्रतिज्ञापत्र**

वर दिलेला तपशील, माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरा व बिनचूक आहे.

दिनांक ................माहे..............२०...........( वर्ष ) रोजी

पात्र व्यक्तीची / पदनिर्देशित अधिकाऱ्याची स्वाक्षरी.

## नमुना चार

(नियम १७ पहा)

### प्रकरणांची नोंदवही

**(अ) पदनिर्देशित अधिकाऱ्याने ठेवावयाची नोंदवही**

| अ.क्र. | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अर्जाची पोच दिल्याचा दिनांक | पात्र व्यक्तीचे नाव व पत्ता | मागणी केलेली लोकसेवा | अर्ज /अपील निकाली काढण्याचा दिनांक, अर्ज /अपील फेटाळण्यात आले असेल तर त्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

**(ब) प्रथम अपील प्राधिकाऱ्याने ठेवावयाची नोंदवही**

| अ. क्र. | प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रथम अपिलाची पोच दिल्याचा दिनांक | पात्र व्यक्तीचे नाव व पत्ता | मागणी केलेली लोकसेवा | अर्ज निकाली काढल्याचा दिनांक /अर्ज फेटाळण्यात आला असेल तर त्याची कारणे | जर कोणताही दंड बसवला असेल किंवा वसूल केला असेल तर त्याचा तपशील. |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |

**(क) द्वितीय अपील प्राधिकाऱ्याने ठेवावयाची नोंदवही**

| अ.क्र. | द्वितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | द्वितीय अपिलाची पोच दिल्याचा दिनांक | पात्र व्यक्तीचे/ पदनिर्देशित अधिकाऱ्याचे/ प्रथम अपील प्राधिकाऱ्याचे नाव व पत्ता | मागणी केलेली लोकसेवा | द्वितीय अपील अर्ज निकाली काढल्याचा दिनांक/ अर्ज फेटाळण्यात आला असेल तर त्याची कारणे | जर कोणताही दंड बसवला असेल किंवा वसूल केला असेल तर त्याचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |

## नमुना पाच

(नियम १८ पहा)

## महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाकडे अपील करण्याचा नमुना

प्रति,

(महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग/विभागीय आयुक्त/आयोगाचे अधिकार सोपविलेला शासकीय अधिकारी याचे पदनाम) ......................... (कार्यालयीन पत्ता) यांच्या समक्ष

पत्ता :—

..........................

.......................... (पात्र व्यक्तीचे नाव, पत्ता, दूरध्वनी/मोबाईल क्रमांक, इ-मेल आयडी (असल्यास)

..........................

.......................... (पदनिर्देशित अधिकाऱ्याचे नाव व पत्ता)

..........................

.......................... (प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे नाव व पत्ता)

..........................

.......................... (द्वितीय अपिलीय अधिकाऱ्याचे नाव व पत्ता)

(१) पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याचा दिनांक :

(२) अर्जाची पोच मिळाल्याचा दिनांक :

(३) मागणी केलेल्या लोकसेवेचा तपशील :

(४) ज्या विभाग/कार्यालयातून सेवेची मागणी केली आहे त्या विभागाचे नाव :

(५) पदनिर्देशित अधिकाऱ्याने अर्ज निकाली काढण्याचा दिनांक :

(६) प्रथम अपील दाखल केल्याचा दिनांक :

(७) पहिल्या अपिलाची पोच दिल्याचा दिनांक :

(८) पहिल्या अपिलाच्या निर्णयाचा व पोच दिल्याचा दिनांक :

(९) द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक :

(१०) द्वितीय अपील निकाली काढल्याचा दिनांक :

आयोगासमोर अपील दाखल करण्याबाबतची कारणे (थोडक्यात) :—

..............................................

..............................................

करण्यात आलेल्या मागण्या :—

..............................................

..............................................

(पात्र व्यक्तीची/पदनिर्देशित अधिकाऱ्याची स्वाक्षरी).

दिनांक :

ठिकाण :

**टीप** :- पात्र व्यक्तीने ज्या आदेशाविरोधात अपील दाखल केलेले आहे त्या आदेशाची प्रमाणित प्रत यासोबत जोडावी.

**प्रतिज्ञापत्र**

वर दिलेला तपशील माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरा व बिनचूक आहे.

दिनांक ......... दिवस............. महिना २०.......... ( वर्ष )

(पात्र व्यक्तीची /पदनिर्देशित
अधिकाऱ्याची स्वाक्षरी.)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**डॉ. भगवान सहाय,**
अपर मुख्य सचिव ( प्र. सु. आणि र. व का. ), महाराष्ट्र शासन.

# परिशिष्ट – 'ङ'

**<u>दि. ३१/०३/२०२३ अखेर पर्यंत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अनुसार अधिसूचित केलेल्या लोकसेवांची यादी.</u>**

| अ.क्र. | विभाग | एकूण लोकसेवा |
|---|---|---|
| १ | गृह विभाग | ९१ |
| | गृह - १८ | |
| | गृह (बंदरे) - ०७ | |
| | गृह (राज्य उत्पादन शुल्क) - ५२ | |
| | परिवहन - १४ | |
| २ | महसूल व वन विभाग | ६८ |
| | महसूल - २० | |
| | भूमि अभिलेख - २० | |
| | नोंदणी व मुद्रांक शुल्क - १५ | |
| | वने - १३ | |
| ३ | कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय | ४५ |
| | कृषि - २५ | |
| | पदुम - २० | |
| ४ | नगर विकास | ५५ |
| ५ | विधी व न्याय | ०४ |
| ६ | ग्रामविकास | ०७ |
| ७ | मृद व जलसंधारण | ०८ |
| ८ | अन्न, नागरी पुरवठा | १६ |
| ९ | गृहनिर्माण | २१ |
| १० | महिला व बालविकास | ०८ |
| ११ | अल्पसंख्यांक विकास | ०१ |
| १२ | उद्योग, ऊर्जा व कामगार | |
| | उद्योग - २५ | ८० |
| | कामगार - ४१ | |
| | उर्जा - १४ | |
| १३ | वित्त | ०४ |
| १४ | जलसंपदा | १० |
| १५ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग | ०९ |
| १६ | पाणी पुरवठा व स्वच्छता २+१६ | १८ |
| १७ | सार्वजनिक आरोग्य विभाग | ०६ |
| १८ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | १२ |
| १९ | आदिवासी विकास विभाग | ०२ |
| २० | शालेय शिक्षण व क्रीडा | १२ |
| २१ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये | ०५ |
| २२ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य | २० |
| २३ | उच्च व तंत्रशिक्षण विभाग | १० |
| २४ | पर्यावरण | ०७ |
| २५ | सार्वजनिक बांधकाम | ०२ |
| २६ | सामान्य प्रशासन विभाग | ०५ |
| २७ | नियोजन विभाग | ०२ |
| २८ | इतर मागास व बहुजन कल्याण विभाग | ०१ |
| | **एकूण** | **५२९** |

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अनुसार अधिसूचित केलेल्या लोकसेवांची यादी**

| अ.क्र. | विभाग व सेवांची नांवे |
|---|---|
| | **गृह विभाग ( एकूण ९१ सेवा )** |
| | **गृह ( १८ सेवा )**<br>**( अधिसूचना क्र.एचडीओ-२०१५/प्र.क्र.३७/आस्था-१, १८ जुलै, २०२०.)** |
| १. | विदेशी कलाकारांच्या सहभागास परवानगी |
| २. | तक्रारदारास प्रथम खबरी अहवालाची (एफ.आय.आर.) प्रत पुरविणे |
| ३. | ध्वनिक्षेपकाचा (लाऊडस्पीकर) परवाना |
| ४. | मनोरंजनाचे कार्यक्रमांना ना-हरकत परवाना देणे |
| ५. | सभा, संमेलन, मिरवणूक, शोभायात्रा इ. करीता परवानगी देणे |
| ६. | निमशासकीय, खाजगी संस्था इ. मध्ये नोकरीकरिता वर्तणूक व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र |
| ७. | शस्त्र परवान्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र |
| ८. | भारतीय नागरिकांना परदेशात जाण्यासाठी पोलीस अनुमती प्रमाणपत्र.<br>शिक्षणासाठी / नोकरीसाठी प्रवेशपत्र (व्हीसा) |
| ९. | तिबेटीयन नागरिकांना भारत देशात परत येण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र |
| १०. | नियंत्रित स्फोट (Controlled Blasting) करिता ना-हरकता प्रमाणपत्र<br>अ) मैत्री कक्षाकडे प्राप्त झालेले अर्ज<br>ब) संबंधित विभागाकडे प्राप्त झालेला अर्ज |
| ११. | इंधन तेल (Storage of Fuel oil) साठवणूक करिता ना-हरकत प्रमाणत्र<br>अ) मैत्री कक्षाकडे प्राप्त झालेले अर्ज<br>ब) संबंधित विभागाकडे प्राप्त झालेला अर्ज |
| | ( अधिसूचना क्र.एमआयएस-१२२०/प्र.क्र.१३२/विशा-५, दिनांक ३० डिसेंबर, २०२०.) |
| १२. | महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम, १९६६ नियम-६ ( सिनेमागृह स्थाननिश्चिती ) |
| १३. | महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम, १९६६ नियम-१०१ ( सिनेमागृह परवाना ) |
| १४. | महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम, १९६६ नियम-१०५ ( चित्रपटगृह परवाना नुतनीकरण ) |
| १५. | चित्रीकरण परवाना |
| | (अधिसूचना क्र.एमआयएस-१२२०/प्र.क्र.१३२/विशा-५, दिनांक २९ जानेवारी, २०२१.) |
| १६. | महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ३३ (१) (ब) (एक) आणि (१) (बक) (एक) मधील तरतूदीनुसार सार्वजनिक मनोरंजनाच्या जागांकरिता (सिनेमा व्यतिरिक्त) आणि तमाशा व मेळ्यासह सार्वजनिक व मनोरंजन कार्यक्रमांना परवाना देणे व त्यावर नियंत्रण ठेवणे. |
| १७. | महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ३३ (१) (ब) (एक) आणि (१) (बक) (एक) मधील तरतूदीनुसार सार्वजनिक मनोरंजनाच्या जागांकरिता (सिनेमा व्यतिरिक्त) आणि तमाशा व मेळ्यासह सार्वजनिक व मनोरंजन कार्यक्रमांना देण्यात आलेल्या परवान्यांचे नुतनीकरण करणे. |
| १८. | सिनेमेटॉग्राफ अधिनियम, १९५२ कलम १०,११ आणि १२ मधील तरतूदीनुसार चलचित्रे किंवा चित्रमालिका दाखविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही उपकरणसंचाच्या सहाय्याने चलचित्रपट प्रदर्शित करावयाच्या जागांना परवाना देणे. |
| | **गृह (बंदरे)- मेरिटाईम बोर्ड ( ०७ सेवा )**<br>**( अधिसूचना क्र संकीर्ण-०८१६/प्र.क्र.१७०/बंदरे-१, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१६.)** |
| १. | जलयान सर्व्हेक्षण (इनलॅड व्हेसल ॲक्ट, १९१७ च्या कलम ९ अंतर्गत) |
| २. | जलयान नोंदणी (इनलॅड व्हेसल ॲक्ट, १९१७ च्या कलम १९ फ अंतर्गत) |

| | |
|---|---|
| ३. | नवीन प्रवासी वाहतूक अनुज्ञप्ती वा नूतनीकरण (भारतीय बंदरे अधिनियम, १९०८ कलम ६ (के) अन्वये व पॅसेंजर व्हेसल रुल्स, १९६३ च्या कलम ३ अंतर्गत) |
| ४. | बंदर हद्दीतील छायाचित्रण करण्यासाठी परवाना (भारतीय बंदरे अधिनियम, १९०८ कलम ६ (१) जे अन्वये) |
| ५. | लांब अंतराच्या खाडी समुद्रात पोहण्याची परवानगी (महाराष्ट्र सागरी मंडळ अधियिम, १९९६ च्या अधीन राहून) |
| ६. | जल आलेखन सर्व्हेक्षण नकाशा विक्री |
| ७. | भरती-ओहोटी पुस्तिका विक्री |
| | **गृह (राज्य उत्पादन शुल्क) ( ५२ सेवा )**<br>**( अधिसूचना क्र.एमआयएस-१०१७/प्र.क्र.२२९/राउशु-२, २८ डिसेंबर, २०२०.)** |
| १. | **एफएल-१ मंजूर करणे**<br>मुंबई विदेशी मद्य नियम १९५३ अंतर्गत भारतीय सीमा शुल्क हद्दीतून पेय विदेशी मद्य बाहेर काढणे व भारतीय बनावटीचे पेय मद्य विक्री करण्यासाठी व्यापार आणि आयात अनुज्ञप्ती |
| २. | **एफएल/डब्ल्यु-१ मंजूर करणे**<br>मुंबई विदेशी मद्य नियम १९५३ अंतर्गत भारतीय सीमा शुल्क हद्दीतून वाईन बाहेर काढणे |
| ३. | **एफएल/डब्ल्यु-२ मंजूर करणे**<br>मुंबई विदेशी मद्य नियम १९५३ अंतर्गत वाईनच्या सीलबंद विक्रीकरिता अनुज्ञप्ती |
| ४. | **एफएल/बीआर-२ मंजूर करणे**<br>मुंबई विदेशी मद्य नियम १९५३ अंतर्गत बीअर किंवा वाईन किंवा दोन्हींची सीलबंद स्वरुपात विक्रीकरिता अनुज्ञप्ती |
| ५. | **एफएल-३ मंजूर करणे**<br>मुंबई विदेशी मद्य नियम १९५३ अंतर्गत भारतीय बनावटीचे विदेशी मद्याची व परदेशातून आयात केलेल्या पेय मद्याची हॉटेल आस्थापनेवर विक्री करण्यासाठी अनुज्ञप्ती |
| ६. | **एफएल-४ मंजूर करणे**<br>मुंबई विदेशी मद्य नियम १९५३ अंतर्गत भारतीय बनावटीचे विदेशी मद्याची व परदेशातून आयात केलेल्या पेय मद्याची क्लबच्या आस्थापनेवर विक्री करण्यासाठी अनुज्ञप्ती |
| ७. | **फॉर्म-ई मंजूर करणे**<br>विशेष परवाना आणि अनुज्ञप्ती नियम १९५२ अंतर्गत सौम्य मद्य किंवा वाईन अथवा दोन्हीही यांची खुली आणि सीलबंद स्वरुपात हॉटेल / कॅन्टीन / क्लब च्या आस्थापनेवर विक्री करण्याकरिता अनुज्ञप्ती |
| ८. | **ई-२ मंजूर करणे**<br>विशेष परवाना आणि अनुज्ञप्ती नियम १९५२ अंतर्गत वाईनच्या विक्रीकरिता अनुज्ञप्ती |
| ९. | **फार्म एम-१ मंजूरी**<br>मुंबई मळी नियम १९५५ अंतर्गत मळी उत्पादकाने मळी बाळगणे व विक्री करिताची अनुज्ञप्ती मंजूर करणे |
| १०. | **फार्म एम-२ अनुज्ञप्ती मंजूरी**<br>मुंबई मळी नियम १९५५ अंतर्गत मळी उत्पादकाव्यतिरिक्त मळी बाळगणे व वापर करणे करिताची अनुज्ञप्ती |
| ११. | **फार्म एम-३ अनुज्ञप्ती मंजूरी**<br>मुंबई मळी नियम १९५५ अंतर्गत मळी उत्पादकाव्यतिरिक्त मळी बाळगणे व विक्री करणे करिताची अनुज्ञप्ती |
| १२. | **फार्म एम-३ ए मंजूर करणे**<br>मुंबई मळी नियम १९५५ अंतर्गत पशुखाद्याकरिता मळी विकत घेणे, बाळगणे व वापर करण्या करिताची अनुज्ञप्ती |

| | |
|---|---|
| **१३.** | **फॉर्म एमएफ-१, मंजूर करणे**<br>मुंबई मोहा फुले नियम १९५० अंतर्गत मोहा फुले बाळगण्याकरिताची अनुज्ञप्ती |
| **१४.** | **आरएस-२ मंजूर करणे**<br>औद्योगिक, शैक्षणिक, औषधी व वैद्यकीय पृथ:करण करण्याकरिता शुध्द मद्यार्काचा वापर करणे, बाळगण्याकरिताची अनुज्ञप्ती |
| **१५.** | **आरएस-६ अनुज्ञप्ती मंजूरी**<br>शुध्द मद्यार्काच्या किरकोळ विक्री करण्याकरिताची अनुज्ञप्ती |
| **१६.** | **आरएस-६ ए अनुज्ञप्ती मंजूरी**<br>शुध्द मद्यार्काच्या बाटल्या भरण्याकरिताची अनुज्ञप्ती |
| **१७.** | **आरएस-७ अनुज्ञप्ती मंजूरी**<br>शुध्द मद्यार्काची बंधित साठवणूक व घाऊक विक्री करण्याकरिताची अनुज्ञप्ती |
| **१८.** | **बीआरएल (मायक्रोब्रुवरी) इरादापत्र व मंजूरी**<br>महाराष्ट्र बिअर व वाईन निमिर्ती नियम १९६६ अंतर्गत रेस्टॉरंटमध्ये बिअर निर्मितीकरिता अनुज्ञप्ती |
| **१९.** | **बीआरएल (वायनरी) इरादापत्र व मंजूरी**<br>महाराष्ट्र बिअर व वाईन निर्मिती नियम १९६६ अंतर्गत रेस्टॉरंटमध्ये वाईन निर्मितीकरिता अनुज्ञप्ती |
| **२०.** | **सीएल/एफएल/टिओडी-३ मंजूर करणे**<br>मुंबई विदेशी मद्य नियम १९५३ अंतर्गत एफएल-२ अनुज्ञप्ती धारण करणाऱ्या व्यक्तीस महाराष्ट्र देशी दारु नियम १९७३अंतर्गत देशी मद्याची सीलबंद बाटल्यांचे किरकोळ विक्री करण्याकरिताची अनुज्ञप्ती |
| **२१.** | उपरोक्त अ.क्र. १ ते २० वर नमूद अनुज्ञप्तींचे तसेच एफएल-२ व सीएल-३ अनुज्ञप्तींचे नुतनीकरण |
| **२२.** | **फॉर्म डिएस-१ मंजूर करणे**<br>मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम १९५९ अन्वये बंधपत्राअंतर्गत भारतामध्ये निर्मित झालेल्या शुध्द मद्यार्कापासून विप्रकृत मद्यार्क तयार करण्याकरिता आणि वखारीतून विप्रकृत मद्यार्क विक्री करण्याकरिताची अनुज्ञप्ती |
| **२३.** | “एल” फॉर्म नोंदणी |
| **२४.** | **फॉर्म “ के “ नोंदणी प्रमाणपत्र मंजूरी**<br>महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम, १९६३ अंतर्गत महाराष्ट्र राज्या व्यतिरिक्त इतर राज्यातील भारतीय बनावटीचे विदेशी मद्य/बिअर/वाईन उत्पादकांना त्यांच्या ब्रॅन्डची महाराष्ट्रात विक्री करण्याकरिता |
| **२५.** | राज्यातील मद्यनिर्माणींचे ब्रॅन्ड -लेबल्स मंजूरी |
| **२६.** | **“एल” फार्म अंतर्गत परदेशातील आयात मद्याचे ब्रॅन्ड लेबल मंजूरी**<br>महाराष्ट्र विदेशी मद्य (आयो व निर्यात) नियम, १९६३ अंतर्गत |
| **२७.** | **“के” फार्म अंतर्गत परराज्यातील आयात मद्याचे ब्रॅन्ड लेबल मंजूरी**<br>महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम, १९६३ अंतर्गत |
| **२८.** | **अनुज्ञप्तीचे नुतनीकरण**<br>फार्म-I, डिएस-१ |
| **२९.** | **पीएलएल अनुज्ञप्तीचे नुतनीकरण**<br>महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियम १९६६ |
| **३०.** | **बीआरएल (ब्रुव्हरी) अनुप्तीचे नुतनीकरण**<br>महाराष्ट्र बिअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ |
| **३१.** | **सीएल-१ अनुज्ञप्तीचे नुतनीकरण**<br>महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ |
| **३२.** | **सीएल-२ अनुज्ञप्तीचे नुतनीकरण**<br>महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ |
| **३३.** | तात्पुरती एक दिवसीय अनुज्ञप्ती जागेची नोंदणी |

| | |
|---|---|
| ३४. | **फार्म -एफएल-४-ए**<br>(विशेष कार्यक्रमाकरिता देण्यात येणारी तात्पुरती अनुज्ञप्ती) |
| ३५. | **फार्म एम-४ मंजूर करणे**<br>मुंबई मळी नियम १९५५ अंतर्गत मळी आयात करण्याकरिताची अनुज्ञप्ती |
| ३६. | **फार्म एम-५ मंजूर करणे**<br>मुंबई मळी नियम १९५५ अंतर्गत मळी निर्यात करण्याकरिताची अनुज्ञप्ती |
| ३७. | **सीएल-३ अनुज्ञप्तींचे स्थलांतर**<br>(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून) महाराष्ट्र देशी मद्य नियम १९७३ अंतर्गत |
| ३८. | **एफएल-२ अनुज्ञप्तींचे स्थलांतर**<br>(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून) मुंबई विदेशी मद्यनियम १९५३ अंतर्गत |
| ३९. | सीएल-३/एफएल-२ अनुज्ञप्तीचे एका नावावरुन दुसऱ्या नावावर वर्ग/हस्तांतरण करणे |
| ४०. | सीएल-३/एफएल-२ अनुज्ञप्तीमध्ये भागीदार घेणे/वगळणे |
| ४१. | **फार्म-एफएल-एक्स-सी**<br>मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ अंतर्गत महाराष्ट्र राज्यात विदेशी मद्य आणि देशी मद्य खरेदी, बाळगणे, वाहतूक आणि पिण्याकरीता वार्षिक अथवा आजीवन परवाना मंजूर करणे. |
| ४२. | **फार्म-एफएल-एफ**<br>मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ अंतर्गत महाराष्ट्र राज्यात विदेशी मद्य खरेदी, बाळगणे, वाहतूक आणि पिण्याकरीता एक दिवसीय परवाना मंजूर करणे. |
| ४३. | **फार्म-सीएल-सी**<br>मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ अंतर्गत महाराष्ट्र राज्यात देशी मद्याची खरेदी, बाळगणे, वाहतुक आणि पिण्याकरीता एक दिवसीय परवाना मंजूर करणे |
| ४४. | **वाहतूक पास मंजूरी**<br>फार्म II (बंधित मद्यार्क वाहतूक) मुंबई शुध्द मद्यार्क (बंधित वाहतूक) नियम, १९५१ |
| ४५. | **वाहतूक पास मंजूरी**<br>**फार्म PL-XI (विदेशी मद्य वाहतूक)** महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ |
| ४६. | **वाहतूक पास मंजूरी**<br>**फार्म BR-IX (बिअर वाहतूक)** महाराष्ट्र बियर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ |
| ४७. | **वाहतूक पास मंजूरी**<br>**फार्म CL-VI (देशी मद्य निर्मितीसाठी मद्यार्क वाहतूक)** महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ |
| ४८. | **वाहतूक पास मंजूरी**<br>**फार्म CL-XIV (देशी मद्य वाहतूक)** महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ |
| ४९. | **आयात परवाना मंजूरी Form B**<br>(दत्त शुल्क आयात विदेशी मद्याचा आयात परवाना) महाराष्ट्र विदेशी मद्य (आायत व निर्यात ) नियम १९६३ |
| ५०. | **निर्यात परवाना मंजूरी Form B**<br>(**परदेशातील निर्यातीकरिता**) (भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या बंधपत्राखाली वाहतूक/ बंधपत्राखाली निर्यातीसाठी परवाना) महाराष्ट्र भारतीय बनावटीचे विदेशी मद्य (बंधपत्राखाली वाहतूक आणि निर्यात नियम १९६८) |
| ५१. | **निर्यात परवाना मंजूरी फॉर्म - I**<br>**(परराज्यातील निर्यातीकरिता)** महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम १९६३ |
| | **(अधिसूचना क्र.एमआयएस-१०१७/प्र.क्र.२२९/राउशु-२, दिनांक १० मे, २०२२)** |
| ५२ | **अबकारी पडताळणी प्रमाणपत्र (प्रमाणपत्र-३)**<br>**(महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम, १९६३ मधील नियम २५(३) अन्वये, आयातदारापर्यंत मद्य पोहचल्याचा पुरावा म्हणून वितरीत करावयाचे अबकारी पडताळणी** |

| | |
|---|---|
| | **प्रमाणपत्र )** |
| | **परिवहन (१४ सेवा )**<br>**( अधिसूचना क्र.एमआयएस-०२१५/प्र.क्र.३१/ परि-४, दिनांक २७ जुलै, २०१५)** |
| १. | शिकाउ अनुज्ञप्ती जारी करणे |
| २. | पक्की अनुज्ञप्ती जारी करणे |
| ३. | अनुज्ञप्ती नुतनीकरण करणे |
| ४. | दुय्यम अनुज्ञप्ती जारी करणे |
| ५. | दुय्यम वाहन नोंदणी प्रमाणपत्र जारी करणे |
| ६. | तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र जारी करणे |
| ७. | नवीन वाहन नोंदणी करणे आणि नोंदणी प्रमाणपत्र जारी करणे |
| ८. | वाहनांच्या हस्तांतरणाची नोंद करणे |
| ९. | वाहन मालकाच्या मृत्युनंतर वाहनांच्या हस्तांतरणाची नोंद करणे |
| १०. | वाहन हस्तांतरणासाठी ना-हरकत प्रमाणपत्र जारी करणे |
| ११. | वाहन पत्ता बदलण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र जारी करणे |
| १२. | भाडे खरेदी/गहाण करार नोंद रद्द करणे |
| १३. | इतर राज्यातून आलेल्या वाहनांना नोंदणी क्रमांक जारी करणे |
| १४. | भाडे खरेदी /गहाण करार नोंद करणे |
| | **महसूल व वन विभाग ( एकूण ६८ सेवा )** |
| | **महसूल ( २० सेवा )**<br>**( पत्र क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.२५/म-६, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ नुसार.)** |
| १. | वय,राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र |
| २. | जातीचे प्रमाणपत्र |
| ३. | उत्पन्न प्रमाणपत्र |
| ४. | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र |
| ५. | तात्पुरता रहिवास प्रमाणपत्र |
| ६. | ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र |
| ७. | ऐपतीचा दाखला |
| ८. | सांस्कृतिक कार्यक्रम परवाना |
| ९. | अधिकार अभिलेखाची प्रमाणित प्रत |
| १०. | अल्पभू-धारक दाखला |
| ११. | भूमीहीन शेतमजूर असल्याचा दाखला |
| १२. | शेतकरी असल्याचा दाखला |
| १३. | डोंगर/दुर्गम क्षेत्रात राहत असल्याचे प्रमाणपत्र |
| १४. | प्रतिज्ञापत्र साक्षांकित करणे |
| १५. | उद्योजकांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४४ (अ) च्या तरतूदीनुसार परस्पर औद्योगिक वापर सुरु करणे शक्य व्हावे, त्याकरीता आवश्यक अधिकृत माहिती तातडीने उपलब्ध करून देणे. |
| १६. | औद्योगिक प्रयोजनार्थ जमीन खोदण्याची परवानगी ( गौण खनिक उत्खनन) |
| १७. | औद्योगिक प्रयोजनार्थ जमीन वापरण्याकामे बिगर अधिसूचित वृक्ष तोड परवानगी. |
| १८. | महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ (१) (अ) अन्वये भोगवटादार वर्ग-१ या |

| | |
|---|---|
| | धारणाधिकाराच्या जमिनीसंदर्भात नियोजन प्राधिकारणाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अर्जातर्गत जमिनीचा वर्ग, जमिनीचा भोगवटादार व त्यावरील भार इ. चे विनिश्चिती प्रमाणपत्र देणे. |
| १९. | महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ (१) (ब) अन्वये राज्यात अंमलात असलेले शेतजमीन व कुळवहिवाट अधिनियम, विविध वतन अधिनियम आणि महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ या अधिनियमानुसार वाटप केलेल्या भोगवटादार वर्ग २ या धारणाधिकाराच्या जमिनीकरीता भोगवटादाराचा परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यापासून विकास परवानगी मिळविण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे. |
| २०. | महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ अन्वये संबंधित व्यक्तीने प्राप्त केलेल्या विकास परवानगीच्या अनुषंगाने अशा व्यक्तीकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे आणि कलम ४७ अ मध्ये नमूद केलेल्या दराने रुपांतरण कराचा आणि त्याबद्दलचा अकृषिक आकारणीचा भरणा केल्यावर संबंधित व्यक्तीला विहित नमुन्यामध्ये सनद देणे. |
| | **भुमि अभिलेख ( २० सेवा ) पत्र दि.४ ऑगस्ट, २०१६** |
| १. | नक्कल पुरविणे<br>अ) मिळकत पत्रिका |
| २. | मिळकत पत्रिका मुंबई उपनगर जिल्हा, क्षेत्र पडताळणी करून |
| ३. | टिपण, क्षेत्रबुक, प्रतिबुक शेतपुस्तक जबाब, फाळणी, काटे फाळणी, हि. फॉ नं. ४, आकारफोड, स्कीम उतारा, आकारबंद, गट नकाशा, मोजणी नकाशा, क.जा.प., चौकशी नोंदवही इ. अभिलेख |
| ४. | अपील निर्णयाच्या नकला |
| ५. | मोजणी प्रकरणे.<br>(i) अतितातडी प्रकरणे |
| ६. | (ii) तातडी प्रकरणे |
| ७. | (iii) साधी प्रकरणे |
| ८. | (iv) अति अति तातडी प्रकरणे |
| ९. | (a) मोजणी पूर्ण झाल्यानंतर मोजणी नकाशाची "क" प्रत देणे. |
| १०. | **आकारफोड / कजाप तयार करणे.**<br>पोटहिस्सा मोजणीनंतर परिपूर्ण प्रकरणांमध्ये आकारफोड मंजूर करणे. |
| ११. | बीन शेती मोजणी प्रकरण निकाली झाल्यानंतर परिपूर्ण प्रकरणामध्ये क. जा. प. तयार करून मंजूर करणे. |
| १२. | **फेरफार नोंदी**<br>विवादग्रस्त नसल्यास |
| १३. | दुवा तुटलेली असल्यास फेरफाराबाबत निर्णय घेणे. |
| १४. | रस्ता, रस्ता सेट बँक, रिजर्वेशन याबाबत संबंधित प्राधिकारणाला जागा हस्तांतरित केलेल्या प्रकरणी संबंधितांच्या नावे मिळकत प्रतिकेत नोंद घेणे. ( प्रकरणी महानगरपालिका / सक्षम प्राधिकारी यांनी ताबा पावती व संपूर्ण कागदपत्रांसह नामांतरासाठी प्रकरण पाठविल्यास ) |
| १५. | विवादग्रस्त असल्यास |
| १६. | मिळकत पत्रिकेची पोटविभागणी करून मिळकत पत्रिका स्वतंत्र करणे<br>याबाबत पोटहिस्सा मोजणी पूर्ण झालेल्या दिवसापासून<br>(अ) जिल्हाधिकारी यांनी आदेशित केलेल्या क्षेत्रात तफावत येत नसल्यास पोटहिस्सा मोजणी झाल्यापासून स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे. |
| १७. | (ब) जिल्हाधिकारी यांनी आदेशित केलेल्या पोटहिस्सा क्षेत्रात तफावत येत आहे, मात्र मूळ नगर भूमापनाच्या क्षेत्रात फरक नाही, अशा प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी फेरमान्यता दिल्यानंतर स्वतंत्र मि. पत्रिका उघडणे. |
| १८. | भूसंपादनामध्ये रस्ता, रस्ता सेट बँक, रिजवेर्शन याबाबत शासन / संबंधित प्राधिकारी यांचे नावे स्वतंत्र |

| | |
|---|---|
| | मिळकत पत्रिका तयार करणे.<br>(अ) ज्या ठिकाणी मूळ नगर भूमापनाच्या क्षेत्रात फरक पडत नाही, अशा बाबतीत सक्षम प्राधिकारांचा अंतिम आदेश झाल्यानंतर मिळकत पत्रिका स्वतंत्र तयार करणे. |
| १९. | (ब) हस्तांतरण क्षेत्रात फरक पडत असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याच्या फेर अंतिम आदेशानंतर |
| २०. | दुरुस्तीसह अद्ययावत नकाशा तयार करणेबाबत (पोटहिस्सा, सामिलीकरण, भूसंपादन, रस्ता सेट बॅक इत्यादिमुळे नकाशात होणारे बदल) सक्षम प्राधिकाऱ्यांने मंजूरीचे अंतिम आदेश दिल्यानंतर. |
| | **नोंदणी व मुद्रांक शुल्क ( १५ सेवा )**<br>**( शासन निर्णय.क्र.मलोह -२०१५/४४७/प्र.क्र.१७३/म-१, १४ जुलै, २०१५)** |
| १. | दस्त नोंदणी करणे<br>प्रकार 1 - थेट प्राप्त<br>प्रकार 2 - मैत्री कक्षाकडून प्राप्त संदर्भ |
| २. | संगणीकृत प्रणालीमध्ये नादस्ताच्या सूचीची प्रमाणित नक्कल देणे |
| ३. | दस्ताची प्रमाणित नक्कल देणे. |
| ४. | शोध उपलब्ध करणे |
| ५. | नोटीस ऑफ इंटिमेशन फाईल करून देणे. |
| ६. | मुद्रांक शुल्क भरण्याचे प्रयोजनार्थ मूल्यांकन अहवाल देणे |
| ७. | दस्त नोंदणी संदर्भात गृहभेट देणे |
| ८. | विशेष कुलमुखत्यारपत्राचे अधिप्रमाणन करून देणे |
| ९. | सह जिल्हानिबंधक कार्यालयात नोंदणी झालेल्या दस्ताची/त्या दस्ताच्या सूचीची प्रमाणित नक्कल देणे |
| १०. | दस्त नोंदणी न केलेल्या प्रकरणांमध्ये, ई-पेमेंट पद्धतीने भरलेल्या नोंदणी फी चा परतावा |
| ११. | मृत्युपत्राचा सीलबंद लखोटा जमा करणे,परत घेणे व उघडणे |
| १२. | विशेष विवाह कायदा,१९५४ अन्वये विवाह संपन्न करणे |
| १३. | विवाह प्रमाणपत्राच्या प्रमाणित नकला देणे |
| १४. | इतर पद्धतीने अगोदरच झालेल्या विवाहाची विशेष कायदा, १९५४ अंतर्गत नोदणी करणे |
| १५. | दस्ताचे अभिनिर्णय करणे<br>**प्रकार-1** - मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे थेट दाखल अर्ज (कागदपत्रांची पूर्तता झालेपासून) (मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यांकरिता)<br>**प्रकार-2**- सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे थेट दाखल अर्ज (मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यांव्यतिरिक्त)<br>**प्रकार-3**- मैत्री कक्षाकडून प्राप्त (कागदपत्रांची पूर्तता झाल्यापासून) (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांकरिता)<br>**प्रकार-4**- मैत्री कक्षाकडून प्राप्त (कागदपत्रांची पूर्तता झाल्यापासून) (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांव्यतिरिक्त) |
| | **वने ( १३ सेवा )**<br>**( अधिसूचना क्र.एफएसटी - ०२/१५/प्र.क्र.८५ /फ-४, दिनांक २० जुलै, २०१५)** |
| १. | तेंदुपाने कंत्राटदार/उत्पादक यांची नोंदणी करणे |
| २. | बांबू पूरविणेसाठी नवीन बुरड कामगारांची नोंदणी करणे |
| ३. | वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या पशु नुकसानीची नुकसानभरपाई मंजुर करणे |
| ४. | वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे व्यक्ती जखमी किंवा मृत झाल्यास आर्थिक सहाय्य मंजुर करणे |
| ५. | वन्यजीव क्षेत्रात पर्यटन हंगामात फोटाग्राफिसाठी परवानगी ( वृत्त स्तर) |
| ६. | वन्यजीव क्षेत्रात पर्यटन हंगामात फोटाग्राफिसाठी परवानगी (एकापेक्षा अधिक वृत्तांसाठी) |
| ७. | वन्याप्राण्यांच्या हानीमुळे झालेल्या पीक नुकसानीकरीता नुकसानभरपाई मंजुर करणे |

| | |
|---|---|
| ८. | अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी आरागिरणी परवाना नुतनीकरणाबाबत घेतलेला निर्णय कळविणे |
| ९. | महाराष्ट्र वृक्षतोड (विनियमन) अधिनियम १९६४ नुसार संपूर्ण दस्तऐवजांसह अर्ज प्राप्तीनंतर वृक्ष अधिकारी यांनी अनुसूचित जमातीच्या भोगवटादारांच्या मालकीच्या वृक्षतोडीसाठी परवानगी देण्याबाबत घेतलेला निर्णय कळविणे. |
| १०. | महाराष्ट्र वृक्षतोड (विनियमन) अधिनियम १९६४ नुसार संपूर्ण दस्तऐवजांसह अर्ज प्राप्तीनंतर वृक्ष अधिकारी यांनी बिगर आदिवासी अर्जदारास वृक्षतोडीसाठी परवानगी देण्याबाबत घेतलेला निर्णय कळविणे. |
| | **( अधिसूचना क्र.एफएसटी - ०२/१५/प्र.क्र.८५ /फ-४, दिनांक ०३ मार्च, २०१७)** |
| ११. | महाराष्ट्र वन नियम २०१४ मधील तरतूदीस अनुसरुन पात्र व्यक्तींना वाहतूक परवाना जारी करणे. |
| १२. | वनेत्तर जमिनी बाबतचा दाखला मिळविण्याकरिता अर्ज |
| १३. | वनहद्दीपासून अंतरचा दाखला मिळविण्याकरिता अर्ज |
| | **कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग ( एकूण ४५ सेवा )** |
| | **कृषि, कृषि आयुक्त ( २५ सेवा )**<br>**( आयुक्त, कृषि यांची अधिसूचना क्र. कृआ/२०१५/प्र.क्र.१४६/लोसेहअ /१, दिनांक १० जुलै, २०१५)** |
| १. | मृद व जल नमुना तपासणी |
| २. | लागवड साहित्य आयात करण्यासाठी उत्पादक प्रमाणपत्र देणे. |
| ३. | कृषि वस्तूंच्या निर्यातीसाठी फायटोसॅनिट्री |
| ४. | APEDA च्या GRAPENET प्रणालीद्वारे युरोपियन युनियनला निर्यातीकरण्यासाठी द्राक्षशेत प्रमाणपत्राची नोंदणी आणि / नुतनीकरण (ऑनलाईन) |
| ५. | APEDA च्या MANGONET प्रणालीद्वारे युरोपियन युनियनला निर्यातीकरण्यासाठी आंबाशेत प्रमाणपत्राची नोंदणी आणि / नुतनीकरण (ऑनलाईन) |
| ६. | APEDA च्या ANARNET प्रणालीद्वारे युरोपियन युनियनला निर्यातीकरण्यासाठी अंनारशेती प्रमाणपत्राची नोंदणी आणि / नुतनीकरण (ऑनलाईन) |
| ७. | फळझाडांची ग्राफ्ट /रोपे विक्रसाठी परवाना |
| ८. | बियाणे नमुना चाचणी |
| ९. | खते नमुना चाचणी |
| १०. | किटकनाशके नमुना चाचणी |
| ११. | किटकनाशके उर्वरित अंश तपासणी |
| १२. | बियाणे व्यापार सुरु ठेवण्यासाठी परवाना देणे ( राज्यस्तरीय ) |
| १३. | खतेनिर्माता / विक्रेता व्यापार सुरु ठेवण्यासाठी परवाना देणे ( राज्यस्तरीय ) |
| १४. | किटकनाशके निर्माता / विक्रेता व्यापार सुरु |
| १५. | सूक्ष्मसिंचन संच (ठिबक/तुषर) उत्पादक नोंदणी |
| १६. | कृषि यांत्रिकीकरण (ऑनलाईन) |
| | **कृषि (विद्यापीठ)** |
| १७. | दुबार पदवी / पदव्युत्तर प्रमाणपत्र |
| १८. | दुबार पदवी / पदव्युत्तर गुणपत्रक |
| १९. | दुबार तात्पुरते उत्तीण प्रमाणपत्र |
| २०. | दुबार कृषि तंत्र पदविका ( दोन वर्षे मराठी माध्यम अभ्यासक्रम प्रमाणपत्र ) |
| २१. | दुबार कृषि तंत्रज्ञान पदविका ( तीन वर्षे अर्ध इंग्रजी माध्यम अभ्यासक्रम ) प्रमाणपत्र |

| | |
|---|---|
| २२. | दुबार कृषि तंत्रज्ञान पदविका ( दोन वर्षे मराठी माध्यम अभ्यासक्रम प्रमाणपत्र ) गुणपत्रक |
| २३. | दुबार कृषि तंत्रज्ञान पदविका ( तीन वर्षे अर्ध इंग्रजी माध्यम अभ्यासक्रम ) गुणपत्रक |
| २४. | दुबार माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र |
| २५. | दुबार स्थलांतर प्रमाणपत्र |
| | **पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग ( पदुम ) ( एकूण २० सेवा )**<br>**पशुसंवर्धन ( १४ सेवा)**<br>**(शासन निर्णय.क्र. संकीर्ण-२६११/प्र.क्र.१३०/२०१४/पदुम-१७, दिनांक १३ जुलै, २०१५)** |
| १. | आरोग्य तपासणी व दाखला देणे |
| २. | पशुसंवर्धन विभागात कार्यरत असलेल्या अंडी उबवणी केंद्र, कुक्कट विकास गट व कुक्कटपालनाचे लाभार्थींना प्रशिक्षण देणे |
| ३. | इच्छुक बेरोजगार तरूण/व्यक्तींना स्वयंरोजगारविषयक प्रशिक्षण देणे |
| | **(शासन निर्णय क्र.संकीर्ण-२६११/प्र.क्र.१३०/पदुम-१७, दिनांक १४ ऑगस्ट, २०१९)** |
| ४. | वंध्यत्व निवारण शिबीराचे आयोजन |
| ५. | खच्चीकरण शिबीराचे आयोजन |
| ६. | गर्भधारणा तपासणी शिबीराचे आयोजन |
| ७. | गोचिड गोमाशा निर्मुलन शिबीराचे आयोजन |
| ८. | जंतनाशक औषधोपचार शिबीराचे आयोजन |
| ९. | सांसर्गिक गर्भपात (ब्रुसेलोसीस) रोगप्रतिबंधक लसीकरण |
| १०. | कोंबड्यांमधील सालमोनेलोसिस रोग तपासणी |
| ११. | पेट शॉप लायसन्स |
| १२. | डॉग ब्रिडर लायसन्स |
| १३. | वाहतुक प्रमाणपत्र (Transport certificate) |
| १४. | जनावरांची ट्युबर क्युलोसीस (टी.बी.), जोन्स डिसीज (जे.डी.) व सांसर्गिक गर्भपात (ब्रुसेलोसीस) रोगांसाठी तपासणी |
| | **मत्स्यव्यवसाय विभाग ( ०६ सेवा)** |
| १५. | मासेमार नौकांचे ऑनलाइन पद्धतीने नोंदणी |
| १६. | मच्छिमार नौकांसाठी ऑनलाइन पद्धतीने मासेमारी परवाना |
| १७. | तारोपोरवाला मत्स्यालयाचे ऑनलाइन तिकीट वितरण |
| १८. | मच्छिमारांसाठी मासेमारी परवाना |
| १९. | मच्छिमार संस्थांची ऑनलाइन पद्धतीने नोंदणी |
| २०. | ऑनलाइन रजिस्ट्रेशन ऑफ अक्वाकल्चर पाँड व फिश सीड सेंटर |
| | **नगरविकास विभाग ( एकूण ५५ सेवा )** |
| | **नगरविकास - २ ( १५ सेवा )**<br>**( शासन निर्णय.क्र.एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/ नवि-१४, दिनांक २३ जून, २०१५)** |
| १. | जन्म प्रमाणपत्र देणे |
| २. | मृत्यु प्रमाणपत्र देणे |
| ३. | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे |
| ४. | मालमत्ता कर उतारा देणे |

| | |
|---|---|
| **५.** | थकबाकी नसल्याचा दाखल देणे |
| **६.** | अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे |
| | ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे |
| **७.** | झोन दाखला देणे |
| **८.** | भाग नकाशा देणे |
| **९.** | बांधकाम परवाना देणे |
| **१०.** | जोते प्रमाणपत्र |
| **११.** | भोगवटा प्रमाणपत्र देणे |
| **१२.** | नळजोडणी देणे |
| **१३.** | जलनि:सारण जोडणी देणे |
| **१४.** | अग्निशमन ना-हरकत दाखला देणे (महानगरपालिकेकरीता) |
| **१५.** | अग्निशमन अंतिम ना-हरकत दाखला देणे (महानगरपालिकेकरीता) |
| | **नगर विकास ( ४० सेवा )**<br>**( शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५ /प्र.क्र.३९८/नवि-२०, दिनांक ०४/०९/२०१७ व दिनांक २६/०८/२०१९.)** |
| **१.** | नव्याने कर आकारणी |
| **२.** | पुन:कर आकारणी |
| **३.** | कराचे मागणी पत्र तयार करणे |
| **४.** | करमाफी मिळणे |
| **५.** | रहिवासी नसलेल्या मालमत्तांना करात सूट मिळणे |
| **६.** | स्वयंमुल्यांकन |
| **७.** | आक्षेप नोंदविणे |
| **८.** | उप विभागामध्ये मालमत्ता विभाजन |
| **९.** | मालमत्ता पाडणे व पुन:बांधणी आकारणी |
| **१०.** | मालकी हक्कात बदल करणे |
| **११.** | नळजोडणी आकारामध्ये बदल करणे |
| **१२.** | तात्पुरते / कायमस्वरुपी नळजोडणी खंडित करणे |
| **१३.** | पुन:जोडणी करणे |
| **१४.** | वापरामध्ये बदल करणे |
| **१५.** | पाणी देयक तयार करणे |
| **१६.** | प्लंबर परवाना |
| **१७.** | प्लंबर परवाना नुतनीकरण करणे |
| **१८.** | थकबाकी नसल्याचा दाखला |
| **१९.** | नादुरुस्त मीटर तक्रार करणे |
| **२०.** | अनधिकृत नळ जोडणी तक्रार करणे |
| **२१.** | पाण्याची दबाव क्षमता तक्रार |
| **२२.** | पाण्याची गुणवत्ता तक्रार |

| | |
|---|---|
| **२३.** | व्यापार / व्यवसाय / साठा करणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र |
| **२४.** | मंडपासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे |
| **२५.** | नवीन परवाना मिळणे |
| **२६.** | परवान्याचे नुतणीकरण |
| **२७.** | परवाना हस्तांतरण |
| **२८.** | परवाना दुय्यम प्रत |
| **२९.** | व्यवसायाचे नाव बदलणे |
| **३०.** | व्यवसाय बदलणे |
| **३१.** | परवाना/भागीदाराचे नाव बदलणे |
| **३२.** | भागीदारांच्या संख्येत बदल (वाढ/कमी) |
| **३३.** | परवाना रद्द करणे |
| **३४.** | कालबाह्य परवानासाठी नुतणीकरण सूचना |
| | **शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१९ /प्र.क्र.१८०/नवि-२०, दि.२९/०१/२०२१** |
| **३५.** | नवीन जाहिरात आकाशचिन्ह परवाना व नुतनीकरण |
| **३६.** | नीवन सिनेमा चित्रीकरण व परवाना नुतनीकरण |
| **३७.** | व्यवसाय परवाना स्वयंनुतनीकरण |
| | **शासन निर्णय क्रमांक: सिआयडी-३३२२/१५५२/प्र.क्र.१५४/नवि-१०, दि.०३ नोव्हेंबर, २०२२** |
| **३८** | गहाणखत ना हरकत प्रमाणपत्र देणे |
| | शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२२/१५४०/प्र.क्र.२०५/नवि-७, दि.१४ नोव्हेंबर, २०२२ |
| **३९** | प्रादेशिक योजनेचे (संपुर्ण तथा भागनकाशे ) पुरविणे<br>अ. कृष्णधवल<br>ब. रंगीत |
| **४०** | विक्री : अ. विकास नियंत्रण नियमावली पुस्तिका<br>ब. प्रादेशिक योजनेची सीडी |
| | **विधी व न्याय विभाग ( एकूण ४ सेवा )**<br>**( अधिसूचना क्र.ईएसटी-२०१५/१५६०/ का.दोन, दिनांक १० जुलै, २०१५ )** |
| १. | राज्य विधिसेवा प्राधिकरणाने द्यावयाचे कायदेविषयक मोफत सहाय्य |
| २. | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाच्या तरतुदींनुसार सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांची नोंदणी (एक) मुंबईमध्ये (दोन) इतर जिल्ह्यांमध्ये |
| ३. | भागीदारी संस्था अधिनियम, १९५२ अन्वये भागीदारी संस्थेची नोंदणी (एक) मुंबईमध्ये (दोन) औरंगाबाद, नागपूर व पुणे येथे. |
| | (अधिसूचना क्र. ईएसटी-२०१५/१५६०/का.दोन, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१७ ) |
| 4. | संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम-३ अनुसार संस्था नोंदणी करण्याकरीता शासनास अर्ज सादर करणे. |
| | **ग्राम विकास विभाग ( एकूण ०७ सेवा )**<br>**( अधिसूचना क्र.आरटीएस-२०१८/प्र.क्र.१४५/आस्था.५, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९)** |
| १. | जन्म नोंद दाखला |
| २. | मृत्यू नोंद दाखला |
| ३. | विवाह नोंद दाखला |

| | |
|---|---|
| ४. | दारिद्रय रेषेखालील असल्याचा दाखला |
| ५. | ग्रामपंचायत येणेबाकी नसल्याचा दाखला |
| ६. | नमुना ८ चा उतारा |
| ७. | निराधार असल्याचा दाखला |
| | **मृद व जलसंधारण विभाग ( एकूण ०८ सेवा)**<br>**( शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४९/जल-१७, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८.)** |
| १. | पाणी वापर संस्थेस देय पाणी हक्क मंजूरी देणे. |
| २. | पाणी वापर संस्थेस पाणीपट्टी थकबाकी दाखला देणे. |
| ३. | बिगर सिंचन पाणी पट्टी थकबाकी दाखला देणे. |
| ४. | पाणी पट्टी देयक तक्रार निवारण करणे. |
| ५. | लाभक्षेत्राचा दाखला देणे. |
| ६. | ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगर पंचायत, कटक मंडळे (Cantonment Board) यांना घरगुती पाणी वापर परवाना |
| ७. | महानगरपालिका, खाजगी विकासक, विशेष नगर विकास प्रकल्प यांना घरुगुती/औद्योगिक पाणी वापर परवाना देणे |
| ८. | औद्योगिक प्रयोजनासाठी पाणी वापर परवाना देणे. |
| | **अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ( एकूण १६ सेवा )**<br>**( अधिसूचना क्र.संकीर्ण-१०१४/१३०६/प्र.क्र.१७६/नापु-१२, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ व दि.२२ जून, २०१६)** |
| १. | नवीन शिधापत्रिका मागणी |
| २. | i) शिधापत्रिकेतील नावात दुरूस्ती.<br>ii) शिघापत्रिकेत नावे समाविष्ट करणे/नावे वाढविणे.<br>iii) शिधापत्रिकेत नाव कमी करणे.<br>iv) शिधापत्रिकेवरील पत्ता बदल करणे. |
| ३. | i) दुय्यम शिधापत्रिका (खराब/फाटलेली इ.).<br>ii) दुय्यम शिधापत्रिका (गहाळ शिधापत्रिका) |
| ४. | नवीन रास्तभाव दुकानाची मंजूरी |
| ५. | रास्तभाव दुकानाच्या परवान्याचे नुतनीकरण |
| ६. | किरकोळ रॉकेल विक्री परवाने |
| ७. | किरकोळ रॉकेल विक्री परवान्याचे नुतनीकरण |
| | **( अधिसूचना क्र.संकीर्ण-१०१४/१३०६/प्र.क्र.१७६/नापु-१२, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६, दि.२० सप्टेंबर, २०१६ )** |
| ८. | वजन-मापे उत्पादकांना परवाना |
| ९. | वजन-मापे उत्पादकांना परवाना नुतनीकरण |
| १०. | वजन-मापे विक्रत्यांना परवाना |
| ११. | वजन-मापे विक्रत्यांना परवाना नुतनीकरण |
| १२ | वजन-मापे दुरुस्तकांना परवाना |
| १३. | वजन-मापे दुरुस्तक परवाना नुतनीकरण |
| १४. | आवेष्टित वस्तुंचे उत्पादक / आवेष्टक यांची नोंदणी |
| १५. | नामनिर्देशन नोंदणी प्रमाणपत्र |

| | |
|---|---|
| | **(अधिसूचना क्र.संकीर्ण-२०१४/१३०६/प्र.क्र.१७६/नापु-१२, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६)** |
| **१६.** | वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ अंतर्गत वजन व मापे यांचे मुद्रांकन, पडताळणी व प्रमाणपत्र देणे. |
